म. ग्रं. सं. ठाणें


विषय

लेखक पं. वामन शास्त्री

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव



Potdar's Moral and Interesting Book Series.

No. II.

# LALITAWATSARAJ

( PARTI )

*Translated from Sanskrit*

BY

PANDIT WAMAN SHASTRI ISLAMPURKARI,

AND PUBLISHED BY

WASUDEVA MORESHWAR POTADAR,

*New Edition.*

PRINTED AT THE GANPAT KRISHNAJI'S PRESS.

Bombay.

1889.

Price 8 Annas.

*(Registered for Copy-right under the Government of India's Act XXV of 1867.)*

पोतदारांची मनोरंजक व नीतिपर पुस्तकमाला.

नंबर २.

# ललितवत्सराज.

( पूर्वार्द्ध. )

हें पुस्तक संस्कृत ग्रंथावरून

पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर

यांनीं मराठींत तयार केलें.

दुर्वारां कुसुमशरव्यथां वहन्त्या
कामिन्या यदभिहितं पुरः सखीनाम् ।
तद्भूयः शुक-सारिकाभिरुक्तम्
धन्यानां श्रवणपथातिथित्वमेति ॥

वासुदेव मोरेश्वर पोतदार,

यांनीं

मुंबईंत

'गणपत कृष्णाजी' यांचे छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८८९.

किंमत ८ आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टप्रमाणें नोंदून सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविलें आहेत.

# प्रस्तावना.

**काश्मीर** नांवाच्या प्रसिद्ध देशाचा राजा **हर्षदेव*** हा मोठा विद्वान् असून उत्तम कवि होता. याच्या नांवावर **नागानंद** नांवाचें नाटक व **रत्नावली** आणि **प्रियदर्शना** नांवाच्या दोन नाटिका प्रसिद्ध आहेत. कित्येकांना हा राजा स्वतः कवि होता याबद्दल बराच संशय आहे. त्यांच्या मतें **हर्षदेव** हा गुणग्राही असून, विद्वानांचा मोठा भोक्ता होता. त्याणें स्वतः एकही ग्रंथ केलेला नसून, **धावक** नांवाचा एक मोठा कवि त्याच्या आश्रयास होता. त्यानें वरील तीनही ग्रंथ रचले व मोठें बक्षीस घेऊन, ते आपला यजमान राजा **हर्षदेव** याच्या नांवानें प्रसिद्ध केले.

प्रकृत पुस्तक हें वर सांगितलेल्या ग्रंथांपैकीं **रत्नावली** या नाटिकेच्या आधारानें लिहिलें आहे. प्रसिद्ध महाकवि **गुणाढ्य** याच्या **बृहत्कथेचा** नायक **वत्सराज** यानें आपली पट्टराणी **वासवदत्ता** हिला प्रसन्न करून घेऊन **सिंहलद्वीपच्या** राजाची कन्या **रत्नावली** हिच्याशीं विवाह करून घेतल्याची कथा सुरस रीतीनें यांत वर्णन केली आहे.

---

* **हर्षदेव** हा आपला बाप **कलशदेव** याला आवडत नव्हता. त्याणें आपल्या पश्चात् **उत्कर्ष** याला गादीवर बसविलें होतें; पण प्रधान मंडळीनें त्याला टिकूं दिलें नाहीं. **उत्कर्षानें** फक्त २२ दिवस राज्य केलें. त्याला हाकलून देऊन प्रधानांनीं सन १११३ ह्या वर्षीं **हर्षदेवाला** गादीवर बसविलें. सुमारें १२ वर्षें राज्य करून ११२५ या वर्षीं त्याचा अंतकाल झाला, असें काश्मीरच्या इतिहासावरून समजतें. रत्नावली कोणत्या वर्षी रचली, हें स्पष्टपणें सांगतां येत नाहीं, तरी १११३ पासून ११२५ सालांच्या दरम्यान हिची रचना झाली असावी असें वाटतें.

हें पुस्तक मोठ्या चमत्कारिक रीतीनें तयार झालें. इ० स० १८८२ सालीं आमची एक धर्मभगिनी भागीरथी बाई ही आमच्या जवळ संस्कृत भाषेचा अभ्यास करीत होती. तिची बुद्धिमत्ता किती वर्णनीय होती ? याचें आतां येथें विशेष वर्णन करून कांहीं उपयोग नाहीं. तिच्या अप्रतिम ग्रहण व धारण शक्तीच्या योगानें तिनें अत्यंत गहन संस्कृत भाषेचा अल्प काळांत इतका विशेष परिचय संपादन केला कीं, तिच्या इतकें होणें अशक्य होतें.

आपल्याला उत्तम संस्कृत बोलतां यावें, अशी तिची फार इच्छा असल्यावरून तिनें निरनिराळ्या नाटकांतील चांगलीं चांगलीं वाक्यें तोंडपाठ करण्याचा क्रम चालविला होता; पण त्यापेक्षां स्वतंत्र एखादें नाटक पाठ केलें तर बरें, असें वाटल्यावरून तिनें ही नाटिका हातीं घेतली होती. प्रत्येक दिवशीं जितका भाग ती शिकत असे तेवढ्यानें पाठ घेतेवळें मराठी भाषांतर ती लिहून ठेवी. याप्रमाणें क्रम चालला असतां सन १८८२च्या जून महिन्याच्या १० व्या तारखेस आम्ही येथून हिंदुस्थानांत प्रवास करण्याकरितां गेल्यामुळें त्या आमच्या प्रिय शिष्यिणीचा अभ्यास तितकाच राहिला. तिच्या मनांत हें पुस्तक पुरें करून तें छापून प्रसिद्ध करावें असा बळकट हेतु होता; पण सुमारें अडीच अंक तयार झाले असून पुढें विघ्न आल्यामुळें तसेंच पडलें होतें. आमच्या वांचून दुसऱ्या जवळ मुळीच पोथी सोडायची नाहीं, असा तिचा पक्का निश्चय असल्या कारणानें तें काम तहकूब ठेवून ती आमच्या पुनरागमनाची मार्गप्रतीक्षा करीत होती. पण दुर्दैवानें तें सारेंच जागच्या जागीं राहिलें. त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत तिचा एकाएकीं अंतकाळ झाला !

तिचें सार्वकाळ विद्येकडेच लक्ष्य लागलें होतें व एक तरी पुस्तक आपण छापून प्रसिद्ध करावें, अशी तिची फार उमेद होती. अंतकालापूर्वी तिणें हा आपला हेतु पूर्ण करण्या-विषयीं आमच्या नांवचें एक पत्रही लिहून ठेविलें होतें. व आपण जें जें कांहीं लिहून तयार केलें होतें त्या सर्वांचें एक पुडकें बांधून तें आम्ही आल्यावर आम्हास मिळावें अशी तिणें व्यवस्था केली होती. प्रवास आटपून आह्मी परत येथें आलों, त्यावेळीं तें तिणें ठेवलेलें पुडकें आह्मांस मिळालें. व अभ्यास करणाऱ्या त्या प्रिय शिष्यिणीचा पर्यायमात्रानें तरी हेतु पूर्ण करावा एतदर्थ हें पुस्तक तयार केलें. मूळ नाटिकेचें अक्षरशः भाषांतर करण्याचा प्रयत्न न करितां कादंबरी सारखी सरळ कथा लिहावी असा हेतु असल्यामुळें पूर्वी तयार झालेल्या भाषांतराचें स्वरूप अगदीं बदलावें लागलें.

याचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धांत **रत्नावलीच्या** विवाहाची कथा असून उत्तरार्धांत **प्रियदर्शिकेच्या** विवाहाची कथा येणार आहे. प्रियवाचकांस आज हें पूर्वार्ध सादर केलें आहे. सवडीप्रमाणें, उत्तरार्धही प्रसिद्ध करण्यांत येईल.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या कामीं आमचे मित्र रा० रा० वासुदेव मोरेश्वर पोतदार यांणीं विशेष उत्साह दाखविल्यावरून हें काम तडीस गेलें, हें कळविण्यास आह्मांस फार संतोष वाटतो.

मुंबई.
गिरगांव, घर नं. २०.
पोर्चुगीज चर्च लाईन.

वा० शी० इ०

आ. ना.को. १८

ओं नमः श्रीगणेशाय ।

# ललितवत्सराज.

सम्प्राप्तं मकरध्वजेन मथनं त्वत्तो मदर्थे पुरा
तद्युक्तं बहुमार्गगां ममपुरो निर्लज्ज वोढुस्तव ।
तामेवानुनयस्व भावकुटिलां हे कृष्ण-कण्ठग्रहम्
मुञ्चेत्याह रुषा यमद्रितनया लक्ष्मीश्च पायात्स वः ॥१॥

ह्या भरतखंडाच्या दक्षिण दिशेला समुद्राच्या मध्यभागीं सिंहल नांवाचें एक द्वीप आहे. तेथें पूर्वी विक्रमबाहु नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला रत्नावलि नांवाची अत्यंत सुंदर कन्या झाली होती. ह्या मुलीच्या जन्मकाळीं एका सिद्धपुरुषानें राजाला सांगितलें कीं,—' जो या मुलीचें पाणिग्रहण करील, तो सार्वभौम राज्याचा अधिकारी होईल.' रत्नावलीचा पिता विक्रमबाहु याचा त्या सिद्धपुरुषाच्या वचनावर पूर्ण विश्वास बसला. ही मुलगी मोठी भाग्यशाली होणार— असें समजून त्याला मोठा आनंद झाला. क्रमाक्रमानें राजकन्या रत्नावलि शुक्लपक्षींच्या चंद्रिकेप्रमाणें वृद्धिंगत होऊन विवाहाला योग्य झाली. विक्रमबाहूचा भाचेजांवई ‡ कौशांबी §

‡ विक्रमबाहूची स्त्री व वासवदत्तेची आई अंगारवती ह्या दोघी सावत्र बहिणी होत्या. तेव्हां अर्थात वासवदत्ता ही विक्रमबाहूची भाची झाली व वत्सराज भाचेजांवई झाला, असा यांच्या नात्याचा संबंध आहे.

§ 'कौशांबी' या नांवाची मोठी प्रसिद्ध नगरी होती. वत्सदेशाची मुख्य राजधानी याच शहरांत होती. सांप्रत वायव्यप्रांतांत गुजराबाद जिल्ह्यांत कुसुंब नांवाचें एक खेडें आहे. त्यालाच पूर्वी कौशांबी म्हणत, असें कित्येक म्हणतात. प्रयागापासून नैर्ऋत्येस सुमारें एकतीस मैल कोसुंब नांवाचें खेडें आहे, हेंच कौशांबीनगर असेंही कित्येक म्हणतात.

**नगरी**चा राजा, **वत्सराज** ¶ याला ही कन्या मिळावी, असा विचार करून **वत्सराजा**चा मुख्य प्रधान **यौगंधरायण** यानें **रत्नावली**बद्दल तिच्या बापाजवळ मागणी घातली. **विक्रमबाहू**ला **वत्सराज** हा वर मान्य होता. परंतु **वत्सराजा**ची राणी **वासवदत्ता** ही **विक्रमबाहू**ची भाची होती. तेव्हां आपण आपली मुलगी दिली तर कदाचित् **वासवदत्ते**ला वाईट वाटेल व सवतमत्सर फार कठीण आहे, असा विचार करून **विक्रमबाहू**नें **यौगंधरायणा**च्या मागण्याला रुकार दिला नाहीं; तथापि **रत्नावली**च्या जन्मकालीं सिद्धानें सांगितलेली गोष्ट **यौगंधरायणा**ला माहीत होती, ह्मणून युक्तिप्रयुक्तीनें **रत्नावली**शीं **वत्सराजा**चा विवाह करून देण्याचा त्यानें निश्चय केला होता.

**मगध**देशाचा राजा **प्रद्योत** याच्याशीं शरीरसंबंध व सख्यसंबंध करण्याकरितां—**लावाणक** * नांवाच्या प्रदेशांत

---

¶ वत्सराज याचें मुख्य नांव 'उदयन्' असें आहे. 'वत्स'नांवाच्या देशाचा तो राजा होता ह्मणून लोक त्याला बहुतकरून वत्सराजच ह्मणत असत. अर्वाचीन पाश्चात्य शोधकांनीं तयार केलेल्या नकाशांत वत्स या नांवाचा देश कोठें आढळत नाहीं. डाक्टर एच्. एच्. विलसन् इत्यादि शोधकांनीं जीं अनुमानें काढलीं आहेत, त्यांवरून कांहीं निश्चय करतां येत नाहीं. तरी एकंदरींत वायव्य प्रांतांत गंगेच्या उत्तरेस हा देश असावा, व सांप्रत त्याला कांहीं दुसरें नांव प्राप्त झालें असावें, असें वाटतें.

* वत्सराजाचा मुख्य प्रधान यौगंधरायण हा मोठा कारस्थानी होता. त्याणें आपल्या राजाचा विशेष उत्कर्ष व्हावा ह्मणून अनेक प्रयत्न केले. शेवटीं सर्व पृथ्वी जिंकून वत्सराजाला सार्वभौमपदवी द्यावी, असा त्याचा विचार चालला होता. त्यावेळीं या भरत खंडांत दोघे राजे मोठे प्रबळ असून त्यांच्यामुळें यौगंधरायणाची मसलत सिद्ध

छावणीला आग लागून त्यांत **वासवदत्ता** जळून गेली, असा **यौगंधरायणानें** जिकडे तिकडे पुकारा करून **प्रद्योताची** मुलगी **पद्मावती** हिला **वत्सराजाची** धाकटी राणी केली ! व याबरोबरच **विक्रमबाहूची** मुलगी **रत्नावलि** **वत्सराजासाठीं** मागण्याकरितां त्यानें **बाभ्रव्य** नांवाच्या एका वि-

---

होण्यास अडचण येत होती. त्यांपैकीं उज्जयिनीचा राजा चंडमहासेन याची मुलगी वासवदत्ता हिला वत्सराजाची पट्टराणी करून देऊन चंडमहासेनाला त्यानें अनुकूल करून घेतलें. परंतु मगधदेशाचा राजा प्रद्योत याला अनुकूल करून घ्यावयाचें होतें. त्याची पद्मावती नांवाची मुलगी होती. तिला वत्सराजाची राणी करून देऊन प्रद्योतालाही अनुकूल करून घ्यावें, याविषयीं त्यानें पुष्कळ प्रयत्न केला; पण प्रद्योताच्या मनांत आपली मुलगी पट्टराणी व्हावी असें होतें. व तो अधिकार तर वडील असल्यामुळें वासवदत्तेला मिळाला होता; ह्मणून प्रद्योत पद्मावतीला देण्याचें कबूल करीना. आणि तो अनुकूल झाल्यावांचून आपली मसलत तर सिद्ध होत नाहीं. असें पाहून यौगंधरायणानें वासवदत्ता व तिचा भाऊ यांला अनुकूल करून घेऊन मगधदेशाच्या सरहद्दीवर आपल्या राज्यापैकीं लावाणक नांवाचा एक प्रदेश होता, तेथें वत्सराजाला शिकारीकरितां ह्मणून वासवदत्तेसह नेलें आणि तेथें उगीच रात्रीं छावणीला आग लावून वासवदत्तेला सैरंध्रीचा वेष देऊन प्रद्योताच्या घरीं नेऊन ठेविलें; व ती जळून मेल्याचा चहूंकडे पुकारा केला. तेव्हां वासवदत्तेची अडचण नाहींशी झाल्यावरून प्रद्योतानें आपली मुलगी पद्मावती वत्सराजाला दिली. यारीतीनें प्रद्योताला अनुकूल करून घेऊन यौगंधरायणानें वत्सराजाकरवीं दिग्विजय करवून त्याला सार्वभौमपदवी मिळवून दिली. ही कथा आह्मीं केलेलें मराठी पुस्तक 'बृहत्कथासागर,' याच्या दुसऱ्या भागांत सविस्तर वर्णन केली असून तिचा येथें संबंध आहे.

खास कामदाराला **रत्नावलीच्या** बापाकडे पाठविलें. [1] **बाभ्रव्यानें विक्रमबाहूची** भेट घेऊन त्याला **वासवदत्ता लावाणकांत** दग्ध झाल्याचें वर्तमान कळविलें. तेव्हां आतां कांहीं अडचण राहिली नाहीं, असें समजून **विक्रमबाहूनें वसुभूति** नांवाच्या आपल्या प्रधानाला बरोबर देऊन **रत्नावलीला वत्सराजाकडे** रवाना केलें. राजकन्या **रत्नावलि,** प्रधान **वसुभूति,** व **बाभ्रव्य;** इत्यादि मंडळी जहाजांत बसून **कौशांबीकडे** येत असतां वाटेंत वादळ होऊन जहाज फुटलें ! त्यामुळें वरील मंडळीची वाताहत झाली.

तशा संकटांत दैवयोगानें **रत्नावलीला** एक फळी मिळाली व तिच्या आश्रयानें ती पाण्यावर तरंगत होती. इतक्यांत **कौशांबीनगरींत** राहणारा **कुबेरगुप्त** नांवाचा एक सावकार कांहीं व्यापाराकरितां **सिंहलद्वीपास** गेला होता, तो तिकडून जहाजांत बसून परत **कौशांबीस** जात होता. तेव्हां फळीला धरून तरंगत असलेली ती राजकन्या त्याच्या दृष्टीस पडली. त्यानें तिला आपल्या जहाजावर घेऊन आपल्याबरोबर **कौशांबीस** आणून **यौगंधरायणाच्या** हवालीं केलें. **रत्नावलीच्या** गळ्यांत एक बहुमोल रत्नांचा हार होता. तो येवढ्याही आपत्तींतून तिच्या गळ्यांतून पडला नाहीं. **कुबेरगुप्ताला** ती कोणाची कोण हें मुळींच माहित नव्हतें. आणि

---

1. रत्नावलीचा बाप विक्रमबाहु हाही प्रद्योताप्रमाणेंच वासवदत्ता असतांना आपली मुलगी वत्सराजाला देण्याला नाराजी होता. म्हणून पद्मावतीला देण्याकरितां यौगंधरायणानें [वरच्या टिपेंत सांगितल्याप्रमाणें] वासवदत्ता मेल्याचा जो पुकारा केला होता, त्याच संधीस त्याणें विक्रमबाहूकडे बाभ्रव्याला पाठवून रत्नावलीची मागणी केली. हा संबंध ध्यानांत ठेवला पाहिजे.

अशा संकटावस्थेंत आपल्या आईबापाचें नांव सांगावें हें **रत्नावलीला**ही योग्य वाटलें नाहीं. तरी अनुमानानें—ही **सिंहलद्वीप**च्या राजाची कन्या असावी, असें त्या व्यापाऱ्यानें ताडलें होतें.

**योगंधरायणा**नें ही—तिची सर्व हकीकत ऐकून घेऊन तिच्या गळ्यांतल्या रत्नहारावरून—ती **विक्रमबाहूची** कन्या **रत्नावलीच** आहे, असें जाणलें. तथापि आपली मसलत सिद्ध होण्याकरितां खरें वर्तमान कोणाली न कळवितां—ही समुद्रांत सांपडलेली एक कन्या आहे, असें प्रसिद्ध करून त्यानें तिला राणी **वासवदत्ते**च्या स्वाधीन करून, तिचें उत्तमप्रकारें रक्षण करण्याविषयीं विनंती केली. **वासवदत्ता** स्वभावतःच मोठी उदार असून सदय होती. **रत्नावलीची** हकीकत ऐकून तिला फार दया आली. तिनें तिला आपल्याजवळ ठेवून घेतलें आणि कोणत्याही प्रकारें तिचें उणें पडूं दिलें नाहीं. **रत्नावलि वत्सराजा**च्या घरीं आल्यापासून तिचें खरें नांव अगदींच लुप्त झालें. सागरांत सांपडली, म्हणून **सागरिका** हेंच तिचें नांव पडलें ! असो.

**सागरिका वासवदत्ते**जवळ रहात असतां तिचे उत्तम गुण, आणि सुंदर रूप, पाहून—ही कोणातरी मोठ्याच्या कुळांतली असावी, असें सर्वांना वाटत होतें, तरी सांप्रत तिची दासीजनांतच गणना झाली होती ! **वासवदत्ते**ला आपल्या पतीचा म्हणजे **वत्सराजाचा** रंगेला स्वभाव माहीत होता. **वत्सराजा**ला बायकांचें मोठें वेड होतें. तेव्हां **सागरिके**सारखी सुंदर कन्या त्याच्या दृष्टीस पडली, तर—ही स्वारी तिच्या नादीं लागल्यावांचून राहणार नाहीं, असें, ती त्याच्या दृष्टीस न पडावी म्हणून राणीनें कडेकोट बंदोबस्त ठेविला होता. कांहीं

दिवसांनीं **कौशांबी**नगरींत प्रतिवार्षिक मदनमहोत्सव सुरु झाला. दरवर्षापेक्षां या वर्षी हा उत्सव फारच थाटामाटाचा झाला. कारण **वत्सराजानें** दिग्विजय करून या वर्षी सार्वभौम पदवीचा स्वीकार केला होता, यामुळें लोक फार आनंदांत होते.

एके दिवशीं हा मदनमहोत्सवाचा समारंभ पाहण्याकरितां **वत्सराज** आपला खुषमस्कऱ्या **वसंतक** याला बरोबर घेऊन गच्चीवर मौज पहात बसला होता. त्याच्या समोरच्या बागेंत व पटांगणांत नागरिक स्त्रीपुरुषांचे तऱ्हेतऱ्हेचे खेळ चालले होते. कांहीं स्त्रिया रंग खेळत होत्या; कोणी एकमेकींचे हात धरून नृत्य करीत होत्या; कोणी चेंडू खेळत होत्या; अशी एकच गर्दी उडाली होती.

तो समारंभ पाहून **वत्सराज** म्हणाला, 'मित्रा **वसंतका**, काय सांगूं ! सर्व शत्रूंचा पराभव केल्याकारणानें माझें राज्य अगदीं निष्कंटक झालें आहे. योग्य सचिवावर सर्व कार्यभार ठेविला आहे. प्रजांचें उत्तम प्रकारें लालनपालन केल्यामुळें व त्यांचे सर्व प्रकारचे उपसर्ग नाहींसे केल्यामुळें त्या मजवर फारच अनुरक्त आहेत. **प्रद्योता**ची मुलगी **पद्मावती** मला प्राप्त झाली. राणी **वासवदत्ता** तर मजवर अनुरक्त आहेच. दशांतून विलासिजनांला अत्यंत प्रिय असा हा वसंतऋतु प्राप्त झाला असून तुझ्यासारखा प्रिय मित्र जवळ आहे, तव्हां—कामाचे सर्व मनोरथ परिपूर्ण होवोत किंवा न होवोत, पण मला तर हा मोठा उत्सवाचा समय प्राप्त झाला आहे !'

हें ऐकून **वसंतक** म्हणाला, 'गड्या, तूं म्हणतोस तें खरें आहे; पण मला तर असें वाटतें कीं, हा उत्सव तुझ्याकरितां नाहीं किंवा त्या कामदेवाकरितांही नाहीं. तर ह्या एकट्या भटाकरितां (आपणासाठीं) हा मदनमहोत्सव आहे, असें वाटतें. आणि

उगीच आपल्याकरितां, असें म्हणतोस. बरें, तें असो. तूं अम्मळ इकडे पहा तर खरें. ह्या मद्य पिऊन उन्मत्त झालेल्या स्त्रिया आणि पुरुष हातांत रंगाच्या पिचकाऱ्या घेऊन एकमेकांच्या अंगावर रंग उडवीत व नाचत असल्यामुळें नगरवासीजनांला मोठें कौतुक वाटत आहे. स्वच्छंद रीतीनें वाजविलेल्या टाळ्यांच्या ध्वनीनें मोठमोठे रस्ते नादित केले आहेत. एकमेकांच्या अंगावर उडविलेल्या अबीर व गुलाल यानें दशदिशा व्याप्त करून सोडल्या आहेत !'

**वत्सराज** ह्मणाला, 'खरोखर, यावेळीं नगरवासिजनांचा आनंद अगदीं परमावधीला पोंचला आहे. जिकडेतिकडे उडविलेल्या गुलाल व कुंकुम अबीर इत्यादिकांच्या धुरळ्यानें रंगलेली, तसेंच स्त्रीपुरुषांनीं अंगावर धारण केलेल्या सोन्याच्या व रत्नांच्या अलंकारांनीं चहूंकडे चकचकीत दिसणारी, आणि आपल्या वैभवानें **कुबेराच्या** वैभवाला देखील मागें टाकणारी ही **कौशांबी**—सोन्याच्या रजांनीं खचल्याप्रमाणें—पहावी तिकडे पिंवळी जर्द दिसते आहे.'

**वसंतक** ह्मणाला, 'मित्रा, हाही दुसरा एक चमत्कार पहा. हे रंगेले पुरुष आपल्या हातांत पिचकाऱ्या घेऊन वश्यांच्या अंगावर रंगाच्या धारा सोडून त्यांना जर्जर करीत असल्यामुळें त्या पहा कशा सीत्कार सोडीत आहेत !'

**राजा** ह्मणाला, 'गड्या, ठीक बोललास. विखरलेल्या गुलालाच्या रजःकणांनीं अंधक झालेल्या या भागांत रत्नांच्या अलंकारांबरोबरच शोभणारी—नागाच्या फणेच्या आकाराची ही सुवर्णाची पिचकारी माझ्या दृष्टीस पडली, यामुळें यावेळीं मला पाताललोकाचें स्मरण होतें.'

**वसंतकालः** राजवाड्यांतील एक दासी **मदनिका** त्या

समाजांत दृष्टीस पडली. तिला पाहून **वसंतक** राजाला म्हणाला, 'ती पहा **मदनिका**. केवळ मदनासारखा **वसंता**चा अभिनय करून **चूतलतिके**सह नृत्य करीत इकडेच येत आहे. मित्रा, एकवेळ तिच्याकडे पहा तर खरें.'

इतक्यांत मदनलीलेचा अभिनय करून दाखवून एक शृंगारिक गीत गात गात **मदनिका** आणि **चूतलतिका** या दोघी दासी तेथें आल्या. **मदनिके**चें गायन ऐकून राजा म्हणाला, 'वाः! यांचा हा क्रीडारस किती तरी मधुर आहे! नृत्य करितांना सैल झालेल्या यांच्या वेण्यांतून फुलांचे गुच्छ पटापट खालीं पडताहेत. मद्यपानानें धुंद झाल्यमुळें पायांचे अस्ताव्यस्त पडून पैंजणांचा आवाज दुप्पट ऐकूं येतो आणि गळ्यांतील हार—नृत्य करीत असल्यामुळें—वरचेवर यांच्या छातीवर आपटतो आहे. क्रीडा करितांना फार पीडा झाली म्हणूनच कीं काय, स्तनांच्या भारानें वांकलेली कंवर खालच्या भागाला सोडून जाते आहे असें दिसतें!'

दासींची ती क्रीडा पाहून **वसंतका**लाही नाचण्याची हुक्की आली. तो **राजाला** म्हणाला, 'मित्रा, मीही कंवर बांधून यांच्यामध्यें जातों, आणि गाऊन व नाचून मदनमहोत्सव साजरा करतों!'

हें त्याचें भाषण ऐकून **राजाला** हसूं आलें, तथापि त्यानें त्याला आज्ञा दिली. तेव्हां **वसंतक** कंबर बांधून दासींच्या मध्यभागीं जाऊन त्यांना म्हणाला, 'अग **मदनिके**, अग **चूतलतिके**, तुम्ही गातां ती दुंबरी मलाही इवलिशी शिकवा.'

**मदनिका** म्हणाली, अरे 'भद्र्या! ही दुंबरी नव्हे,'

**वसंतक** म्हणाला, 'तर काय हें?'

मदनिका ह्मणाली, 'अरे मेल्या! हिला लावणी ह्मणतात समजलास?'

वसंतक ह्मणाला, 'अग, पण या गीताचें कार्य करितात? लाडू कीं करंज्या?'

यावर हंसून मदनिका ह्मणाली, 'हा मेल्या! याने कसले लाडू नि करंज्या? अरे, ही गाण्याची चीज आहे.'

हें ऐकून दुःखित होऊन वसंतक ह्मणाला, 'असें, असें, काय? एकून ही गाण्याची चीज आहे. ह्यांत खाण्याचें कांहीं नाहीं. तर ती मला गरीबाला कशाला पाहिजे? मी आपला आपल्या सोबत्या (राजा)जवळ जाऊन बसतों.'

असें बोलून तो वत्सराजाकडे जाऊं लागला. तेव्हां त्या दोघी दासी त्याच्या हाताला धरून—'मेल्या, खेळायला आला होतास, आणि आतां खेळल्याशिवाय कोठें जातोस?'—असें बोलून त्याला त्या मारूं लागल्या. तेव्हां त्यांच्या हातांतून सुटून वसंतक राजाच्या पाठीमागें जाऊन बसला. त्याला राजा ह्मणाला, 'कां बाबा खेळलास?'

वसंतक ह्मणाला, 'कसला खेळ नि कसचें कार्य! म्हणांचा जीव घेऊन पळून आलों! त्या बटकीच्या पोरींनीं मला रेपुरे केलें.'

इतक्यांत चूतलतिकेनें मदनिकेला राणीनें सांगितल्या कामाचें स्मरण दिलें. कारण, वासवदत्तेनें राजाला कांहीं निरोप सांगण्याकरितां मुद्दाम त्यांना पाठविलें होतें. तेव्हां—आह्मी पुष्कळवेळ खेळलों. गडे, फारवेळ झाला ह्मणून कदाचित् बाईसाहेब रागावतील. तर त्यांचा निरोप महाराजांना सांगून आपण परत जाऊंया. असें बोलून त्या दोघीही वत्सराजाजवळ येऊन ह्मणाल्या, 'महाराजांचा जयजयकार असो! बाईसाहेब आज्ञा करितीत,'—असें ह्मणून ओंठ चावून—

'नाहीं नाहीं. विनंती करितात,' असें ह्मणाल्या.

हें ऐकून हंसत हंसत **वत्सराज** ह्मणाला, 'अग **मद**
**निके**, प्रथम तुझ्या तोंडांतून निघालें तसेंच ह्मण.—आज्ञा क
रितात— हेंच माझ्या कानाला फार गोड लागतें ! त्यांतून
मदनमहोत्सवांत तर तें विशेषच प्रिय आहे. बरें, तुमच
बाईसाहेब काय आज्ञा करितात ती सांगा लवकर.'

यावर **वसंतक** रागावून **मदनिकेला** ह्मणाला, 'अ
दांडगे 'बटकोंचे पोरी ! काय कायग तुझ्या बाईसाहेब आ
करितात? सांग लौकर ऐकूंदे तर खरें.'

दासी ह्मणाल्या, 'महाराज, बाईसाहेबांची अशी विनं
आहे कीं,— आज मकरंदोद्यानांत तांबड्या अशोक वृक्षाखा
स्थापना केलेल्या भगवान् मदनाची पूजा करावयाची आं
तर तेथें महाराजांनीं अवश्य सन्निध असलें पाहिजे.'

हें ऐकून **राजा वसंतकाला** ह्मणाला, 'गड्या, का
सांगावें बुवा? उत्सवांत उत्सव आणि आनंदांत आनंद, अ
कांहीं सांप्रत गर्दी उडाली आहे.'

**वसंतक** ह्मणाला, 'तर मग ऊठ, तिकडेच जाऊं य
पूजेच्या सांगतेकरितां तुझ्या त्या राणीनें लाडवाचें वाणवी
दिलें तर माझेंही ब्राह्मणाचें आयतेंच काम होईल.' असें ह्मण
**राजाला** मकरंदोद्यानांत जाण्याविषयीं आग्रह करूं लागला.

तेव्हां—हा मी अत्तां आलोंच—असें सांगून **राजानें** दासीं
**वासवदत्तेकडे** पाठविलें आणि **वसंतकाला** बरोबर घेऊ
आपण मकरंदोद्यानांत गेला. त्या बागेची शोभा पाहू
**वसंतक** ह्मणाला, 'महाराज, पहा ! पहा ! ही बाग कि
रमणीय आहे ती. मलयाचलावरून येणाऱ्या सुगंधिक वाऱ्या
हालवेलेल्या उत्तम आंब्यांच्या मंजरी (मोहोर) त्या रजः

णानीं—आकाशांत केवळ छत ताणल्याप्रमाणें—वरचा भाग आच्छादित झाला आहे. फुलांतील मधु प्राशन करून उन्मत्त झालेल्या भ्रमरांच्या गुंजारवांत मधुर कोकिलांचा आलाप मिश्र झाला असल्यामुळें उत्तम संगीताप्रमाणें कानाला गोड लागणाऱ्या ह्या मंजुळ ध्वनीनें—तुझी स्वारी येते आहे ह्मणून, आपल्याकडचा सत्कारच करीत आहे कीं काय, असें हें मकरंदोद्यान विशेष शोभतें आहे.'

राजा ह्मणाला, 'खरेंच. हें फारच रमणीय दिसतें. पहा. येथें-पोंवळ्यासारखी लाल कांती धारण करणारे कोमल पल्लव भ्रमरांच्या शब्दांनीं अस्पष्ट भाषणच करीत आहेत कीं काय, असें दिसतें. मलयानिलानें प्रहार केल्यामुळें ज्यांच्या फांद्या हालत असून झिंगल्यासारखे दिसणारे हे वृक्ष वसंतोत्सवाचा समय प्राप्त झाल्यामुळें उन्मत्त झाल्या सारखे दिसतात ! आणखी आसमंतात् विखरलेल्या फुलांनीं हा बकुल वृक्ष—नुकताच गंडूषसेकरूप दोहद* केल्यासारखा दिसतो. मद्यानें किंचित् लाल झालेल्या तरुणीच्या मुखचंद्राचें † या चांफ्याला दर्शन झालें

---

* निरनिराळ्या झाडांला फुलें व फळें लवकर येण्याकरितां, अथवा तें वठलें असेल तर त्याला ताजेंतवानें करण्याकरितां, कांहीं उपाय सांगितले आहेत, त्यांला संस्कृतांत 'दोहद' ह्मणतात. वनस्पतिशास्त्रकारांनीं सांगितलेले दोहद निराळेच आहेत; पण रंगेल्या साहित्यशास्त्रकारांनींही चैनीचे कांहीं दोहद सांगितले आहेत. त्यांत बकुळीच्या झाडाला—तरुण व सुस्वरूप स्त्रीनें उत्तम मद्याचा घोट आपल्या तोंडांत भरून घेऊन त्या झाडावर टाकावा ह्मणजे त्याला फुलें येतात, असें सांगितलें आहे !

† वरच्या टिपेंत सांगितल्याप्रमाणेंच चांफ्याच्या झाडाला सुंदर स्त्रीचा मुखचंद्र दाखविणें, हें दोहद आहे.

असावें असें वाटतें. तसेंच अशोकवृक्षाला दोहद करितांना तरुण स्त्रीनें त्याच्यावर लाथ मारतेवेळीं झालेला— तिच्या पायांतील पैंजणांचा झणकारा ऐकून, 'ह्या भुंग्यांनीं आपल्या गुंजारवानें त्याचें अनुकरण केलें असावें असें वाटतें.'

हें ऐकून **वसंतक** ह्मणाला, ' मित्रा, हे भ्रमर पैंजणांच्या आवाजाचें अनुकरण करीत आहेत, असें नाहीं. तर खरोखरच येथें पैंजणांचा आवाज ऐकूं येत आहे. आणि यावरून मला तर तुझी राणी आली असावी, असें वाटतें.'

इतक्यांत **कांचनमाले**च्या हातांत पूजेचें साहित्य देऊन **सागरिके**सह **वासवदत्ता** तेथें आली. चालतां चालतां **वासवदत्ता कांचनमाले**ला ह्मणाली, ' अग, मदनाची पूजा करावयाची, तें स्थान अजून कितीसें दूर आहे ? '

**कांचनमाला** ह्मणाली, ' हें, अगदीं जवळच आहे. बाईसाहेबांनीं अद्याप पाहिलें नाहीं काय ? ही ती मोगरीची वेल; जी स्वतः आपल्या हातानें आपण लाविली होती. ही निरंतर फुलांनीं डवरलेली असते. ही दुसरी नवमालिकेची वेल. हिला पाहिजे त्या दिवसांत फुलांचा बहार येईल, असें कोणीं दोहद सांगितलें आहे. आणि त्यावर विश्वास ठेवून **महाराज** दररोज तिच्याविषयीं फार मेहनत घेतात. आतां ह्या वेलीच्या पुढें गेलें ह्मणजे तो पुढें दिसतो आहे कीं नाहीं, तोच तांबडा अशोक, आणि त्याच्याच खालीं पूजा करायची आहे.' असें बोलत बोलत **वासवदत्ता** त्या अशोक वृक्षाजवळ येऊन पोहोंचली.

इतक्यांत **सागरिका** पुढें होऊन ह्मणाली, ' बाईसाहेब ही पूजेची सर्व तयारी केली आहे.'

**सागरिके**ला पाहून **वासवदत्ता** ओंठ चावून मनां

ह्मणाली, अरे, हा दासींचा केवढा प्रमाद आहे पहा!' ही पोर (सागरिका) ज्यांच्या दृष्टी पडूं नये ह्मणून मी इतके दिवस खबरदारी ठेविली, ती अगदीं फुकट गेली. ही आज आयतीच त्यांच्या (राजाच्या) दृष्टीस पडणार!

सागरिका वासवदत्तेबरोबरच आली होती; पण उत्सवाच्या गडबडींत त्याचें तिला कांहीं स्मरण राहिलें नाहीं. ती वत्सराजाच्या दृष्टीस पडूंनये ह्मणून राणी फार जपत असे. आतां येथें वत्सराज येणार व ती त्याच्या दृष्टीस पडेल, ह्मणून सागरिकेला तेथून युक्तीनें घालवून देण्याचा विचार करून वासवदत्ता ह्मणाली, 'अग सागरिके, आज अंतःपुरांतील सर्व सेवक मदनमहोत्सवांत रमले आहेत. अशावेळीं त्या मैनेला खेळवीत बसावयाचें सोडून तूं येथें कशाला आलीस? बरें, आतां तरी लौकर जा तिकडे. हें तुझ्या हातांतलें पूजेचें साहित्य कांचनमालेजवळ दे.'

हा राणीचा हुकूम ऐकून सागरिकेला फार वाईट वाटलें. तिच्या मनांत जायाचें नव्हतें; पण करते काय! हुकुमाप्रमाणें पूजेचें ताट कांचनमालेच्या हातांत देऊन ती परत जाण्यास निघाली, आणि वासवदत्तेच्या दृष्टी आड जाऊन आपल्या मनांत म्हणाली, बाईसाहेबांनीं मला मैनेला खेळवावयास सांगितलें आहे. मी तर तिला सुसंगतेच्या स्वाधीन करून इकडे आलें आहे; तेव्हां ती तिला खेळवील असेलच. आमच्या बाबांच्या येथें अंतःपुरांत भगवान् अनंगाची पूजा करीत असत, तशीच येथें बाईसाहेबही करतात कीं काय, तें आपण घटकाभर येथेंच आड उभें राहून पहावें. हो! तिकडे पूजेची तयारी होईपर्यंत आपणही थोडीशीं अनंगाच्या पूजेकरितां फुलें तोडावीं,

असा विचार करून **सागरिका** तेथल्या तेथें फुलें तोडूं लागली

इकडे **वासवदत्तेनें** अशोकवृक्षाच्या मूळांत भगवान् प्रद्युम्नाची ( मदनाची ) स्थापना करावयास सांगितलें. त्याप्रमाणें **कांचनमालेनें** पूर्वी तयार केलेल्या पीठावर मदनाची स्थापना केली. **वासवदत्ता** सर्व तयारी करून राजाची वाट पाहत होती. इतक्यांत तिच्या पैंजणांचा शब्द ऐकून **वसंतकानें** राजाला सुचविलें. तेव्हां **वत्सराज** तेथें येऊन **वासवदत्तेची** सुंदर मूर्ति पाहून **वसंतकाला** ह्मणाला, ' गड्या, हो पहा राणी **वासवदत्ता** ! यावेळीं ही किती तरी सुंदर दिसत आहे. फुलाप्रमाणें हिची मूर्ति सुकुमार असून कंबर अतिशय बारीक असल्यामुळें स्तनांच्या भारानें किंचित् वांकलेली अशी मदनाच्याजवळ उभी राहिलेली इची ही मनोहर आकृति—मदनाच्या मूर्तीच्या बाजूला असलेल्या धनुष्यवल्लीसारखी दिसते. '

**वसंतकाशीं** असें बोलून राजा **वासवदत्तेजवळ** गेला आणि तिला म्हणाला, ' प्रिये **वासवदत्ते** ! काय आज्ञा आहे ?'

एकाएकीं **वत्सराज** आला, हें पाहून अम्मळ लाजल्यासारखें करून **वासवदत्ता** म्हणाली, ' आर्यपुत्राचा जयजयकार असो ! हें येथें आसन आहे. याला अलंकृत करावें. '

नंतर राजा आसनावर बसल्यावर **कांचनमालेनें** सांगितल्यावरून **वासवदत्ता** स्वतः आपल्या हातानें मदनाची पूजा करावयास लागली. त्यावेळची शोभा अवलोकन करून **वत्सराज** म्हणाला, ' प्रिये **वासवदत्ते**, डोक्यावरून अभ्यंग स्नान केल्यामुळें आधींच तुझें शरीर विशेष तकतकीत दिसत आहे. त्यांतून हा लाल कुसुंबी शालू नेसली आहेस, त्याच्या योगानें फारच शोभायमान दिसणारी यावेळीं मदनाची पूजा करीत बसलेली तूं—पोंवळ्याच्या वृक्षापासून निघालेल्या कोमल वेली-

सारखी दिसतेस. 'आणि मदनाच्या पूजेच्या निमित्तानें आपल्या कोमल व आरक्त हातानें या अशोकाला स्पर्श करतेस तेव्हां—या वृक्षाला अत्यंत मृदु असे दुसरे कोमल पल्लव फुटले आहेत. कीं काय, असें दिसतें. आणखी खरोखरच असेंही वाटतें कीं, हा भगवान् अनंग ( मदन ) आपल्या अंगरहित * स्थितीची यावेळीं फार निंदा करीत असेल ! कारण, अंग नसल्यामुळें तुझ्या कोमल हाताच्या स्पर्शाचें सुख अनुभविण्याचें याच्या नशिबीं नाहींसें झालें !'

याप्रमाणें **राजा वासवदत्तेचें** वर्णन करीत आहे, इतक्यांत **कांचनमाला** म्हणाली, 'बाईसाहेब, या शरीररहित मदनाची तर पूजा झालीच. अतां प्रत्यक्ष मदनमूर्तीची (**वत्सराजाची**) ही यथायोग्य पूजा करावी !' **वासवदत्तेच्या** मनांत होतें तेंच **कांचनमालेनें** सुचविलें. तेव्हां हंसून **वासवदत्ता** कौतुकानें **राजाची** पूजा करूं लागली.

इकडे **सागरिकेचें** फुलें वेंचण्याकडेसच लक्ष्य लागलें होतें. कांहीं वेळानें तिला आठवण झाल्यावर— अरे, रे ! मी वेडी खरी. फुलें वेंचण्याच्याच नादांत फारवेळ गुंतून राहिलें. बरें, झालें तें झालें. पण आतां या झाडाच्या आड उभें राहून तिकडे कसा काय पूजेचा समारंभ चालला आहे, तो पाहिला पाहिजे,— असा विचार करून ती झाडाच्या आड उभी राहिली, आणि **वत्सराजाला** पाहून ह्मणाली, 'अग बाई ! येथें हा मदन प्रत्यक्ष उभा आ-

* प्राचीन ग्रन्थकारांनीं काम ही एक देवता असून तो मूर्तिमान् असें मानलें आहे. त्याला महादेवानें जाळल्यामुळें त्याचें अंग नाहींसें झालें, तेव्हांपासून तो अंगरहित अशा स्थितींत आहे. व ह्मणूनच त्याला 'अनंग' ह्मणतात.

ला? हा एक मोठा चमत्कारच ह्मणायचा. आमच्या बाबांच्या येथें याचें चित्र काढून पूजित असत. आणि येथें तर आज मी प्रत्यक्षच याला पाहिलें! आपल्याला याच्याजवळ जाण्यास तर मिळायाचें नाहीं, तेव्हां ह्या फुलांनीं येथूनच त्याची पूजा करावी.'

असा विचार करून मदनाच्या उद्देशानें पुष्पांजली अर्पण करून हात जोडून ह्मणाली, 'भगवन् कुसुमायुधा' तुला नमस्कार असो! हें तुझें दर्शन मला मंगलकारक होऊं दे. जें पहावें अशी इच्छा होती, तें तुझें रूप पाहिलें; पण हें तुझें दर्शन निष्फल मात्र होऊं नये.'

याप्रमाणें प्रार्थना करून नमस्कार करून पुनः ह्मणाली, 'अग बाई, हें मोठेंच आश्चर्य. कितीवेळ पाहिली तरी याची मूर्ति पुनः पुनः पहावीशीच वाटते! पण आतां आपण येथें फारवेळ राहून उपयोग नाहीं. कोणीं पाहिलें नाहीं तों येथून अंतःपुरांत जावें हें बरें.' असा विचार करून कांहीं पावलें पुढें जाऊन पुनः उभी राहिली.

इकडे **वासवदत्तेनें वत्सराजाची** यथासांग पूजा केली. नंतर **वसंतकाला** गंध, पुष्प, अक्षता, दक्षिणा वगैरे देऊन व्रताच्या सांगतेकरितां, लाडवांचें वायन दिलें. तें घेऊन **वसंतकानें** मोठ्या हर्षानें राणीला आशीर्वाद दिला. इतक्यांत सायंकालचा समय झाला असें पाहून **वैतालिकानें**† सांगितलें, 'महाराज, नक्षत्रादिकांच्या प्रकाशाला झांकून टाकणारा भगवान् सूर्य आकाशाच्या पलीकडे गेला आणि हा सायंकाल प्राप्त झाला, असें पाहून मांडलिक राजांचा व नक्षत्रांचा समुदाय कमला-

† राजेलोकांजवळ वेळोवेळीं त्यांना—स्नान, जेवणखाण, वगैरेच्या वेळा सूचविणारे लोक असतात, त्यांना 'वैतालिक' म्हणतात.

च्या कांतीला हरण करणाऱ्या आपल्या पायांचें व उदय पावणाऱ्या चंद्राच्या किरणांचें सेवन करण्याकरितां प्राप्त होऊन प्रेमळ दृष्टीनें उभयतांकडे अवलोकन करीत आहे !'

**सागरिके**ला ह्यावेळपर्यंत **वत्सराजा**ची ओळख नव्हती. बापानें आपल्याला **वत्सराजा**ला देऊं केलें होतें, एवढें मात्र तिला माहीत होतें; पण त्याची प्रत्यक्ष कांहींच माहिती नव्हती. **वैतालिका**च्या पुकारण्यावरून—राजा **उदयन** म्हणतात, तो हाच व यालाच आपल्या बापानें आपणाला देण्याचा निश्चय केला होता, असें समजल्यावरून हर्ष पावून **सागरिका** मनांत म्हणाली, असो. दुसऱ्याची चाकरी करुन माझें शरीर कृश झालें आहे, व मनही अगदीं उदास झालें आहे, तरी अशा स्थितींत देखील ह्याच्या ( राजाच्या ) दर्शनानें मला हुषारी वाटली.

इतक्यांत—'उत्सवाकडे मन गुंतल्यामुळें आम्हीं, संध्या-कालाचा अतिक्रम झाला तो देखील पाहिला नाहीं. हें पहा, पांढरें फिक्क दिसणाऱ्या मुखानें—आपल्या हृदयवल्लभाचें आगमन जशी रमणी सुचविते तशी—उदयपर्वताच्या शिखराच्या आड चंद्रमा आला, असें ही पूर्व दिशा उजळपणानें सुचवीत आहे. तर प्रिये, आतां आपण अंतर्गृहांत जाऊं !'—असें बोलून राजा **वासवदत्ते**सह जनानखान्यांत जाण्यास निघाला.

**सागरिका राजा**कडे टक लावून पहात उभी राहिली होती ती आपल्याशींच म्हणाली, काय मी कपाळकुटकी ! मी ही मूर्ति डोळे भर पाहणार, म्हटलें तर त्याला देखील अवकाश नाहीं ! बरें, असो ! बाईसाहेब जाण्यापूर्वी आपण अंतःपुरांत जावें, हें बरें. असें, बोलत बोलत ती लौकर पुढें निघून गेली.

इकडे राजाही वासवदत्तेचें वर्णन करीत होत्साता ह्मणाला, 'प्रिये, ह्या चंद्राच्या शोभेला तुच्छ करणाऱ्या तुझ्या मुखचंद्रानें जिंकलें म्हणूनच कीं काय, हीं कमलें (सूर्यविकासी) एकदम निस्तेज होत आहेत. तुझ्याबरोबरच्या ह्या स्त्रियांच्या गाण्याचा मधुर शब्द श्रवण करून लज्जित झाल्या म्हणूनच कीं काय, त्या भ्रमरिणी कमलाच्या कळ्यांत हळूच दडून बसत आहेत.' अशी तिची स्तुति करीत करीत अंतःपुरांत गेला.

इकडे सुसंगता सागरिकेची वाट पाहत बसली होती. आपल्या हातांत मैनेचा पिंजरा देऊन ही गेली कुठें ? म्हणून सुसंगता तिचा शोध करण्याच्या विचारांत होती. इतक्यांत निपुणिका नांवाची दुसरी एक दासी तिला भेटली. ती हिच्याशीं नबोलतां आपल्याच नादांत चालली होती. तिला हाक मारून सुसंगतेनें—अशी साश्चर्य मुद्रेनें कोणीकडे चाललीस ? म्हणून—विचारिलें; तेव्हां 'आज श्रीपर्वताहून कोणी श्रीखंडदास नांवाचा धार्मिक मनुष्य आला होता, त्याजपासून—पाहिजे त्यावेळीं पाहिजे त्या वेलीला फुलें व फळें येण्याची विद्या शिकून महाराजांनीं आपण लाविलेल्या नवमालिकेच्या वेलीवर तिचा प्रयोग करून अनुभव पाहण्याचें योजिलें आहे; तेव्हां—त्या वेलीला कसा काय फुलांचा बहार येतो तो पाहून ये, असें मला बाईसाहेबांनीं सांगितलें आहे, ह्मणून तिकडे जातें. 'बरें, पण तूं कोणीकडे चाललीस ?' असें निपुणिकेनें विचारिलें.

यावर सुसंगता म्हणाली, 'मी माझी प्रियसखी सागरिका इचा शोध करावयास निघालें आहे.'

निपुणिका म्हणाली, 'बरें जा. हातांत चित्रें काढण्याची पाटी व रंगाचे प्याले घेऊन ती अत्तांच कदलीगृहांत गेलेली म्यां पाहिली.' असें सांगून निपुणिका पुढें निघून गेली

इकडे **सुसंगता**ही कदलीगृहाकडे निघाली. **सागरिका** **राजा**ला पाहिल्यापासून अगदीं वेडी झाली होती. त्याचें प्रत्यक्ष दर्शन तर पुनः होणार नाहींच; पण चित्रांत तरी त्याला पहावें, म्हणून ती कदलीगृहांत एकांतीं राजाचें चित्र काढीत बसली होती. सांप्रत आपण बटिक झालें आहें. तेव्हां अशा स्थितींत **राजा**ची भेट होणें कठीण, असा विचार करून ती आपल्याशींच म्हणाली, वेड्या मना, अम्मळ शांत हो. उगीच दुर्लभ मनुष्याची इच्छा करण्याचा हट्ट धरून उपयोग काय ? व्यर्थ आयांस मात्र भोगावे लागणार. आणखी एका अर्थी तूं किती तरी मूढ आहेस बरें ? ज्याला ( **राजाला** ) एकवेळ पाहिल्यामुळें तुला इतके संताप भोगावे लागले, त्याचेंच पुनः दर्शन घेण्याची इच्छा करतेंस याला काय म्हणावें ? अरे कठोर मना, जन्मापासून जिच्या सहवासानें वाढलेंस त्या मला सोडून, क्षणभर परिचय झालेल्या मनुष्याकडे (**राजा**कडे) धांवतेंस याची तुला लाज कशी वाटत नाहीं? किंवा यांत तुझा तरी काय दोष आहे ? निष्ठुर मदनाच्या बाणाला भिऊन तूं मला सोडून तिकडे जाण्याचा बेत केला असशील ! हो, खरेंच मी अबला आहें. तेव्हां माझ्या हातून तुझें रक्षण होईल असें तुला कसें वाटेल! बरें असो. आतां त्या मदनाचीच चांगली खरड काढतें.

असें बोलून जमिनीवर गुडघे टेंकून हात जोडून मदनाला म्हणाली, 'हे भगवन् कुसुमायुधा, तूं देव, दैत्य, मनुष्य या सर्वांस जिंकणारा असा मोठा शूर असून मज अबलेवर अस्त्रप्रहार करितोस, याची तुला लाज कशी वाटत नाहीं? असो. तूंच जेव्हां माझ्यावर प्रतिकूळ झालास, तेव्हां ह्या दुर्निमित्तावरून माझें कपाळफुटकीचें मरण जवळ आलें आहे, असें वाटतें ! मग उगीच

तुला तरी बोलून काय उपयोग? येथें कोणी आलें नाहीं तोंपर्यंत त्या हृदयवल्लभाचें ( राजाचें ) चित्र काढण्याचें योजलें आहे तें डोळेभर पाहून मग वाटेल तसें करावें. जरी अत्यंत भयानें माझ्या हाताचा पंजा कांपत आहे, तरी त्या प्रियपुरुषाची मूर्ति दुसऱ्या रीतीनें दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं, म्हणून कशीतरी त्याची तसबीर काढून पाहतें.' असें बोलून **सागरिका राजाची** तसबीर काढीत बसली.

"इतक्यांत तिचा शोध करीत करीत तिची मैत्रीण **सुसंगता** तेथें आली. **सागरिकेचें** मन तसबीर काढण्यांत रमलें होतें. **सुसंगता** अगदीं तिच्याजवळ येऊन उभी राहिली, तरी तिनें तिच्याकडे पाहिलें नाहीं. तेव्हां **सुसंगता** तिच्या पाठीकडे येऊन मुकाट्यानें उभी राहिली, आणि लक्ष्य लावून ती काय काढीत आहे, हें पहात होती. थोडक्याच वेळांत **सागरिकेनें** आपला हृदयवल्लभ **वत्सराज** याची तसबिर काढण्याचें काम पुरें केलें, आणि त्याचे निरनिराळे सुंदर अवयव लक्ष्यपूर्वक पाहूं लागली. पण तिच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु पडत होते, यामुळें तिला तसबीर नीटशी दिसेना."

तिच्या पाठीकडे जवळ उभी राहिलेली **सुसंगता** मनांत म्हणाली, हिचें मन तसबीर काढण्यांत कितीतरी गुंग झालें आहे! मी इतका वेळ येथें उभी राहिलें; तरी हिनें अद्याप माझ्याकडे पाहिलें देखील नाहीं. बरें, असो. हिच्या आनंदास आपण अंतराय होऊं नये; पण ही काय काढते आहे, तें तरी पहावें. असा विचार करून अंमळ ओणवी होऊन तसबिरीकडे पाहूं लागली.

तेव्हां ती तिनें काढलेली तसबीर **वत्सराजाचीच** आहे असें पाहून मनांत म्हणाली, काय! हिनें तर आमच्याम-

हाराजांची तसबीर काढली आहे. वाहवा! शाबास! सागरिके, शाबास! एकूण योग्य ठिकाणीं तुझें मन बसलें आहे, हें पाहून मला फार आनंद होतो. खरेंच आहे; कमलाकराला सोडून राजहंसी दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं रममाण होणार आहे.

**सुसंगता** याप्रमाणें आपल्या मनांत आनंदित होत आहे, इतक्यांत अश्रु पुसण्याकरितां **सागरिकेनें** सहज मान वर केली, तों **सुसंगता** तिच्या दृष्टीस पडली. तेव्हां झटदिशीं चित्राची पाटी आपल्या पदराखालीं झांकून गालांतल्या गालांत हंसून **सागरिका** म्हणाली, 'प्रियसखे सुसंगते, तूं केव्हांशी आलीस?'

असें बोलत बोलत **सागरिका** उठली, आणि तिचा हात धरून तिला बसवून घेत होती, इतक्यांत **सुसंगतेनें** हळूच तसबिरीची पाटी तिच्याकडून हिसकून घेतली, आणि पुन्हा तसबिरीकडे पाहून **सागरिकेला** म्हणाली, 'सखे, तूं हें कोणाचें चित्र काढिलें आहेस?'

**सागरिका** अंमळ लज्जित होऊन म्हणाली, 'अग, दुसरें कोणाचें असणार? आतांशीं मदनमहोत्सव चालिला आहे, म्हणून भगवान् अनंगाचें चित्र काढिलें.'

हें ऐकून **सुसंगता** हंसून म्हणाली, 'एकून तुझ्या हाताची सफाई विशेष आहे खरी! अग, पण हें चित्र असें ओकेंसें कसें दिसतें? हो. आतां समजलें. तूं एकट्या **मदनाचेंच** चित्र काढलें आहेस; तेव्हां **रती** जवळ नसल्यामुळें हा उघडा दिसतो. म्हणून मी याच्याजवळ **रतीचें** चित्र काढतें.'

असें सांगून **सागरिकेच्या** हातांतली लेखणी घेऊन तिनें राजाजवळ तिचेंच हुबेहुब चित्र काढलें. तेव्हां—हिनें प्रत्यक्ष आपलें चित्र काढलें आहे हें पाहून **सागरिका** म्हणाली, 'गडे, तूं येथें माझें कां चित्र काढलेंस?'

हें ऐकून **सुसंगता** हंसत हंसत ह्मणाली, 'अग, उगीच माझ्यावर कां रागावतेस? जसें तूं **कामदेवाचें** चित्र काढलेंस तसेंच मीं **रत्नाचें** चित्र काढलें. बरें पण, अतां कितीतरी माझ्याजवळ छपविशील? उगीच आढेवेढे घेऊं नकोस. काय असेल तें खरें सांग; ह्मणजे पुढची तजवीज करण्याला ठीक पडेल.'

हें तिचें भाषण ऐकून **सागरिका** मनांत ह्मणाली, हिला तर माझी सगळी हकीगत जाणली असें वाटतें. आतां इच्याजवळ चोरून ठेवून उपयोग काय? तेव्हां हिला सांगावें हें बरें.

असा विचार करून ती **सुसंगते**ला ह्मणाली, 'गडे, तुला मी माझी स्थिति सारी सांगतें; पण खरें ह्मणशील तर मला फारच लाज वाटते बाई! पण तूं एवढें तरी कर कीं, यांतलें एक अक्षर देखील दुसऱ्याला न कळेल अशी खबरदारी ठेव.'

**सुसंगता** ह्मणाली, 'सखे, पुरे आतां. उगीच लाजूं नकोस. असल्या उत्तम कन्यारत्नाचा तशा योग्यवराच्या ठिकाणीं अभिलाष होणें, हें अगदीं स्वाभाविक आहे. तथापि हा वृत्तांत कोणाला न कळण्याविषयीं मी सावधगिरी ठेवीन. होय, पण ही चतुर मैना मात्र कदाचित् आमच्या संवादांतील कांहीं शब्द तोडांत धरून दुसऱ्या देखत बोलेल तर कोणास ठाऊक.'

ह्या प्रमाणें दोघींचा संवाद चालला असतां, **सागरिकेला** राजाचें स्मरण होऊन ती फारच उत्सुक झाली. मदनाग्नीनें तिच्या सर्वांगाचा दाह होऊं लागला. **सुसंगते**नें तिच्या हृदयावर हात ठेवून तिचें समाधान केलें, आणि जवळच्या तळ्यांतल्या कमलिनीच्या शीतल पानें आणून त्यांचा बिछाना केला, § आणि

§ काम उत्कट झाला म्हणजे त्यापासून जी अंगाची काहिली होते, तिला 'कामज्वर' म्हणतात. व तो कमलिनीच्या पानांव

त्यावर सागरिकेला निजवून तिच्या अंगावरही पानें घातलीं व कमळाच्या देंठांची कंकणें करून तिच्या हातांत घातलीं. तिच्या मदनाग्नीचा दाह शांत होईल म्हणून वर सांगितल्या प्रमाणें उपाय केले; पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

तेव्हां **सागरिका** म्हणाली, 'बाई **सुसंगते**, हीं कमलिनीचीं पानें माझ्या अंगावरून काढून टाक करीं. आणि हीं कमळाच्या देंठांचीं कंकणें, तरी कशाला पाहिजेत? यांनीं कांहीं व्हायचें नाहीं. उगीच तूं आपल्याला कां श्रम करून घेतेस? मी खरेंच सांगतें. दुर्लभ मनुष्यावर प्रेम बसलेलें असून स्वभाव अतिशय लाजाळू, तशांतून माझें जिणें पराधीन. तेव्हां माझे प्रिय मैत्रिणी, हें प्रेम विषम जाहलें आहे. यावेळीं अशा पराधीनपणापेक्षां मरणाचाच आश्रय करावा, हें चांगलें?'

असें बोलत असतां मूर्च्छा येऊन ती निश्चेष्ट पडली. **सुसंगता** वारा घालून तिला सावध करीत होती, इतक्यांत राजवाड्यांतला पाळींव नीळ अकस्मात् गळ्यांतली सांखळी तोडून सुटला आणि त्यानें जिकडे तिकडे एकच धांदल करून सोडिली. त्याला धरण्याकरितां मागें लागलेले लोक मोठ्यानें ओरडून म्हणाले, 'अरे, हा पहा नीळ सुटला. सुवर्णमय तुटक्या सांखळीचा भाग आपल्या बरोबर ओढीत ओढीत या दारांतून त्या दारांत याप्रमाणें हा राजवाड्यांत सर्वत्र फिरतो आहे. कंबरेंतल्या लहान लहान घांटांच्या आवाजानें लोकांच्या कानठाळ्या बसवीत असून स्त्रियांना अतिशय भय उत्पन्न करणारा हा वानर आतां राजाच्या खाशा पागेंत जातो आहे. अंतःपुरांतल्या लोकांचें

---

निजणें, त्यांचें पांघरूण घेणें व त्यांचा वास घेणें यांच्या योगानें शांत होतो, असें साहित्यशास्त्रकारांचें मत आहे.

याच्या पुढें काहीं चालत नाहीं. बिचाऱ्या चोपदारानें तर जणुं काय लज्जेनेंच कंचुक धारण केलें आहे. अंतःपुरांतल्या खुजांनीं* आपल्यावरच काहीं तरी अरिष्ट येईल म्हणून याच्या पुढें तोंड देखील दाखविलें नाहीं. तेव्हां आतां हा काय करील कोणास ठाऊक ?'

हा गलबला ऐकून **सुसंगता** गडबडीनें उठली, आणि **सागरिके**ला हातीं धरून—वानराच्या भयानें जवळच्या तमाल वृक्षाच्या आड जाऊन दोघीही बसल्या. या गडबडींत चित्राची पाटी तेथेंच पडली होती. तिची आठवण होऊन **सागरिका सुसंगते**ला म्हणाली, 'गडे, तूं माझा चित्रफलक कोठें टाकलास ? कदाचित् तो कोणाच्या हातीं सांपडला तर पुढें काय होईल ?'

**सुसंगता** म्हणाली, 'पुरे बाई, तुझा विचार. अजून त्या चित्राच्या फळीकडेच तुझें लक्ष्य लागलें आहे. त्याला घेऊन काय करणार ? यथेच्छ दहींभात खाऊन मस्त झालेला हा दुष्ट वानर पहा इकडेच येत आहे. आणि त्याला पाहून ही चतुर मैना उडून गेली. तर आधीं तिच्या पाठीस लागलें पाहिजे. नाहींतर ती कदाचित् तुझें आणि माझें भाषण झालें त्यांतिलें काहींतरी दुसऱ्याला सांगेल' असें बोलून दोघीही त्या मैनेच्या मागून जाण्याचा विचार करीत होत्या, इतक्यांत—'आश्चर्य, आश्चर्य ! ओहो ! मोठेंच आश्चर्य !' असे शब्द त्यांस ऐकूं आले.

तें ऐकून **सागरिका** म्हणाली, 'गडे सुसंगते, तो मेला वानर इकडेच येत आहे असें वाटतें.'

---

* पूर्वकाळीं राजेलोकांच्या जनानखान्यांतील कामें वगैरे करण्याकरितां खुजीं माणसें ठेवण्याची चाल होती. तुर्कांच्या सुलतानाच्या येथें अद्याप ही व्यवस्था चालू आहे असें सांगतात !

हें ऐकून **सुसंगतेला** हसुं आलें. ती ह्मणाली. 'अग मित्रे, उगीच घावरी होऊं नकोस. हे माणसाच्या तोंडचे शब्द आहेत. वानराला कोठें असें बोलतां येतें का? बहुतकरून महाराजांचा खेळगडी **वसंतक** याचा हा शब्द असावा.'

**सुसंगता** असें बोलत आहे, इतक्यांत **वसंतक**ही तेथें येऊन पोहोंचला. **श्रीखंडदास** नांवाच्या एका धार्मिक साधूनें वृक्षाला पाहिजे तेव्हां फळें व पुष्पें येण्याची कृति **वत्सराजाला** शिकविली होती. राजानें अनुभव पाहण्याकरितां त्याच्या बागेतल्या एका मोगरीच्या वेलीला त्या साधूनें सांगितल्याप्रमाणें उपचार केले होते. त्याप्रमाणें त्या वेलीला अकालींच फुलांचा मोठा बहार आला कीं काय, तें पाहण्याकरितां **वसंतकाला राजानें** पाठविलें होतें. त्याप्रमाणें **वसंतकानें** ती वेल फुलांनीं डंवरली आहे, हा चमत्कार प्रत्यक्ष पाहून, नंतर **राजाला** तिकडे येण्यास सांगून तो आपण पुढें आला होता. तो आपल्याशींच—वाहवा! मोठेंच आश्चर्य! शाबास **श्रीखंडदासा**! शाबास! विद्या असावी तर अशीच. तूं मोठा धार्मिक खरा, असें ह्मणत होता.

हे **वसंतकाचे** उद्गार ऐकून **सागरिकेला** तेथेंच उभें राहावेंसें वाटलें. तिच्या मनांत **वसंतक** आला तेव्हां कदाचित् **राजाही** तेथें येईल; तर आपण त्याला पहावें असें होतें; पण **सुसंगतेनें** 'त्या मैनेच्या शोधास जाऊंया' असें ह्मणून तिला बरोबर नेलें.

त्या दोघीही निघून गेल्या तरी **वसंतक** एकटाच **श्रीखंडदासा**ची आणि त्या वेलीची तारीफ करीत होता. इतक्यांत **राजाही** नवमालिकेला पाहण्याकरितां मोठ्या आनंदानें तेथेंच आला. त्याला त्या वेलीचें फारच कौतुक वाटलें. तो तिची तारीफ करीत करीत म्हणाला, 'काय त्या वेलीची शोभा! ते ताठर आणि

टपोरे पांढरे सफेत कळे आल्यामुळें ती कामव्यथेनें पीडित झालेल्या तरुण स्त्रीप्रमाणें पांढरी दिसत असून, तिला वरचेवर जांभया येत आहेत कीं काय, असें वाटतें; आणि क्षणोक्षणीं वाऱ्याच्या योगानें ती जणुं काय श्वासोच्छ्वास सोडीत आहे असें दिसतें. मजवर अनुरक्त झालेल्या सकाम स्त्रीप्रमाणें दिसणाऱ्या या वेलीला दाखवून खरोखर मी आज राणीचें* तोंड रागानें लाल करून टाकीन.'

राजा असें बोलत आहे, इतक्यांत **वसंतक** एकाएकीं पुढें येऊन पूर्वीप्रमाणें **श्रीखंडदासा**ची तारीफ करूं लागला. ती ऐकून **राजा** म्हणाला, 'खरेंच—मणी, मंत्र, औषधी, इत्यादिकांचा प्रभाव मोठा विचित्र आहे. भगवान् **विष्णूच्या** गळ्यांत **कौस्तुभ** नांवाचा मणी आहे. त्यामुळें दैत्यादि शत्रूंनीं त्याच्यावर अनेक घातक शस्त्रास्त्रांचे प्रयोग केले, तरी त्यापासून कांहीं होत नाहीं. मंत्राच्या सामर्थ्यानें सर्पासारख्या क्रूर प्राण्याला देखील लोक बंधन करूं शकतात. पूर्वीं रावण, इंद्रजित इत्यादि राक्षसांनीं लक्ष्मणाला व पुष्कळ वानरांला मारिलें होतें. पण द्रोणागिरीवरच्या औषधींनीं ते पुनः जीवंत झाले. तेव्हां त्यांचा प्रभाव अतर्क्य आहे.' असें बोलून **वत्सराज वसंतकाला** बरोबर घेऊन त्या वेलीची शोभा पाहत बसला.

इतक्यांत जवळच्या बकुळीच्या झाडावर **सुसंगते**च्या हातांतून सुटलेली मैना जाऊन बसली होती; ती **सुसंगते**चा आणि **सागरिके**चा जो संवाद झाला, त्यांतले शब्द स्वेच्छेनें बोलत होती. ते ऐकून **वसंतकाला** प्रथम भय वाटलें. झाडावर कोणी माणूस तर दिसत नाहीं. आणि थेट माणसासारखें बोलणें

---

* दुसऱ्या स्त्रीवर पतीचें लक्ष्य आहे असें समजलें तर नायकेला राग येणें स्वाभाविकच आहे.

ऐकूं येतें, तेव्हां हें भूत असेल, असें त्याला वाटलें. तो राजाला 'पुढें जाऊं नको' ह्मणाला. तेव्हां त्याचा धिःकार करून—येथें भूत यावयाचें नाहीं, असें राजा ह्मणाला. वसंतकानें—प्रत्यक्ष तूंच एकदां ऐकून पहा, असें सांगितल्यावरून राजा हळूंच ऐकत उभा राहिला. तेव्हां ती मनुष्यासारखी अगदीं स्पष्ट वाणीनें, सागरिका आणि सुसंगता या दोघींच्या गोष्टी बोलत होती. त्या ऐकून—कोणी तरी तरुण स्त्रीनें-तिचें मन ज्याच्यावर आसक्त झालें असेल, त्या पुरुषाची प्राप्ति होत नाहीं, ह्मणून आपल्या जिवाला कंटाळून असें भाषण केलें असेल; व तें ऐकून ही सारिका बोलत आहे असें राजाला वाटलें.

तेव्हां वसंतक मोठ्यानें हसून ह्मणाला, 'अहो महाराज! असें उगीच वांकडें तिकडें कशाला सांगतां? सरळच कां ह्मणाना कीं,—माझ्यावर अनुरक्त झालेल्या कोणी तरुण स्त्रियेनें माझी प्राप्ति होत नाहीं, ह्मणून असें भाषण केलें. नाहीं तर मदनाच्या मिषानें दुसऱ्या कोणत्या तरी पुरुषाचें वर्णन करितां येईल, इतका सुंदर पुरुष तुझ्यावांचून दुसरा कोणी तरी येथें आहे काय?' असें बोलून त्यानें राजाच्या हातावर टाळी दिली.

वसंतक मोठ्यानें हंसला. त्याच्या आवाजानें ती मैना तेथून उडून गेली. तें पाहून राजा ह्मणाला, 'हा वेड्या, तुझ्या त्या राक्षसी हंसण्यानें बिचारी ती मैना मात्र भिऊन दुसरीकडे कोठें उडून गेली.'

चहूंकडे पाहून वसंतक ह्मणाला, 'मित्रा भलतीच कल्पना घेऊं नको. ती दुसरे कोठें गेली नाहीं, कदलीगृहांतच गेली आहे. तर आपणही तिकडे जाऊंया ह्मणजे झालें.' असें बोलून दोघेही मैनेचा शोध करीत करीत कदलीगृहाकडे जाण्यास निघाले.

जातांना **राजा वसंतका**ला ह्मणाला, ' प्रिय मित्रा, त्या मैनेच्या तोंडांतले शब्द ऐकण्याविषयीं इतका आतुर झा आहें, याचें कारण तुला माहीत नाहीं. खरेंच ह्मणशील तर दुः अशा मदनपीडेला धारण करणाऱ्या कामिनी स्त्रीनें आपल जिवलग मैत्रिणीजवळ जें कांहीं सांगितलें असेल, तें-पुनः श किंवा सारिका यांच्या तोंडांतून- भाग्यशाली पुरुषांच्याच का पडतें. '

याप्रमाणें बोलत बोलत दोघे ही कदलीगृहांत पोंचले. ते **वसंतक** म्हणाला, ' त्या बटकीच्या पोरीचा ( मैनेचा ) शं करण्याचें पुरे आतां. ह्या उन्हाच्या तापानें तुला फार श्रम झ आहेत, तर मलयाचलाच्या सुगंध वाऱ्यानें हालणाऱ्या बालक लींच्या शीतल छायेखालीं या शिलेवर बसून क्षणभर विश्रां घेऊंया.' ही गोष्ट **राजाला**ही मान्य झाली, आणि उभयतां विसांवा घेत बसले.

इतक्यांत तेथें जवळच दार उघडलेला पिंजरा पडला ह ता, तो पाहून **वसंतक** ह्मणाला, ' मित्रा, त्या दुष्ट वानर उघडलेला हा त्या मैनेचा पिंजरा असावा.' हें ऐकून **राजानें** नीट पाहून येण्यास सांगितलें. तेव्हां **वसंतक** त्या पिंजऱ्य जवळ जाऊन पाहतो, तों तेथें **सागरिके**चें आणि **वत्सराजा** जीवर चित्र काढलें आहे, अशी एक फळी त्याला मिळा ती हातांत घेऊन तो मोठ्या आनंदानें हंसत हंसत **राजा**ज आला.

**राजानें**-तें काय ? ह्मणून विचारिलें, तेव्हां **वसंत** चित्राची पाटी दाखवून ह्मणाला, ' मित्रा, तूं मोठा दैवशा खरा. मीं जें तुला सांगितलें होतें, तें हेंच. ही तुझीच तसबी

येथें काढली आहे. नाहीं तर कामदेव म्हणून तसबीर काढल्या-ला योग्य इतका सुंदर दुसरा कोण असणार आहे?'

हें ऐकून **राजाला** फार आनंद झाला. तो हात पुढें करून-'गड्या, मला दाखीव तर खरी, म्हणून आग्रह करू लागला तेव्हां **वसंतक** म्हणाला, 'मी नाहीं तुला दाखविणार. त्या सुंदर कन्येची तसबीर ही वर आहे. तर असलें कन्यारत्न कांहीं बक्षीस घेतल्यावांचून कोणी दाखवितात काय?'

**वसंतकानें** ती पाटी दडविली, तेव्हां **राजानें** आपल्या हातांतलें सोन्याचें कडें त्याच्या हातांत घालून बलात्कारानें चित्राची पाटी हिसकून घेतली. आणि **सागरिकेची** तसबीर पाहून आश्चर्यानें त्याला म्हणाला, "गड्या, इकडे पहा तरी. हातांतलें खेळण्याचें कमल हालवित होणारी चित्रांतली-(**सागरिका**) माझ्यावर आपला विशेष पक्षपात आहे, असें दाखवून राजहंसीप्रमाणें मानसांत प्रवेश करणारी, अशीही कोण आहे? खरोखर इच्या या अपूर्व मुखचंद्राला उत्पन्न करून **ब्रह्मदेव** आपलें आसन ( कमल ) *मिटून जाईल कीं काय, अशी शंका येऊन दुःखित झाला असावा!'

याप्रमाणें या दोघांचा संवाद चालला आहे इतक्यांत **सुसंगतेसह** **सागरिका** तेथें आली, आणि **सुसंगतेला** म्हणाली, 'सखे **सुसंगते**, ती सारिका तर आपल्याला मिळाली नाहींच.

---

* चंद्रोदय झाला म्हणजे सूर्यविकासी कमलें मिटतात हें प्रसिद्धच आहे. कमल हा शब्द साधारणतः सर्व प्रकारच्या कमलांचें नांव असें प्राकृत लोक मानतात. पण संस्कृत कवी, सूर्यविकासी असतात त्यांनाच कमलें, व चंद्रविकासी असतात त्यांना कुमुदें म्हणतात. सागरिकेचा मुखरूपी पूर्णचंद्र उदयाला पावल्यामुळे आपण बसलेलें कमल कदाचित मिटेल असा अभिप्राय.

तर आतां ती चित्राची पाटी घेऊन ह्या कदलीगृहांतून ह
च जाऊंया.'

**सुसंगतेनें** अनुमोदन दिल्यावरून दोघीही पुढें आल
त्यांची चाहूल ऐकून **वसंतक राजाला** ह्मणाला, ' मित्रा, ब
पण ही ( चित्रांतली **सागरिका** ) खालीं मान घातलेली अ
कां काढली आहे ?'

हें **वसंतकाचें** भाषण ऐकून **सुसंगता सागरिकेला** ह
णाली, ' गडे, हा **वसंतक** येथें बोलतो आहे. यावरून **मह
राज** ही येथेंच असतील असें वाटतें. तर आपण या वेलीच
आड उभ्या राहून पाहूंया ते काय करतात तें.' असें सांगून
घीही तेथें दडून बसल्या.

इकडे **राजा सागरिकेच्या** तसबिरीचें वर्णन करीत हो
तें ऐकून **सुसंगता सागरिकेला** ह्मणाली, ' सखे, तुझें
चांगलें खरें. हा तुझा हृदयवल्लभ ( **वत्सराज** ) तुझ्याच सौ
दर्याचें वर्णन करीत आहे.'

हें ऐकून लाजून **सागरिका** ह्मणाली, ' बाई, उगी
थट्टा करून मला खजील कां करितेस ?'

इकडे **वसंतक राजाला** हातानें हालवून ह्मणाला, 'अहो
हाराज ! हिनें मान खालीं कां घातली आहे, तें आधीं सांगा पा'

**राजा** ह्मणाला, ' वरचेवर काय विचारतोस? काय स
गायचें तें त्या **सारिकेनें** सांगितलेंच आहे.'

हें ऐकून **सुसंगता** हंसत हंसत **सागरिकेला** ह्मणाल
' गडे, पाहिलेंसना ! अखेरीस त्या सारिकेनें आपलें शहाणप
दाखविलेंसें वाटतें.'

इकडे **वसंतक राजाला** ह्मणाला. ' मित्रा, खरेंच सां
ही तसबीर तुझ्या डोळ्यांला आनंदकारक वाटतेना ?'

हें त्याचें भाषण ऐकून **सागरिका** भयभीत होऊन आपल्याच मनांत म्हणाली, 'अरेरे ! हा ( राजा ) आतां काय उत्तर देतो कोणास ठाऊक. खरोखर या वेळीं मी मरण आणि वांचणें यांच्यामध्यें आहें. जर याच्या तोंडांतून निघावीं तींच अक्षरें निघालीं, तर जीवंत राहणें ठीक आहे; नाहीं तर प्राणत्यागावांचून दुसरी गतिच नाहीं !'

इकडे **राजा वसंतकाला** म्हणाला, 'गड्या, आनंदकारक होते कीं नाहीं, म्हणून काय विचारतोस. मोठ्या संकटानें दोन्ही मांड्यावरून पुढें जाऊन विस्तीर्ण झालेल्या अशा हिच्या कंबरेच्या भागांत फार वेळ फिरून तेथून एका पुढें एक तीन वळकट्यांनीं उंच सखल अशा कंबरेच्या वरच्या भागाचें अतिक्रमण करतां करतां श्रांत झाल्यामुळें, तेंथं अंमळ विश्रांति घेऊन तान्हेल्यासारखी झालेली माझी दृष्टि, उंच स्तनप्रदेशावर चढून सांप्रत जलबिंदु स्रवणाऱ्या नेत्रांकडे साकांक्ष होऊन वरचेवर पहात आहे.'

**राजाचें** हें भाषण ऐकून **सागरिका** आपल्या मनाला म्हणाली, 'मना, आतां प्रसन्न हो. हें ऐकून तरी तूं समाधान पाव. तूं जी गोष्ट व्हावी असें इच्छिलें आहेस, तो केवळ मनोरथच आहे. तरी तो इतक्या* स्थितीला येऊन पोंचला आहे, तेव्हां आतां आशा धरण्याला जागा आहे.'

---

*म्हणजे राजाची प्राप्ति होणें तर अशक्य, असें असून मन त्यावर आसक्त झालेलें. तेव्हां हा केवळ मनोरथ, म्हणजे मनांत मांडे खाण्यासारखेंच आहे, असें हावेळपर्यंत सागरिका समजत होती. पण वत्सराज आपल्या तसबिरीची तारीफ करीत आहे, हें पाहून जरी तो मनोरथ आहे तरी तो इतक्या स्थितीला म्हणजे आपली तसबीर त्याला आवडण्यापर्यंत येऊन पोंचला आहे, असें पाहून तिला आशा उत्पन्न झाली हें तात्पर्य.

**सुसंगता** ह्मणाली, 'सखे, त्वां हें (राजाचें बोलणें) ऐकिलें काय?'

यावर **सागरिका** हंसून ह्मणाली, 'बाई, तूंच तें ऐक. तुझ्याच कौशल्याचें वर्णन चाललें आहे.'

इकडे **वसंतक**, चित्र फलकाची तारीफ करून ह्मणाला, 'मित्रा, असल्या सुंदर स्त्रिया ही—ज्याचा अशा रीतीनें समागम होणें याला फार मोठें मानतात, मग स्वतः त्याणें आपल्या विषयीं अनादर कां करावा. बरें? कारण, तिनें येथें काढलेल्या तुझ्या तसबिरीकडे तूं पहात देखील नाहींस तें कां?'

हें ऐकून **राजा** तसबिरीचें वर्णन करून ह्मणाला, 'गड्या, खरें विचारशील तर हिनें ही माझी तसबीर येथें काढली आहे ह्मणून मी आपल्याला मोठा धन्य मानतों, तेव्हां त्या तसबिरी-कडे कां पाहणार नाहीं? हें पहा, ही तसबीर काढीत असतां नेत्रांतून पडलेले प्रेमाश्रूच कण हस्तस्पर्शानें माझ्या अंगावर रो-मांचांचा उगम झाल्याप्रमाणें दिसत आहेत.'

**सागरिकेचा** संताप कमी होण्याकरितां **सुसंगतेनें** तिला कमलांच्या पानांचा बिछाना करून दिलेला तेथें बाजूला पडला होता. त्याकडे पाहून **वसंतक** ह्मणाला, 'मित्रा, हें पहा, तिनें सरोवरांतल्या कमलिनींच्या कोमल देठांनीं केलेलें मदनावस्थेचें सूचक असें कांहीं दिसत आहे.'

**राजा** तिकडे पाहून म्हणाला, 'गड्या, चांगलें पाहिलेंस हें त्या कृशांगीचें शयन असावें. पुष्ट अशा स्तनांचा आणि कमरेचा दोहोंकडून संग झाल्याकारणानें अंमळ चेंगरल्या सार-खें दिसणारें, आणि अत्यंत बारीक असल्यामुळें कमरेचा संग ज्या ठिकाणीं घडला नाहीं, तेथें हिरवें दिसणारें, सैल झालेल्या भुजांच्या चलनवलनानें अस्ताव्यस्त झालेलें हें कमलि

नीच्या पानांचें शयन तिला मदनाचा संताप किती झाला होता हें स्पष्ट सुचवीत आहे. आणखी हें येथें पडलेलें कमलिनीचें पान तिनें आपल्या उरस्थलावर घातलें असावें, असें वाटतें. यावरून तिची मदनावस्था कशी होती, तें स्पष्ट होत आहे. कारण मदनाग्नीच्या संतापानें शुष्क झालेल्या तिच्या स्तनांचे मंडलाकार व्रण याच्यावर उठले आहेत. यावरून तिच्या स्तनांचा विस्तार किती आहे, तो जणुंकाय हें स्पष्ट दाखवीत आहे असें वाटतें.'

इतक्यांत तेथें जवळच पडलेला कमलाचा देंठ उचलून घेऊन **वसंतक** ह्मणाला, 'मित्रा, हा एक दुसरा पहा, तिच्याच पुष्टस्तनांच्या घर्षणानें चुरलेला कोमल अशा कमलांच्या देंठांचा हार आहे. हा पहा.

**राजानें** तो **वसंतकाच्या** हातांतून घेऊन आपल्या गळ्यांत घातला, आणि त्याला हिणावून म्हणाला, 'अरे जड प्रकृते, तूं तिच्या स्तनकलशांच्या मध्यभागांतून खालीं पडलास. आतां उगीच कां सुकून जातोस ? तूं काय पाहिजे तें केलेंस, तरी पुनः तुझा तेथें प्रवेश व्हावयाचा नाहीं. खरें म्हणशील तर तिचे स्तन इतके सुघन आहेत कीं, त्यांत तुझ्यांतल्या एका बारीक तंतूचा देखील प्रवेश व्हावयाचा कठीण; मग तेथें तुला कोठून जागा मिळेल ?'

हें **राजाचें** भाषण ऐकून **सुसंगता** आपल्याशींच म्हणाली, 'अरेरे ! **महाराजांला सागरिकेवर** अतिशय अनुराग उत्पन्न झाल्यामुळें त्यांचें अंतःकरण अगदीं उडून गेल्यासारखें झालें आहे; व म्हणूनच यावेळीं ते भलभलतेंच कांहीं बोलत आहेत. तर आतां अधिकवेळ उपेक्षा करणें चांगलें नाहीं कसेंही असो, **महाराजांच्या** मनाला विश्रांति होईल, असें कांहींतरी केलें पाहिजे.

असा विचार करून ती **सागरिकेला** म्हणाली, 'सखे, ज्याच्याकरितां तूं आलीस, तो तुझ्या पुढें उभा आहे. त्याच्याकडे एकदां पहा तरी.'

हें तिचें बोलणें **सागरिकेला** इष्टच होतें, व तें तिला मनापासून आवडलें तरी बाह्यात्कारें निरस्कार केल्यासारखें करून **सागरिका** म्हणाली, 'मी कोणाकरितां आलें आहें? आणि येथें आहे तरी कोण?'

**सुसंगता राजाला** उद्देशूनच प्रथम बोलली होती; पण **सागरिकेनें** झिटकारल्यावरून झटकन् तिनें आपलें बोलणें फिरविलें आणि तिला म्हणाली, 'अग, उगीच भलतीच शंका घेऊं नकोस तूं चित्र फलकाकरितां आली नव्हतीस काय? तर आतां घे तो!'

**सागरिका** रागावून म्हणाली, 'मला बाई तुझीं असलीं बोलणीं समजत नाहींत. तर मी आपली आतां येथून दुसरीकडे जातें.'

**सागरिका** जाऊं लागली, तेव्हां तिला अडवून धरून **सुसंगता** म्हणाली, 'अग रागावणारे बाई, घटकाभर थांब. मी या कदलीगृहांतून चित्रफलक घेऊन येतें.'

**सागरिकेनें**–आपण उभी राहतें. घेऊन ये–असें सांगितल्यावरून **सुसंगता** कदलीगृहाजवळ गेली. तिला पाहून गडबडीनें **वसंतक राजाला** म्हणाला, 'मित्रा! तो चित्रफलक झांकून घे ही पहा राणीची दासी **सुसंगता** इकडे येत आहे. ही पाहील तर हें वर्तमान तुझ्या त्या शिरजोर बायकोला समजेल'!

हें ऐकून **राजानें** ती चित्राची फळी आपल्या शेल्याखालीं दडविली. इतक्यांत **सुसंगता राजाजवळ** येऊन संप्रदायाप्रमाणें 'महाराजांचा जयजयकार असो,' असें म्हणाली.

**राजानें** तिला खालीं बसावयास सांगून–आपण येथें आहें,

हें तुला कसें समजलें?—ह्मणून विचारिलें. तेव्हां गालांतल्या गालांत हसून **सुसंगता** ह्मणाली, 'केवळ महाराजच येथें आहेत हेंच समजलें, असें नाहीं; चित्रफलकासुद्धां झाडून सारें वर्तमान समजलें. आणि तें आतां बाईसाहेबांला कळविलें पाहिजे.' असें बोलून ती जाण्यास निघाली.

तेव्हां **वसंतक राजा**च्या कानांत ह्मणाला, 'गड्या, ही बोलली तसेंच करील असें वाटतें. ही बटकीची पोर फार चोंबडी आहे. तर हिला खुष करावें हें बरें.'

**वसंतका**चें हें बोलणें **राजा**लाही खरें वाटलें. तो **सुसंग-तेचा** हात धरून ह्मणाला, 'अग, हा वटकाभर विनोद आहे. तूं कांहीं भलतेंच सांगून राणीला विनाकारण दुःख देऊं नकोस. हें घे तुला इनाम.' असें बोलून आपल्या अंगावरचा दागिना काढून तिला देऊं लागला.

तो दागिना न घेतां **सुसंगता** ह्मणाली. 'महाराज, हें कुंडल मला नको. बाईसाहेबांच्या कृपेनें मी पुष्कळ भोगलें आहे, हाच माझ्यावर आपला मोठा अनुग्रह होईल.—माझें चित्र येथें कां काढलेंस?—ह्मणून माझी प्रियसखी **सागरिका** रागावून बसली आहे. तर महाराजांनीं जाऊन तिच्या हातास धरून तिला खुष करावें, म्हणजे झालें.'

हें ऐकून **राजा** गडबडीनें उठून उभा राहिला आणि—ती कोठें आहे तें मला दाखीव, असें म्हणाला. तेव्हां **सुसंगतेनें**—ती केळीच्या बेटाच्या आड आहे, असें सांगून **राजा**ला तिकडे नेलें.

**राजा** आपल्याजवळ आला असें पाहून **सागरिके**ला हर्ष आणि भय दोनही विकार उत्पन्न झाले, आणि तिच्या सर्वांगाला कंप सुटला. ती आपल्या मनांत म्हणाली,—यांना पाहून मला तर

फारच भय वाटतें. आणि त्यामुळें पाऊलभर देखील चालव नाहीं; तर आतां येथें काय करावें ?

इकडे **वसंतक**–' अरे, हा चित्रफलकही मी बरोबर घेतों कदाचित् याचें कांहीं तरी काम पडेल'–असें बोलून ती चित्राची फळी घेऊन **राजा**च्या पाठोपाठ गेला. आणि **सागरिके**ला पाहून आश्चर्यानें म्हणाला, ' अरे वाहवा ! असलें कन्यारत्न मनुष्यलोकांत तर कोठें दिसावयाचें नाहीं. हिला पाहून खरोखर मला तर असें वाटतें कीं, हिला उत्पन्न करून **ब्रम्हदेवा**ला देखील आपल्या कौशल्याचा विस्मय वाटला असेल!'

हें ऐकून **राजा** म्हणाला, ' गड्या, तूं अगदीं खरें बोललास. माझ्या देखील मनांत असेंच वाटतें. आपल्या आसनाच्या कमलाच्या पानाला जंकणारे असे हिचे लांब डोळे व इतर सौंदर्य पाहून **ब्रम्हदेवानें** आपल्या चारही तोंडांनीं एकदम हिची वाहवा केली असेल. व खरोखर विस्मयानें त्याचीं चारही मस्तकें डोललीं असतील !'

**राजा** असें वर्णन करीत होता, तें ऐकून **सागरिका** तिरस्कारपूर्वक **सुसंगते**कडे पाहून तिला म्हणाली, ' सखे, तूं असला चित्रफलक आणिलास काय ? बरें चांगलें केलेंस. ' असें बोलून ती जाऊं लागली.

तेव्हां तिच्याकडे पाहून **राजा** म्हणाला, ' हे भामिनी, तूं जरी ही आपली दृष्टि रागानें फेंकते आहेस, तरी ती स्वभावत: स्निग्ध असल्यामुळें रूक्ष दिसत नाहीं. तर त्वरा सोडून अंमळ हळू हळू पावलें टाक. कारण वरचेवर ठेंच लागून हा तुझा मोठा नितंब ( कंबरेजवळचा भाग ) दु:खित होईल. '

**सुसंगता** म्हणाली, ' महाराज, ही फारच रागीट आहे आपण हिचा हात धरून हिला प्रसन्न करून घ्यावें. '

हें ऐकून राजानें हंसत हंसत **सागरिके**चा हात धरिला आणि तिच्या स्पर्शापासून आपल्याला फार सुख झालें, असें दाखवूं लागला. यावेळीं सात्त्विक भावाचा पूर्ण उदय झाल्यामुळें **सागरिके**च्या अंगास घाम सुटला होता. हें पाहून **वसंतक राजा**ला म्हणाला, 'बाबा, तुला तर ही प्रत्यक्ष लक्ष्मीच मिळाली, असें वाटतें.'

**राजा** म्हणाला, 'गड्या, खरेंच ही लक्ष्मीच आहे, आणि हा हिचा सुंदर हात हा पारिजात वृक्षाचा कोमल अंकुर आहे. नाहीं तर घामाच्या मिषानें हिच्या हातांतून अमृताचा स्राव कसा झाला असता?'

राजानें तिचा हात धरला होता व त्याला तिचें भाषण ऐकण्याची फार इच्छा होती. तरी अतिशयित प्रेम, लज्जा, आणि **वासवदत्ते**चें भय, या तिघांचें मिश्रण झाल्यामुळें तिच्या तोंडावाटे एक शब्द देखील निघेना. ती खालीं मान घालून तटस्थ उभी राहिली होती. तिला राग मुळींच नव्हता, तरी पण कोणत्या तरी रीतीनें तिला बोलवावें म्हणून **सुसंगता** म्हणाली, 'गडे, तूं अगदीं आडदांड आहेस. **महाराजां**नीं याप्रमाणें तुला हातानें धरलें आहे, तरी अजून राग सोडीत नाहींस?'

हें तिचें भाषण ऐकून रागानें भिंवया अंमळ वर चढवून **सागरिका** म्हणाली, '**सुसंगते**! अजून देखील तुझी ही बडबड पुरी होत नाहींना! किती तरी बोलशील!'

यावर **राजा** म्हणाला, 'प्रिये **सागरिके**, अग सखीजनांवर असा राग करणें युक्त नव्हे.'

इतक्यांत **वसंतक** पुढें येऊन म्हणाला, 'अहो छोट्या बाईसाहेब, भुकेल्या भटजीसारख्या उगीच कां रागावतां?'

यावर **सुसंगतेनें** आपल्यालाही राग आल्यासारखें करून दाखवून—तूं असें करतेस तर मी तुझ्याशीं मुळींच बोलणार नाहीं— असें म्हटलें. तेव्हां **राजानें** तिचेंही समाधान करून-बरोबरीच्या मैत्रिणीशीं असें करूं नये, म्हणून सांगितलें.

इतक्यांत राणी **वासवदत्ता** राजाचा शोध करीत करीत इकडे येत होती तिची चाहूल पाहून **वसंतक राजाला** म्हणाला, ' खरोखर ही ( सागरिका ) दुसरी राणी **वासवदत्ताच** आहे, असें वाटतें.'

हें ऐकून **राजा** चकित झाला, आणि त्यानें एकाएकीं **सागरिकेचा** हात सोडला. त्याबरोबर तीही भयभीत झाली. आणि—**सुसंगते**, आतां काय करावें ? असें म्हणाली.

तों **सुसंगता** तिचा हात धरून केळीच्या ताटव्याच्या आड गेली. **सागरिका** गेल्यावर आजुबाजूस पाहून—अरे ! देवी **वासवदत्ता** आली म्हणालास ती कोठें आहे ?—असें विस्मयानें **वसंतकाला राजानें** विचारिलें.

तो म्हणाला, ' ती कोठें आहे तें मला रे काय ठाऊक ? तिचा ( सागरिकेचा ) रागीट स्वभाव पाहून, ही रागाच्या कामांत दुसरी **वासवदत्ताच** आहे, असें सहज म्हटलें. **वासवदत्तेला** पाहूनच मी तसें म्हणालों असें नाहीं.'

हें ऐकून **राजा** म्हणाला, ' हा मूर्खा ! बहुत दिवस यत्न करतां करतां दैवयोगानें कशी तरी हातीं लागली असून गळ्यांत घालण्यापूर्वींच रत्नावली ( रत्नमाला ) प्रमाणें ती प्रिया माझ्या हातांतून सुटली ! हा सगळा तुझ्या मूर्खपणाचा प्रभाव.'

**राजा वसंतकाशीं** याप्रमाणें बोलत आहे, इतक्यांत **कांचनमालेसह वासवदत्ता** तेथें येऊन पोहोंचली. ती

**कांचनमाले**ला ह्मणाली, 'अग, आर्यपुत्रानें स्वीकार केलेली ती नवमालिका अजून किती तरी दूर आहे तें सांग.'

**कांचनमा**ला म्हणाली, 'बाईसाहेब, ही पहा जवळच आहे. हें कदलीगृह वलांडलें म्हणजे दिसेल.' असें बोलत बोलत दोघीही पुढें चालल्या.

**राजा**ला **सागरिके**चेंच ध्यान लागलें होतें. तो **वसंतका**ला म्हणाला, 'गड्या, प्रियतमेला (सागरिकेला) आतां कोठें पहावी बरें?' हे शब्द ऐकून **कांचनमाले**ला ओळख पटली. ती **राणी**ला म्हणाली, '**महाराजां**चा शब्द जवळच ऐकू आला. तेव्हां असें वाटतें कीं बाईसाहेबांची वाट पहात सरकारस्वारी बसली असावी.' ती असें बोलत आहे, इतक्यांत दोघीही **राजा**जवळ येऊन पोहोंचल्या. तेव्हां **वासवदत्ता** अगदीं जवळ जाऊन – आर्यपुत्राचा जयजयकार असो! असें ह्मणाली. यावेळीं ह्या राजश्रींची फारच धांदल उडाली. **वासवदत्ते**ला पाहून त्याला आनंद झाला. त्याच्या मनांत तिच्याशीं कांहीं बोलावयाचें होतें; पण चित्राची पाटी जवळच पडली होती, ती तिच्या दृष्टीस पडेल तर आपली चोरी उघड होईल; ह्मणून खुणेनें **वसंतका**ला ती चित्राची फळी झांकून घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें **वसंतकानें** ती आपल्या काखेंत दडवून ठेविली, तेव्हां **राजा** स्वस्थ झाला. **वासवदत्ता राजा**ला ह्मणाली, 'काय! आपण लाविलेली ती नवमालिका कुसुमित झाली काय?'

**राजा** ह्मणाला, 'हो! आम्ही तिला पाहण्याकरितां केव्हांचे येथें येऊन बसलों आहों; पण तुला वेळ लागला म्हणून अद्याप तिकडे गेलों नाहीं. तर चल आतां सर्व मिळून बरोबरच तिला पाहूं?'

हें ऐकून **वासवदत्ता राजा**चें वर्णन करून म्हणाली 'प्रफुल्लित दिसणाऱ्या ह्या मुखचर्येवरूनच ती नवमालिका प्रफुल्लित झाली असावी, असें दिसतें. तेव्हां आतां मी तिकडे जाऊन तरी काय करणार?'

हें ऐकून **वसंतक** — 'बाईसाहेब, असें असेल तर आम्ही जितलों' असें बोलून हात वर करून आनंदानें नाचूं लागला; तेव्हां त्याच्या काखेंतून चित्राची फळी खालीं पडली. ती राणीच्या दृष्टीस पडूं नये, म्हणून **राजानें** इतका बंदोबस्त केला होता, तरी शेवटीं तोच प्रसंग आला; म्हणून त्याला फार खेद झाला. आतां तरी ती हळूच उचलून घ्यावी, असें त्याच्या मनांत होतें; पण उघड बोलतां येईना म्हणून बोटानें दाखवून तो वसंतकाच्या तोंडाकडे पाहूं लागला.

तेव्हां **वसंतक** राणीचा डोळा चुकवून हळूच म्हणाला 'अहो महाराज, उगीच रागावूं नका. या प्रसंगीं काय उत्तर दिलें पाहिजे, तें मला ठाऊक आहे. आपण उगीच असा.'

इकडे **कांचनमालेची** त्या फळीवर दृष्टि गेली. तिनें ती चटकन उचलून **राणी**ला दाखविली. तेव्हां ती वरील एकेक चित्राची तारीफ करीत **राजाच्या** तसबिरीकडे पाहून मनांत म्हणाली, ही तर खाशास्वारींचीच तसबीर आहे. पण यांचेजवळ कोण? ती **सागरिका** तर नसेल ना? हो तीच ही.

**वासवदत्तेला** तिचा फार राग आला; पण तो मनांतल्या मनांत सावरून वरपांगी हंसत हंसत तिनें **राजाला**—हीं चित्रें कोणीं काढली?—म्हणून विचारिलें.

**राजा** अगदीं भांबावल्यासारखा होऊन, तिला काय उत्तर

द्यावें तें त्याला सुचेना. तो लज्जित होऊन राणीच्या नकळत **वसंतका**ला म्हणाला, 'गड्या, आतां काय बरें उत्तर द्यावें?'

**वसंतक** मोठा चतुर होता. त्याला प्रसंगीं तेव्हांच युक्ति सुचत असे. त्यानें हळूच—तूं काळजी करूं नको, मी उत्तर देतों,—असें **राजा**ला सांगून **वासवदत्ते**ला म्हणाला, 'अहो बाईसाहेब, आपल्या मनांत कांहीं भलतीच कल्पना आली आहे, असें वाटतें. तर तशी कांहीं शंका घेऊं नका. माझ्या प्रिय मित्राला (राजाला) मीच तसें करावयास लाविलें. आपलेंच चित्र आपण काढणें फार कठीण आहे, असें मी म्हणालों. तेव्हां त्याणें आपलें चित्रकलानिपुणत्व दाखविण्या-करितां ही तसबीर काढली आहे. दुसरें कांहीं नाहीं.'

हें **वसंतका**चें युक्तीचें भाषण ऐकून **राजा**ला बरेंच धैर्य झालें. तो म्हणाला, 'प्रिये, हा **वसंतक** सांगतो आहे, तेंच खरें. तूं कांहीं भलतीच कल्पना घेऊं नकोस.'

**वासवदत्ते**ला हें राजाचें बोलणें खरें वाटलें नाहीं, हें अगदीं उघडच आहे. तरी **वसंतका**चें बोलणें खोटें करण्यास तिच्याजवळ विशेष प्रकारचा आधार नव्हता. म्हणून ती म्हणाली, होय! कदाचित् भावोजी (**वसंतक**) म्हणतात तसें असेल; पण ही दुसरी तसबीर कोणाची? आणि हें काय भावोजीचें कौशल्य असेल वाटतें!'

हें ऐकून **राजा** पुनः खजील होऊन हंसत हंसत म्हणाला, 'देवी, उगीच भलभलत्या शंका काढूं नकोस. ही कोणीतरी एक कन्यका आपल्याच मनानें कल्पना करून येथें काढिली आहे. हिला म्हणजे पूर्वी कधीं पाहिलें होतें, असें मुळींच नाहीं.'

हे **राजा**च्या तोंडचे शेवटचे शब्द **वसंतका**ला फार उपयोगी पडले. त्यानें त्याचा आपल्याला अनुकूल असा अर्थ

मनांत घेतला, आणि आपलें जानवें हातांत धरून राणीला म्ह
णाला, 'हो! हो! मी शपथ घेऊन सांगतों. ह्या माझ्या जान
व्याचीच शपथ! असली कन्या या पूर्वी आम्हीं कधीं
पाहिली नाहीं.'

हें ऐकून **कांचनमाला** हळूच राणीला म्हणाली, 'बाई
साहेब, कदाचित् असेंच खरें असेल. सहज कोणत्या तरी क
न्येचें चित्र काढलें असून तें घुणाक्षरन्यायानें[१] **सागरिके** सारखें
दिसत असेल. तेव्हां उगीच आपण रागावूं नये हें बरें.'

**वासवदत्ता** तिला म्हणाली, 'अग, तूं अगदीं भोळी
आहेस. तुला ह्या **वसंतका**च्या कुटिल भाषणाचा अर्थ
समजला नाहीं. हा **वसंत**क आहे!' असें सांगून ती **राजा**ला
म्हणाली, 'आर्यपुत्र, हें चित्र पाहतां पाहतां—काय झालें कोणा
ठाऊक— एकाएकीं माझें कपाळच दुखूं लागलें आहे. तर मी
आतां जातें.' असें बोलून उठून जाऊं लागली.

तेव्हां तिचा पदर धरून **राजा** म्हणाला, 'प्रिये, मी आतां
काय बोलूं तें मला सुचत नाहीं. प्रसन्न हो असें म्हणावें
तर माझ्यावर तूं कधीं रागावणारच नाहींस. तेव्हां राग नसतां
तसें कसें म्हणावें? पुनः— मी असें कधीं करणार नाहीं, असें
म्हणावें, तर मीं अपराध कबूल केला असें होईल; पण मुळीं
तसें कांहींच नाहीं, बरें, माझा कांहींच अन्याय नाहीं, असें

१ कांहीं किडे लांकडें कोरीत असतात, व कोरतां कोरतां
सहज त्यांत अक्षरांचा आकार दिसतो. कोरतेवेळीं किड्यांचा तसा
उद्देश असतो असें नाहीं. तथापि त्यांनीं काढलेल्या रेघा अक्षरांशीं
मिळतात, 'याला 'घुणाक्षरन्याय' म्हणतात.

म्हणावें, तर तें तुला खरें वाटणार नाहीं; तेव्हां एकंदरींत येथें बोलावें तरी काय? हेंच सुचत नाहींसें झालें आहे.'

हें ऐकून **वासवदत्ता** पदराला हिसका मारीत म्हणाली, 'आर्यपुत्र, उगीच दुसरी कल्पना करूं नये. खरोखरीच माझें डोकें दुखतें आहे. तर मला जाऊं द्यावें.' असें सांगून ती मोठ्या फणकाऱ्यानें निघून गेली.

नंतर **वसंतक राजाला** म्हणाला, 'बाबा, बरें झालें! ही **वासवदत्तारूपी** अकालवादलिका बऱ्याच रीतीनें टळली.'

**वसंतकाचें** हें बोलणें **राजाला** आवडलें नाहीं. तो म्हणाला, 'छत्! मूर्खा! ती गेली त्याचा तूं संतोष मानितोस काय? ती कांहीं संतोषानें गेली नाहीं. तुला तिचा गुप्त राग कसा होता, तो तुझ्या लक्ष्यांत नाहीं. पहा, रागानें तिच्या भिंवया एकाएकीं वर चढल्या, तरी मान खालीं घालून तिनें त्या दृष्टीस पडूं दिल्या नाहींत. माझ्याकडे पाहून अंमळ हंसली; पण तें हसणें माझ्या छातीचा भेद करणारेंच होतें. ती निष्ठुर असें कांहींच बोलली नाहीं, तरी अंतर्गत दुःखानें डोळे भरून आल्यामुळें मुद्दाम तिनें डोळे उघडून माझ्याकडे पाहिलें देखील नाहीं. तिनें आपला राग तर प्रगट केलाच; पण नम्रताही सोडिली नाहीं. तेव्हां ती गेली तरी समाधान मानण्यासारखें कांहीं नाहीं.'

हें ऐकून **वसंतक** म्हणाला, 'अरे, तुझी ती राणी **वासवदत्ता** गेली. आतां उगीच अरण्यरोदन कां करतोस? तर आपण दुसऱ्या कांहीं गोष्टी बोलूं या.'

याप्रमाणें **वसंतकानें** त्या गोष्टीचा विसर पाडण्याकरितां प्रयत्न केला, तरी **राजाला वासवदत्तेच्या** रागाविषयीं

फारच काळजी लागली होती. तो म्हणाला, 'वेड्या, तिच्या रागाची तुला अद्याप पुरतीशी ओळख नाहीं. त्याची मला चांगली माहिती आहे. तें कांहीं असो. तिला प्रसन्न करून घेतल्यावांचून दुसरा कोणताच उपाय नाहीं. तर चल. आधीं तिला राजी करण्याकरितां आपण अंतःपुरांत जाऊं या.' असें बोलून दोघेही तिकडे निघाले.

अंतःपुरांत जाऊन राजानें अनेक प्रकारें विनवण्या करून **वासवदत्ते**ला प्रसन्न करून घेतलें. या कामीं **वसंतका**नें फारच साह्य केलें. **वासवदत्ता** अगदी भोळी होती. भोळ्या माणसाला राग तेव्हांच येतो; पण तो फार वेळ टिकत नाहीं. त्याप्रमाणें **वासवदत्ते**चा राग फार वेळ टिकत नव्हता. **वत्सराजा**सारखा रंगेला पति विनवण्या करूं लागला, आणि **वसंतका** सारख्या कोटिबाज मनुष्यानें त्याला साह्य केलें, तर कसलीही रागीट स्त्री असली, तरी तिचा राग कोठवर राहणार आहे ? असो; याप्रमाणें **राणी**ला प्रसन्न करून घेतलें, तरी त्याच्या मनाला स्वस्थता मिळाली नाहीं

हा वेळपर्यंत **राणी**च्या रागाकडे मन वेधल्यामुळें त्याला **सागरिके**चें स्मरण झालें नव्हतें; पण राणी प्रसन्न झाली असें पाहतांच त्याच्या मनानें **सागरिके**कडे धांव मारली. तो **वसंतका**सह **सागरिके**च्या प्राप्तीविषयीं विचार करीत बसला. 'त्याला—**राणी**ला हें तिचें कृत्य समजलें, तेव्हां ती हिचें काय करील— याची मोठी काळजी लागली होती. तो तिच्या विरहानें जसा दुःखित झाला होता, तशी तीही फार दुःखित झाली असेल; म्हणून तिचा समाचार आणण्याकरितां त्यानें **वसंतका**स जावयास सांगितलें. तेव्हां **वसंतका**नें, कांहीं तरी

युक्तिप्रयुक्ति काढून तिची प्राप्ति करून देतों, असें सांगून त्याचें समाधान केलें.

वसंतक राजाचा निरोप घेऊन तेथून निघाला, तो राजाला सागरिकेची प्राप्ति कशी करून द्यावी, याविषयीं विचार करीत चालला होता. त्यानें सुसंगताही सागरिकेची जिवलग मैत्रिण आहे, असें पाहून तिला आपल्या मसलतींत घेतलें आणि तिच्या साह्यानें राजाचा हेतु पूर्ण करण्याचा विचार केला. या कामीं काय युक्ति करावी तें सांग, ह्मणून वसंतकानें तिलाच विचारिलें.

तेव्हां सुसंगता ह्मणाली, 'दुसरा तर कांहीं उपाय दिसत नाहीं. सागरिकेला महाराजांकडे घेऊन यावयाचें काम बिकट आहे. बाईसाहेबांला आधींच तिचा फार राग आला आहे. त्यांनीं तिला माझ्या स्वाधीन करून तिच्यावर चांगली नजर ठेवण्यास सांगितलें आहे. तेव्हां मीं कांहीं केलें आणि तें कोणास समजलें, तर तिच्या आणि माझ्या दोघोंच्याही जिवावर संकट येणार आहे. यास्तव माझ्यानें तर कांहीं करवत नाहीं. मीं असें म्हटलें खरें; पण महाराजांची तशी अवस्था पाहून माझ्यानें उगीच ही बसवत नाहीं. आणि हें काम तर असें कठीण आहे. तरी पण एक युक्ति आहे, ती साधली तर फार चांगलें होईल. ती कोणती म्हणाल, तर आज बाईसाहेबांनीं रागाच्या भरांत सर्व दागिने काढून माझ्याजवळ दिले आहेत. आणि आजच पुनः त्या धारण करणार नाहींत असें वाटतें; तेव्हां आज रात्रीं सागरिकेला तेच अलंकार घालून मीं सजवितें. ती थेट बाईसाहेबांसारखीच दिसते. तशांतून ते अलंकार घातले, म्हणजे तर कोणालाच ओळखतां येणार नाहीं. आणि मी

**कांचनमाले**चा वेष घेईन. याप्रमाणें आम्ही दोवीही वेष पालटून संध्याकाळीं **महाराजां**कडे येऊं. तूं मात्र सावधगिरी ठेव. येथेंच या चित्रशाळेच्या दारांत आमची वाट पहात बैस. **महाराज** मोगरीच्या मंडपांत पूर्वीच वाट पहात बसतील. आणि मग तेथें **सागरिके**चा आणि त्यांचा समागम होईल. असें केलें तर मात्र कोणाला न कळत काम पार पडेल.' ही युक्ति **वसं-तका**ला आवडली. तेव्हां तिनें सांगितल्याप्रमाणें व्यवस्था कर-ण्याचें मान्य करून **राजा**ला कळविण्याकरितां तो त्याच्या कडे गेला.

वर सांगितल्याप्रमाणें **वसंतक** आणि **सुसंगता** या उभय-तांनीं मसलत केली. त्यांच्या मतें ती कोणालाही समजणार नाहीं, असा पक्का भरंवसा होता, पण ती तेव्हांच फुटली. दोघांचें बोलणें चाललें होतें, त्याच वेळीं **राजा**ची प्रकृति अस्वस्थ आहे, असें समजल्यावरून, त्याचा समाचार घेण्याकरितां **राणी**नें आपली आवडती दासी **कांचनमाला** हिला राजाकडे पाठविलें होतें. ती त्याचा समाचार घेऊन परत चित्रशाळेवरून येत असतां, **वसंतक** आणि **सुसंगता** यांचें भाषण चाललें होतें, तें आड राहून तिनें सर्व ऐकलें. आणि ती पुढें जात होती, इतक्यांत तिला परत येण्यास फार वेळ लागला असें पाहून, राणीनें **मदनिका** नांवाची दुसरी दासी तिच्या शोधास पाठविली. तिची आणि **कांचनमाले**ची वाटेंत भेट झाली. इकडे **कांचनमाला** आपल्याशींच कांहीं बोलत चालली होती. तिला **वसंतका**च्या त्या मसलतीविषयीं फारच आश्चर्य वाटलें होतें. **मदनिका** जवळ आली होती, तरी तिच्याकडे न पाहतां ती आपल्याशींच म्हणाली, वाहवा! शाबास! **वसंतका**, शाबास! तुझ्या मसलतीची कमालच आहे! आपले प्रधानजी

यौगंधरायण मोठे मसलती असें म्हणतात; पण तुझ्या मसलतीनें त्यांच्याही वर कोटी केली!

कांचनमालेचे हे उद्गार मदनिकेनें ऐकले. आणि तिच्यापुढें जाऊन हंसत हंसत—अग कांचनमाले, अग, आर्य वसंतकानें असें काय शहाणपणाचें काम केलें म्हणून तूं याची स्तुति करतेस—म्हणून तिणें विचारलें. तेव्हां आपलें बोलणें हिणें ऐकिलें असें समजून कांचनमाला म्हणाली, 'ओहो! कोण, सखी मदनिका काय? अग, तूं विचारलेंस खरें; पण तुला हें समजून घेऊन काय करायचें आहे? सांगितलें तरी तें तुझ्या पोटांत रहावयाचें नाहीं. आणि तें तर बाई फारच गुप्त ठेवलें पाहिजे.'

कांचनमालेचें हें भाषण ऐकून मदनिकेनें राणीच्या पायांची शपथ घेऊन—तें आपण परिस्फुट करणार नाहीं, अशी तिची खात्री केली. तेव्हां कांचनमालेनें वसंतक आणि सुसंगता यांची काय मसलत झाली होती; ती तिला सांगितली. ती ऐकून मदनिकेला फार वाईट वाटलें. आपल्या सेवकजनांवर विशेष ममता करणाऱ्या राणी वासवदत्तेला अशा रीतीनें फसविण्याचा विचार केल्याबद्दल तिणें सुसंगतेला मोठा दोष दिला.

वत्सराज यावेळीं फारच अस्वस्थ झाला होता; त्याची प्रकृति बिघडण्यास दुसरें कांहीं कारण नसून केवळ सागरिकेची प्राप्ति होत नाहीं, हेंच मुख्य कारण होतें. त्यानें प्रकृति बिघडल्याचें मिष करून मदनावस्था छपविली होती; पण सरळ मनाची राणी वासवदत्ता हें कांहीं जाणत नव्हती. राजाची प्रकृति खरोखरच बिघडली आहे असें समजून त्याचा समाचार आणण्याकरितां तिनें मदनिकेला पाठविलें होतें.

" कांचनमाला बराच वेळ गोष्टी करून म्हणाली, 'अ मदनिके, तूं आतां कोणीकडे चाललीस ?'

मदनिका म्हणाली, 'महाराजांची प्रकृति अस्व आहे, म्हणून बाईसाहेबांनीं तुला पाठविलें होतें. तुला तिकडे फ र वेळ लागला म्हणून बाईसाहेब अगदीं फारच घाबऱ्या झाल आणि त्यांनीं तुझ्या शोधाकरितां मला पाठविलें. ती तूं म येथेंच भेटलीस. आतां पुढें कशाला जावें ?' "

हें ऐकून कांचनमाला म्हणाली, 'हाय हाय ! ! आम बाईसाहेब अगदीं अगदीं भोळ्या खऱ्या. महाराजांची प्र खरोखरच बिघडली आहे, असें जर त्या समजत असतील. त्यांचें मन फारच सरळ आहे यांत संशय नाहीं !'

असें सांगून राजाची प्रकृति बिघडण्याचें खरें कारण क आहे, तें ती पुढें सांगणार होती; पण कदाचित् कोणी ऐकेल म्ह गून इकडे तिकडे पाहूं लागली. तों त्याच बागेच्या दरवाजा सज्जावर आजारीपणाचें मिष करून मदनावस्था छपविण वत्सराज तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां लज्जेनें आणखी का न बोलतां मदनिकेला बरोबर घेऊन ती राणीला समा सांगण्याकरितां अंतःपुरांत गेली.

इकडे राजा त्या सज्जावर बसून सागरिकेच्या भेटी र्थी उत्कंठित होत्साता विरहावस्थेला उचित असे विलाप कर होता. त्याला आपल्या शरीरांत होत असणारा संताप उघड सांगतां येईना. शोक परमावधीला पोंचला, म्हणजे विलापांनीं मनाला स्थिर करावें लागतें.

तो प्रथम आपल्या हृदयाला उद्देशून म्हणाला, 'बा हृद तला कामानलापासून सांप्रत अतिशय संताप होत आहे; पण निमूटपणें सहन कर. कारण त्याची शांति करणारा उपाय मा

जवळ नाहीं. मग तूं उगीच संतप्त कां होतेंस? तुझी शांति होण्याची संधी दैवयोगानें आली होती; पण ती म्यांच घालविली. केव्हढें माझें मूढपण पहा! त्या वेळीं (सागरिकेचा समागम झाल्यावेळीं) मोठ्या प्रयत्नानें चंदनरसाप्रमाणें सुगंध व शीतल ज्याचा स्पर्श आहे, असा तिचा हात माझ्या हातांत फार वेळ असूनही मी तो तुझ्यावर ठेविला नाहीं. खरोखर हें मोठेंच आश्चर्य! पंडितलोक तुला चंचल व अरूप असें मानतात; पण मला तर तें खरें वाटत नाहीं. कारण, चंचल असतेंस, तर कामाच्या हातांत कसें सांपडलें असतेंस? व तुला रूप नसतें तर एकदम पांचही बाणांचा त्याच्यानें तुझ्यावर प्रहार तरी कसा करवला असता?'

असें बोलून तो अंमळ स्तब्ध बसला; पण कामदेवानें आपलें धनुष्य आकर्ण ओढून शेलक्या शेलक्या बाणांनीं आपल्या धनुर्विद्यानिपुणत्वाचा पूर्ण प्रयोग त्याच्यावर केला होता, त्यामुळें त्याला चैन कसें पडणार?

तो पुन्हा उद्विग्न होऊन आकाशाकडे पाहून कामदेवाला उद्देशून ह्मणाला, 'हे कुसुमधन्व्या! सर्व लोक असें सांगतात कीं, तुझे बाण अवघे पांचच आहेत, आणि त्यांचा प्रहार बहुतकरून माझ्यासारख्या दुःखीजनांवर व्हावयाचा. यावरून माझी अशी समजूत होती कीं, तुला लक्ष्यभूत असे लोक असंख्य असून तुझे बाण अवघे कायते पांचच. तेव्हां त्यांच्यापासून फारसें भय नाहीं; पण ती लोकांची समजूत अगदीं चुकीची आहे असें आतां वाटतें. कारण, तूं तर आज एकट्या मजवरच पांच नाहीं, पन्नास नाहीं, असंख्य बाणांची वृष्टि करून मला अगदीं व्याकूळ केलें आहेस! तेव्हां तुला पंचशर ह्मणावें तरी कसें?'

याप्रमाणें बोलून पुन्हा कांहीं वेळ विचार करून म्हणाला. अरेरे !!! खरें म्हटलें तर अशी अवस्था झाली आहे तरी मला आपल्या विषयींची तितकी काळजी नाहीं; तर मनांतल्या मनांत गुप्त रीतीनें राग ठेवणाऱ्या राणीच्या तडाक्यांत सांपडलेल्या त्या गरीब **सागरिके**ची मला मोठी काळजी पडली आहे. खरेंच. सांप्रत तिची अवस्था मोठी कठीण झाली असावी., आपण गुप्त-रीतीनें केलेली मसलत लोकांना समजली असें जाणून, ती ज्याला त्याला पाहून मान खालीं घालीत असेल. दोन असामी कांहीं गोष्टी बोलत असले, तर ते आपल्या विषयींच कांहीं बो-लत-आहेत, अशी तिला शंका येत असेल. तिच्या सख्या तिच्या विषयीं कळकळ दाखवूं लागल्या म्हणजे ती फारच हिर्मुसल्यासारखी होत असेल. याप्रमाणें माझी ती प्रिया बहु-तकरून मानसिक रोगानें केवळ उदास झाली असेल. तिचा क्षेमसमाचार आणण्याकरितां मीं **वसंतका**ला तिकडे पाठ-विलें आहे; पण त्यानें इतका उशीर कां बरें लावला ? कांहीं विलक्षण गोष्ट तर झाली नसेलना ?

याप्रमाणें **वत्सराज** चिंताक्रांत होऊन बसला आहे, इतक्यांत हसत हसत **वसंतक** अकस्मात् तेथें आला; आणि मोठ्या संतोषानें आपल्याशींच म्हणाला, ओहो ! मोठेंच आश्चर्य ! जसा आज माझ्याकडून प्रियवचन ऐकून त्याला ( **राजाला** ) आनंद होईल, तसा ह्या **कौशांबी** नगरीचें राज्य मिळालें तरीही होणार नाहीं असें वाटतें ! तर आतां आपण लौकर जाऊन त्याला ही आनंदकारक बातमी सांगावी. असें बोलून कांहीं पावलें चालून पाहतो तों अगदीं जवळच बसलेला राजा त्याचे दृष्टीस पडला.

त्याला पाहून **वसंतक** म्हणाला, 'अरे, हा तर माझा प्रियमित्र एकसारखा इकडेच नजर लावून पहात बसलेला आहे. यावरून असें वाटतें कीं, हा बहुतकरून माझीच वाट पहात बसला असावा.' असें बोलून राजाच्या अगदीं जवळ गेला आणि त्याचा जयजयकार करून म्हणाला, 'प्रियमित्रा! इष्टकार्याची सिद्धि झाल्यामुळें दैवानें तुझा उदयकाळ अगदीं जवळ आणला आहे असें वाटतें.'

या वेळीं **वसंतका**ची मुद्रा आनंदित दिसत होती; त्यावरूनच-हा कांहीं तरी काम करून आला आहे—असें **राजाला** वाटलें. वरील भाषण ऐकून तर त्याला अधिकच आनंद झाला. तो म्हणाला, 'गड्या, माझी प्रिया **सागरिका** खुशाल आहेना?' यावर **वसंतक** मोठ्या तोऱ्यानें म्हणाला, 'अहो महाराज! तिचें कुशल आहे किंवा नाहीं तें माझ्या तोंडानें ऐकण्यापेक्षां लौकरच प्रत्यक्ष तिलाच विचारा म्हणजे झालें.'

हें ऐकून **राजाचा** आनंद पोटांत मावेनासा झाला. तो म्हणाला, 'गड्या, खरेंच का तूं सांगतोस? तिचें दर्शन देखील होणार आहे काय?'

यावर **वसंतक** मोठ्या गर्वानें म्हणाला, 'कां होणार नाहीं बरें? आपल्या बुद्धीच्या प्रभावानें प्रत्यक्ष बृहस्पतीच्या चातुर्याचा उपहास करणारा हा मी तुझा प्रधान असतां तिची भेट होण्याचें मोठें अगाध तें काय आहे?'

**वसंतकाचें** भाषण ऐकून **राजाला** हसूं आलें, तरी तो रागावेल म्हणून मोठ्यानें न हसतां त्याला म्हणाला, 'खरेंच, यांत आश्चर्य तें काय आहे? तुला कोणती गोष्ट अशक्य आहे? बरें; पण भल्या माणसा, काय काय कार

स्थानें केलीस तीं सांगशील तर खरीं ? तो वृत्तांत एक वेळ मला ऐकण्याची फार इच्छा आहे.'

राजानें सांगण्याविषयीं फार आग्रह केल्यावरून बरेच आढेवेढे घेऊन, आपण काय मसलत केली होती, ती वसंतकानें त्याच्या कानांत सांगितली.

ती ऐकून राजाला फारच आनंद झाला, आणि त्या वहरांत हातांतलें रत्नखचित सोन्याचें कडें काढून— ह्या तुझ्या नाजुक कारागिरीबद्दल हें बक्षीस घे, असें ह्मणून तें वसंतकाला दिलें.

तेव्हां नाचत नाचत मान वांकडी करून वसंतकानें तें कडें आपल्या हातांत घालून 'आपली पुष्कळच तारीफ केली, आणि राजाला म्हणाला, 'बरें असो; आपल्या चातुर्यानें आज हें अगदीं बावनकशी सोन्याचें रत्नखचित कडें बक्षीस मिळविलें आहे. हें हातांत घातल्यापासून मी एखाद्या मोठ्या राजपुत्रासारखा भाग्यवान् दिसतों. हें कडें मिळाल्याबद्दल मला मोठाच गर्व वाटला पाहिजे. माझी ती भटीण (बायको) मी एवढा मोठा शाहणा आहें, तरी वरचेवर माझा उपहास करते. तर आतां हें तिला नेऊन दाखवितों. म्हणजे प्रत्यक्ष राजाकडून असलें असलीं मोठीं इनामें मिळविण्यासारखें माझें शहाणपण आ[illegible] असें समजून ती अंमळ खजील होईल, व यावेळच्या आमच[illegible] थाट पाहून तिला आनंदही वाटेल. तर अंमळ मला घरीं जाऊन येण्याची मोकळीक दे.' असें बोलून वसंतक जाऊं लागला.

त्याचा हात घट्ट धरून राजा ह्मणाला, 'छे! या वेळीं जाऊं नको. ती तुझी भटीण कोठें जात नाहीं. कडें तिला दा-

खवायाचें असलें तर मग दाखीव. आधीं दिवस किती बाकी राहिला आहे तें तर पहा.'

राजाच्या आग्रहापुढें निरुपाय झाल्यामुळें **वसंतक** इकडे तिकडे पाहून आनंदित झाल्यासारखें करून म्हणाला, ' मित्रा, पहा पहा ! अतिशयित प्रेमानें ज्याचें हृदय अनावर झालें आहे, असा हा भगवान् सूर्य संध्यारूपिणी स्त्रीनें भेटीच्या संकेताची खूण केल्यामुळेंच कीं काय अस्ताचलाच्या शिखरावरील दाट झाडींत प्रवेश करीत आहे !'

हें ऐकून संध्याकाळ झाला, व आतां रात्र पडली म्हणजे **वसंतकानें** संकेत करून ठेविल्याप्रमाणें आपल्या हृदयवल्लभेची गांठ पडेल असें समजून, आनंदित झालेला **राजा** म्हणाला, गड्या, तूं खरेंच अनुमान केलेंस. हा दिवस बहुतकरून सरल्यासारखाच आहे. हें पहा, हा सूर्य दशदिशा परिभ्रमण करून अस्ताचलावर प्राप्त झाला आहे. आणि कमलिनीरूप आपल्या स्त्रिला—हे पद्मवदने प्रिये, आतां मी जातों. हा माझा जाण्याचा समयच आहे. तूं आतां मी गेल्यामुळें विरहानें दुःखित होऊन नेजशील ( मिटशील ). तुला पुन्हा मीच जागी करीन— याप्रमाणें त्या पर्वताच्या डोक्यावर ज्यानें आपले कर ( किरण ) ठेवेले आहेत, असा सूर्य आपल्या प्रियेचें समाधान करीत आहे असें वाटतें. तर आतां ऊठ, आपण त्या मोगरीच्या मंडपाखालीं जाऊन, प्रियतमेच्या येण्याची वाट पहात बसूया.'

हें राजाचें भाषण ऐकून **वसंतक** म्हणाला, ' फार चांगला विचार काढलास. चला आपण तिकडेच जाऊंया.' असें म्हणून दोघेही त्या लतामंडपाकडे जाऊं लागले.

जातां जातां काळोखाची शोभा पाहून **वसंतक** म्हणाला, प्रियमित्रा, पहा पहा, अंगाळ इकडे पहा, विरळ असलेल्या

वनांतील झाडांच्या रांगांत प्रवेश करून त्यांला अगदीं सघन करून सोडणारा, आणि पुष्ट अशा रानडुकराप्रमाणें किंवा रेड्यासारखा कुळकुळीत काळा दिसणारा, पूर्वदिशेला आच्छादन करीत होत्साता, हा अंधकाराचा समुदाय हळू हळू चहूंकडे प्रसरत आहे.'

**राजा** चहूंकडे पाहून म्हणाला, 'अरे, तूं चांगलें उपलक्षण केलेंस. हा अंधकार प्रथम पूर्वदिशेलाच व्यापित असून नंतर इतर दिशांला व्यापतः व्यापतां हळु हळू पर्वत, वृक्ष, शहरें, देश इत्यादि पृथ्वीच्या सर्व भागांला व्यापून टाकितो. याप्रमाणें मोठा झालेला हा अंधकाराचा संघात लोकांचे डोळे देखील व्यापून टाकील! तर आतां मला माधवीलतामंडपाचा मार्ग कोणता तो आधीं दाखीव.'

नंतर **वसंतकानें राजा**चा हात धरून त्याला पुढें नेलें. अंमळ दूर गेल्यावर अंधकारानें जिकडे तिकडे दिसत नाहीं असें पाहून तो **राजा**ला म्हणाला, 'मित्रा, झाडें दाट असल्यामुळें अंधकाराच्या गोळ्यासारखें दिसणारें हें मकरंदोद्यान जवळ आलें आहेंसें वाटतें. तरी पण आतां या ठिकाणीं आपल्याला वाट कशी दिसेल? माझे तर डोळे अंधारानें गच्च भरल्यासारखे झाले आहेत.'

हें ऐकून **राजानें** जवळच्या झाडांचा वास घेऊन अनुमानानें अमकीकडून रस्ता असावा, असें आपल्या मनांत निश्चित केलें, आणि **वसंतका**ला म्हणाला, 'अरे, तुला रस्ता समजला नाहीं; पण मला चांगला समजला. हा जो समोर दिसतो आहे, तो चाफ्यांच्या झाडांचा ताटवा आहे. याच्या पुढची ही दुपारीच्या वृक्षांची रांग आहे. त्याच्या पुढें ही उंच उंच दिसत आहे ती बकुळीच्या झाडांची ओळ असावी

ह्या झाडांचा निरनिराळ्या प्रकारचा वास घेऊन घेऊन द्विगुणित अंधकारानें झांकून गेला आहे, तरी हा मार्ग मला अगदीं स्पष्ट दिसत आहे!' याप्रमाणें चांचपत चांचपत ते दोघेही माधवीलतामंडपाजवळ येऊन पोहोंचले.

तेव्हां **वसंतक** म्हणाला, 'पुष्पांचा रस प्राशन करून, उन्मत्त झालेले भ्रमर बसल्यानें खालीं पडणाऱ्या बकुळवृक्षांच्या सुवासिक फुलांच्या वासानें दिशा सुगंधित केल्या आहेत. अत्यंत मृदु अशा माणकांच्या शिलांवर हळुहळु संचार करणाऱ्या स्त्रियांच्या पावलांच्या आवाजानें सूचित केला जाणाऱ्या ह्या माधवीलतामंडपाच्या आपण अगदीं जवळ येऊन पोहोंचलों. तर आतां तूं येथेंच वाट पहात बैस. मी राणीचा वेष घेतलेल्या **सागरिकेला** घेऊन लौकर येतों.'

हे **वसंतकाच्या** तोंडचे शब्द **राजाला** किती आनंदकारक झाले असतील हें कांहीं सांगतां येत नाहीं. त्यानें कांहीं एक हरकत न घेतां एकदम त्याला जाण्याची परवानगी दिली. व कसेंही करून होईल तितक्या त्वरेनें लौकर येण्याविषयीं त्याला सांगितलें. 'तूं घाबरा होऊं नकोस. हा मी आत्तां येतों,–असें सांगून **वसंतक** निघून गेला.

इकडे–तो येईपर्यंत माणकांनीं खचलेल्या त्या चबुतऱ्यावर बसून प्रियेची वाट पहावी, असा विचार करून **राजा** तेथें जाऊन बसला. वस्तुतः **वसंतक** गेला त्याला फार वेळ झाला नाहीं, व त्याला जाऊन परत येण्याला थोडा तरी वेळ अवश्य पाहिजे होता; पण कामातुर झालेल्या **राजाला** तो अजून कां येत नाहीं याची चटपट लागली. या खेपेला प्रियेच्या समागमाची मसलत अगदीं पक्की केली आहे, तरी तें काम पार पडेल, याची त्याला खात्री नव्हती.

राणी **वासवदत्ता** कांहीं तरी विघ्न करील, ही गोष्ट वरचे-वर त्याच्या मनांत येत होती.

वराच वेळ चिंतन करून तो आपल्याशींच म्हणाला, 'काय असेल तें असो. कामी पुरुषाचा आपल्या गृहिणीचा समागम सोडून नव्या नव्या माषुकांवर विलक्षण प्रकारचा पक्षपात असतो, यांत कांहीं संशय नाहीं. कारण कोणी तरी आपल्याला पहातील या शंकेनें प्रफुल्लित अशा दृष्टीनें ती डोळेभर आपल्या तोंडाकडे पहात देखील नाहीं, गळ्याला घट्ट मिठी मारून प्रेमानें छातीला उरोजांचा समागम होऊं देत नाहीं. हातांत घट्ट धरली तरी वरचेवर, ' मी जातें; मी जातें,' असें म्हणते व असें असल्यामुळें समागम झाला तरी ती त्या पुरुषाच्या मनांतले सर्व हेतु पूर्ण करीत नाहीं, तरी संकेता-च्या जागीं भेटलेली स्त्री पुरुषाचें मन फारच रममाण करिते!'

असे उद्गार काढीत असतां **वसंतका**च्या येण्याकडचें त्याचें लक्ष्य थोडें कमी झालें होतें; पण पुन्हा त्याची आठवण करून म्हणाला, 'अरे, पण अजून **वसंतक** कां येत नाहीं! कदा-चित् राणी **वासवदत्ते**ला ही आमची मसलत समजली तर नसेल ना?'

**वासवदत्ते**ची अगदीं विश्वासू दासी **कांचनमाला** हि-ला **मदनिकेनें** सर्व हकीकत सांगितली होतीच. **सागरि-केला वासवदत्तेचा** व तिची सखी **सुसंगता** हिला **कां-चनमालेचा** वेष देऊन मकरंदोद्यान नांवाच्या बागेंत या लोगणीच्या मंडपांत **सागरिके**ची **राजाशीं** भेट करून द्याव-याची, अशी **वसंतकानें** मसलत केली होती. ती **कां-चनमालेनें वासवदत्तेला** आधींच कळविली. तिच्याक-डून ती हकीकत ऐकून तिला मोठेंच आश्चर्य वाटलें.

ती ह्मणाली, 'अग कांचनमाले, खरेंच का माझा वेष घेऊन सागरिका आर्यपुत्राला भेटणार आहे?' यावर कांचनमाला ह्मणाली, 'हो खरेंच. नाहीं तर मी बाईसाहेबांजवळ खोटें बोलेन काय? पण इतकें कशाला! चित्रशाळेच्या दरवाज्यांत वसंतक वाट पहात बसला असेल, त्याला पाहिलें ह्मणजे सहजच आपल्या मनाची खात्री होईल.'

हें ऐकून वासवदत्ता ह्मणाली, 'तर मग तिकडेच आधीं जाऊंया.' असें बोलून दोघीही चित्रशाळेच्या दरवाज्याजवळ येऊन पोहोंचल्या.

त्या अगदीं जवळ आल्या, तेव्हां पायांतल्या पैंजणांचा मंजुळ शब्द ऐकूं आलासा वाटल्यावरून, वसंतक कानोसा घेऊन आपल्याशींच ह्मणाला,–हा येथें जवळच पैंजणांचा शब्द ऐकूं येतो. पावलें वाजल्यासारखीं वाटतात. तेव्हां कोणी तरी स्त्री इकडे येत आहे यांत तर संशय नाहीं; पण ही सागरिकेवांचून दुसरी कोण असणार? आज संध्याकाळीं संकेत झाला आहे. त्याप्रमाणें सागरिका इकडे आली असावी. असें वाटतें.'

वसंतकाचें हें बोलणें कांचनमालेनें अथवा राणी वासवदत्तेनें ऐकिलें नव्हतें. त्या दोघीही थेट चित्रशाळेच्या दरवाज्यांत येऊन पोहोंचल्या. तेव्हां कांचनमाला म्हणाली, 'बाईसाहेब, चित्रशाळा म्हणतात ती हीच. आपण अगदीं तिच्या दरवाज्यांत येऊन पोहोंचलों आहों. तर आतां क्षणभर येथेंच आपण उभें रहावें. इतक्यांत मी वसंतकाला त्याच्या ओळखीची खूण करितें. तो पहा, तेथें बसला आहे.' असें सांगून कांचनमाला अंमळ पुढें गेली आणि चुटकी वाजवून वसंतकाला तिनें खूण केली.

आपण केलेली मसलत राणीला माहीत झाली असून तीच स्वतः आली आहे, हें या बिचाऱ्या **वसंतका**ला मुळींच माहीत नव्हतें. प्रत्यक्ष राणीची जिवलग दासी **कांचनमाला** त्याच्या अगदीं जवळ गेली होती, तरी तिच्याविषयीं त्याला कांहींच संशय आला नाहीं. तशांतून **सागरिके**ची प्रियसखी **सुसंगता** हिनें **कांचनमाले**चा वेष घेऊन **वासवदत्ते**चा वेष घेतलेल्या **सागरिके**बरोबर यावें, असा संकेत ठरला होता. इतकेंही असून रात्रीची वेळ होती, इत्यादि कारणांवरून कांहीं संशय न घेतां तो आपल्या जाग्यावरून **कांचनमाला** उभी होती, तिच्याजवळ गेला, आणि मोठ्या आनंदानें हंसत हंसत ह्मणाला, वाहवा! **सुसंगते**, तूं तर खूपच केलीस! **कांचनमाले**चा वेष अगदीं हुबेहुब घेतलास! शेंकडों मशालीचा उजेड करून आणि चष्म्यांवर चष्मे लावून कितीही बारीक दृष्टीनें पाहिलें, तरी या वेळीं तूं **कांचनमाला** नव्हेस, असें कोणासही वाटणार नाहीं. असो; तूं सर्व कामांत पटाइतच आहेस. बरें, पण **सागरिका** या वेळीं कोठें आहे? आमचें मुख्य पात्र कायतें तें. ती आली ह्मणजे झालें.

हें त्याचें बोलणें ऐकून, **कांचनमाले**ला त्याच्या भोळेपणाबद्दल फार हसूं आलें व तो आपल्या यजमानणीला फसविण्याच्या मसलतींत आहे, म्हणून त्याचा तिला फार रागही आला. तरी तिनें तो भाव व्यक्त न करतां मनांतल्या मनांत दाबून ठेविला. आणि **वसंतका**ला उत्तर द्यावें, तर आपल्या स्वरावरून कदाचित् त्याला ओळख पटेल, ह्मणून विशेष कांहीं न बोलतां, **वासवदत्ता** उभी होती तिच्याकडे बोट दाखवून खुणेनें ती तिथें उभी आहे, असें सांगितलें.

तेव्हां वासवदत्तेकडे पाहून वसंतकाला मोठेंच आश्च-र्य वाटलें. तो ह्मणाला, 'अग, ही तर खरोखर वासवदत्ता-च आहे.'

वसंतकाचें हें वाक्य अमळ संदिग्ध होतें. सागरि-केनें वासवदत्तेचा वेष अगदीं हुबेहुब घेतला आहे, असा त्याच्या बोलण्याचा अभिप्राय होता; पण तो वासवदत्तेच्या लक्ष्यांत आला नाहीं. ती असें समजली कीं, यानें आपल्या-स ओळखलें असून खरोखरच तो माझ्या वेषाची तारीफ क-रीत आहे. सागरिकेचा यांत कांहीं संबंध नाहीं, यावरून तिला तेथें उभें रहावें, हें युक्त वाटलें नाहीं. वसंतकाला आ-पली विशेष ओळख न देतां परत जावें, असा विचार करून ती तेथून निघाली.

एवढ्यावर तो उगीच बसला असता, तर पुढचा प्रसंग त्याच्यावर आला नसता; पण त्याचे पुरते सोहळे व्हावयाचे होते. वासवदत्ता जात होती ती सागरिकाच रागानें जा-त आहे असें समजून, तो ह्मणाला, 'बाई सागरिके, रागा-वूं नकोस. अशी इकडे ये.'

हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकून वासवदत्ता उभी राहि-ली. तिला वसंतकाचा अतिशय राग आला, तरी त्याच्या भोळेपणाबद्दल तिला मनापासून हसूं येऊन ती कांचन-मालेच्या तोंडाकडे पाहूं लागली. कांचनमाला वसं-तकाला ऐकूं न जाई अशा रीतीनें हळूच ह्मणाली, 'मेल्या. ह्या बोलण्याची तुला पक्की आठवण करावी लागेल आणि तेव्हां तोंड वासून रडत बसशील!'

कांचनमाला कांहीं बोलत नाहीं असें पाहून वसंतक वासवदत्तेला ह्मणाला, 'बाई सागरिके, त्वरा कर. हा पहा

पूर्वदिशेकडून भगवान् मृगलांच्छन चंद्रमा उगवत आहे. तो आतां वेळ लावूं नकोस.'

वसंतकाच्या तोंडचे हे शब्द ऐकून **वासवदत्ता** अंमळ दचकल्यासारखी झाली. ती हात जोडून चंद्राची प्रार्थना करून ह्मणाली, ' हे भगवन् मृगलांच्छना! मजवर कृपा कर आणि अंमळ आपला प्रकाश आच्छादित कर. ह्मणजे ज्याच्याकरितां मी रात्रंदिवस काळजी करतें त्याचें माझ्या ठिकाणीं कितीसें प्रेम आहे तें मला समजून येईल.' असें बोलून ती **वसंतकाच्या** पाठीमागून मुकाट्यानें जाऊं लागली.

इकडे **वत्सराज** संकेताच्या जागीं बसून उत्कंठित होत्साता, **सागरिकेची** वाट पहात होता. अद्याप **सागरिका** कां येत नाहीं. याची त्याला मोठी काळजी लागली होती. कामी पुरुष, त्यांना कोणतीही दृढ आशा लागण्यापूर्वी कांहीं तरी शुद्धीवर असतात; पण एकदां आशा उत्पन्न झाली, म्हणजे ती पूर्ण होईपर्यंत त्यांच्या जिवाला चैन कसलें तें मुळींच नसतें. ते नेहमीं अस्वस्थ असतात. वत्सराजाचीही या वेळीं अशीच स्थिति झाली होती. तो आपल्याशींच म्हणाला,— प्रियेचा समागम होण्याची वेळ अगदीं जवळ येऊन ठेपली आहे असें असून माझें मन अतिशय व्याकुळ होतें याचें कारण काय? कदाचित् असें असेल तर कोणास ठाऊक? तीव्र असा मदनाचा संताप, प्रियसमागम होण्याची पक्की खात्री होण्यापूर्वी, तितका बाधक नसेल. पण प्रियेचा समागम होण्याची वेळ जसजशी जवळ जवळ येत जाते, तसतसा तो अधिकाधिक वाढत जातो. उघडच आहे, वृष्टि होण्याचा समय अगदीं जवळ येऊन ठेपला, ह्मणजे सूर्याचा प्रकाश जितका कडक असतो, तितका पूर्वी असत नाहीं.

**राजा**चे वर सांगितल्याप्रमाणें उद्गार चालले आहेत; इतक्यांत **वसंतक**, **वासवदत्ता** आणि **कांचनमाला** हीं तिघें अगदीं जवळ येऊन पोहोंचलीं. **राजा**चे उद्गार ऐकल्यासारखे करून **वसंतक** **वासवदत्ते**ला म्हणाला, 'बाई **सागरिके**, हा पहा माझा प्रियमित्र केवळ तुझीच वाट पहात बसला असून तुला उद्देशून अगदीं मोकळ्या स्वरानें कांहीं बोलत आहे. तर तूं अंमळ येथेंच उभी रहा. मी त्याला तूं आलीस हें कळवितों.'

**वासवदत्ते**नें यावर कांहीं एक उत्तर न देतां, केवळ मानेच्या खुणेनें त्याला आपली संमति दिली. तेव्हां तो मोठ्या घाईनें **राजा**जवळ जाऊन त्याला म्हणाला, 'मित्रा, तूं मोठाच नशीबवान् आहेस. अरे, ही पहा तुझी प्रिया **सागरिका** मी आणली आहे !'

हे **वसंतका**च्या तोंडचे शब्द त्या कामी **राजा**ला अमृतापेक्षांही गोड व प्रिय वाटले. तो अगदीं गलित होऊन बसला होता; पण **वसंतका**च्या भाषणरूप अमृतानें एकाएकीं त्याच्या अंगांत इतकी शक्ति आली कीं, तो एकदम उठून उभा राहिला. आणि **वसंत**काचा हात धरून—' कोठें आहे? ती कोठें आहे?' म्हणून विचारूं लागला.

तो जिला **सागरिका** मानीत होता, ती राणी **वासवदत्ता** अगदीं जवळच उभी होती, तिच्याकडे बोट दाखवून **वसंतक** म्हणाला, 'अरे ! कोठें आहे म्हणजे काय? ही पहा अगदीं तुझ्या समोर आहे.'

**सागरिका** राणी **वासवदत्ते**चा वेष घेऊन येणार, हें **राजा**ला माहीत होतें. त्यांतून यावेळीं तो कामाच्या धुंदींत होता, म्हणून त्याला **वासवदत्ते**ची ओळख पटली नाहीं. जिच्या-

करतां तो इतका तळमळत होता, ती सागरिकाच ही आहे असें समजून तो तिच्याजवळ जाऊन म्हणाला,' प्रिये सागरिके, तूं किती तरी सुंदर दिसत आहेस ! हें तुझें मुख केवळ चंद्रच आहे. हे तुझे काळे भोर नेत्र रात्रिविकासी कमलासारखेच आहेत. हे तुझे कोमल हात तर हुबेहुब कमळेंच. ह्या तुझ्या दोन्हीही मांड्या केळीच्या कांडीसारख्या असून हे बाहु कमलतंतूसारखे शोभत आहेत. याप्रमाणें तुझीं अंगें केवळ आनंदकारक आहेत. म्हणून निःशंकपणें तूं मला आलिंगन देऊन मदनाच्या दाहानें अगदीं कोमेजलेलीं अशीं माझीं गात्रें एकदांचीं टवटवीत कर !'

राजाचें हें भाषण अगदीं मोकळ्या मनाचें असून तें त्याणें मोठ्या प्रेमानें केलें होतें; पण तें ऐकून वासवदत्तेच्या शरीराची अगदीं लाही झाली. ती डोळ्यांतून टपटप अश्रुबिंदु टाकीत राजाला ऐकूं न येईल अशा रीतीनें कांचनमालेला म्हणाली, 'अग कांचनमाले, स्वतः आर्यपुत्र या वेळीं असें बोलत आहे. बरें, पण पुन्हा हा माझ्याशीं कोणच्या तोंडानें बोलेल बरें? खरेंच, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें!'

हें ऐकून कांचनमाला हळूच म्हणाली, 'बाईसाहेब, असें खरें; पण साहसी अशा पुरुषाला कोणत्या गोष्टी संभवत नाहींत ? सर्व कांहीं संभवतें.'

आपण मानलेली सागरिका आपल्या मित्राशीं कांहींच बोलत नाहीं असें पाहून, वसंतक तिला म्हणाला, 'बाई सागरिके, विश्वस्तपणानें माझ्या मित्राशीं अगदींच कांहीं बोलत नाहींस हें काय? यद्यपि—नित्य रुष्ट असणाऱ्या त्या राणी वासवदत्तेच्या दुर्वचनांनीं कान कसे अगदीं कडू झाले आहेत, तथापि सांप्रत तुझ्या मधुर भाषणांनीं ते अंमळ गोड होतील असें कर.'

**वासवदत्ता** भोळ्या मनाची असून उदार होती. **वसंतक** कांहीं तरी हास्य विनोद करून तिच्या मनाची करमणूक करीत असे; म्हणून तो तिच्या आवडींतला होता. अद्यापि तिला **वसंतका**चा मनापासून राग आला नव्हता; पण जेव्हां का वर सांगितलेले त्याच्या तोंडचे शब्द तिनें ऐकिले तेव्हां तिच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला ! तरी त्यांतले त्यांत तिला हसूंही येत होतें. ती हळूच **कांचनमाले**ला म्हणाली,' अग **कांचनमाले**, खरंच काग, मी अशी कडू बोलणारी आहें ?. आणि हा आर्य **वसंतक** मात्र अगदीं मधुर बोलणारा आहे, नाहीं बरें ?'

**कांचनमालेनें** यावर तिला कांहीं उत्तर दिलें नाहीं; पण **वसंतकाला** हळूच बोटानें भय दाखवून म्हणाली, 'अरे कपाळफुटक्या! भरलीं तुझीं शंभर वर्षें; आतां काय बोलतोस याची तुला पुढें चांगली आठवण होईल !'

**वसंतकानें** ह्या तिच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. **सागरिके**ची भेट करून देण्याची आपण मोठी कामगिरी बजावली, ह्या आनंदांतच तो निमग्न झाला होता. तो **राजाला** म्हणाला, ' मित्रा, इकडे पहा! इकडे पहा ! हा रागावलेल्या कामिनीच्या लाल झालेल्या गालाप्रमाणें आरक्त दिसणारा, आणि पूर्वदिशेला प्रकाश करणारा, असा भगवान् मृगलांछन नुकताच उदय पावत आहे.'

**राजा** चंद्राकडे सस्पृह पाहून म्हणाला,' गडया, तूं म्हटलेंस तें खरें. असें बोलून **सागरिके**कडे पाहून म्हणाला, ' प्रिये, पहा ! पहा ! हा चंद्रमा तुझ्या मुखानें आपलें शोभारूप सर्वस्व हरण केलें, म्हणून रागानें जणुं काय सूड घेण्याकरितांच-उंच अशा उदयाचलावर आपले कर वर करून राहिला आहे. खरेंच गडे, यावेळीं हा चंद्र उदय पावला; यावरून त्याणें आपलें जडत्व

मात्र दाखविलें. 'नाहीं तर तूंच पहा कीं, हा उदय पावल
पासून जीं जीं कांहीं कार्यें व्हावयाचीं तीं तीं सर्व झाल
आहेत. हा तुझा मुखचंद्र प्रकाशित होऊन, त्याणें सूर्यविका
कमलांला निस्तेज केलें नाहीं काय? किंवा याच्या दर्शनानें पा
णारांच्या मनांत भगवान् कामदेव वृद्धि पावत नाहीं काय
तात्पर्य, चंद्र उदयाला आल्यापासून जें कांहीं व्हावयाचें
सारें होतच आहे. फार झालें तर—आपल्यापासून अमृतला
होतें, अशी एक त्याला घमेंडी असेल; पण तें देखील तुझ्
अधरोष्ठांत आहे. मग तुझा मुखचंद्र असतां, हा उगी
कशाला उदयास आला!'

**वासवदत्तेनें** आपल्या डोक्यावरून बुरखा घेतला होत
व **राजा** निःशंकपणें काय काय बोलतो, तें सर्व ऐकण्याक
रितां हावेळपर्यंत ती उगीच उभी राहिली होती. पण यावेळ
तिला अतिशय राग आल्या कारणानें तिच्यानें उगी राहव
नाहीं. तत्काल डोक्यावरून घेतलेलें वस्त्र काढून **राजा**
म्हणाली, 'आर्यपुत्रा, खरोखर मी **सागरिकाच** आहें! आप
मन तिच्याकडे लागल्यामुळें या वेळीं आपणास सर्व ज
**सागरिकामयच** दिसत आहे!'

हे तिच्या तोंडचे शब्द ऐकून **राजा** अगदीं सुकल्यासारख
झाला. आतां त्याला **वासवदत्तेची** पुरती ओळख पटली.
एकीकडे तोंड करून हळूच **वसंतकाला** म्हणाला, 'अरे
मोठें विलक्षणच झालें! ही राणी **वासवदत्ता** येथें कशी आली
मित्रा **वसंतका**, हें काय झालें तें पाहिलेंस का?'

हें ऐकून **वसंतक** म्हणाला, 'महाराज! आपलें तर ठीक
आहे म्हणा. पण आमच्या मात्र जिवावर बेतली खरी!'

राजाला यावेळीं कांहीं सुचेनासें झालें. चोर कितीही पक्का असला, तरी नाटीवर सांपडला ह्मणजे त्याचा कांहीं इलाज चालत नाहीं. यावेळीं दुसरा कांहीं उपाय नाहीं असें पाहून, तो मटकन् खालीं बसला, आणि हात जोडून राणीला ह्मणाला, 'प्रिये वासवदत्ते ! मजवर प्रसन्न हो. मी अपराधी तर आहेंच; पण या वेळीं तूं क्षमा कर.'

राजाचें हें भाषण ऐकून वासवदत्तेच्या दुःखाला भरतें आलेंसें झालें. तिनें ह्यावेळपर्यंत तें, मोठ्या प्रयत्नानें आवरून धरलें होतें; पण आतां तिचा उपाय चालेनासा झाला. राजाच्या सन्मुख तिच्या डोळ्यांतून टपटप् अश्रु पडूं लागले. ती सुस्कारा टाकून ह्मणाली, 'महाराज ! 'प्रसन्न हो' हीं अक्षरें आतां माझ्याकडे लावायाचीं नसून त्यांची जागा निराळीच आहे! कदाचित् चुकून आपल्या तोंडांतून तीं निघालीं असतील ह्मणून सांगितलें !'

वरील प्रकार पाहून वसंतक विचार करीत आपल्याशीं ह्मणाला,—आतां येथें काय युक्ति रचावी बरें! असो; असें बोलावें ह्मणजे झालें. याप्रमाणें आपल्या मनांत कांहीं युक्ति योजून राणीला ह्मणाला, 'बाईसाहेब! आपण मोठ्या पोक्त विचारी आहां. प्रियमित्रानें ( राजानें ) असें करूं नये; पण चुकून गोष्ट घडली. त्याला आतां कांहीं उपाय नाहीं. तथापि हा ऐवढा एक अपराध आपण सहन करावा.'

वासवदत्तेला मागच्या पुढच्या पुष्कळ गोष्टी या वेळीं सुचल्या होत्या. राजाला घालून पाडून बोलायची ही तिला आयतीच संधी मिळाली. त्याच्यावर तिचें निष्कृत्रिम प्रेम असल्यामुळें, तिला तसें करणें इष्ट होतें. वसंतकाच्या बोलण्यावर ती ह्मणाली, 'भावोजी. मला करली क्षमा क-

रण्यास सांगतां! माझा कांहीं कोणी अपराध केला नाहीं. अगदीं पहिल्या समागमांत मींच विघ्न केलें, हा माझा मोठा अपराध आर्यपुत्रानें क्षमा केला ह्मणजे झालें.'

यावेळीं ती जें काय बोलेल तें मुकाट्यानें ऐकून घेणें भागच होतें. **वत्सराज** तिचें तें भाषण ऐकून ह्मणाला,' याप्रमाणें प्रत्यक्ष अपराध तुझ्या दृष्टीस पडला आहे, तेव्हां आतां याबद्दल काय बोलावें ? तथापि माझी एक विनंती आहे, तेवढी मान्य करशील तर कर. असा लज्जित झालेला मी,—आळत्याच्या रसानें लाल झालेले हे तुझ्या पायांचे तळवे आपल्या मस्तकावर घेऊन त्याच्या घर्षणानें त्यांची लाली घालवूं काय? ह्या तुझ्या मुखचंद्रमंडलावर कोपरूपी ग्रहणानें प्राप्त झालेला काळेपणा जर माझ्या ह्या कृतीनें जाईल, तर तूं मजवर मोठा अनुग्रह केलास असें होईल!' असें बोलून राजा तिच्या पायां पडूं लागला.

तेव्हां **वासवदत्ता** हातानें त्याला निवारण करून ह्मणाली, ' आर्यपुत्र, उठा ! उठा ! उगीच कशाला पायां पडतां? आपलें मन अशा प्रकारचें आहे असें जाणून, पुन्हा आपल्यावर राग करणाऱ्या मनुष्याला केवळ दुर्जन किंवा मूर्ख ह्मटलें पाहिजे. असो; उगीच मी तुमच्या क्रीडेंत विघ्न कशाला करूं ? मी आपली जातें., आपण खुशाल काय करायचें असेल तें करा! ' असें बोलून राजाला झिटकारून **वासवदत्ता** जाऊं लागली.

तेव्हां **कांचनमाला** तिला ह्मणाली, ' बाईसाहेब, या वेळीं प्रसन्न व्हाना कां ? महाराज आर्जवें करून पायां पडत आहेत. तर या वेळीं त्यांचें बोलणें अमान्य करून आपण

गेलां तर मग खरोखरच पश्चात्ताप होईल. तेव्हां त्यांची मर्जी मोडूं नये, हें मला बरें वाटतें.'

हें ऐकून **वासवदत्ता** राणी तिला म्हणाली, 'अग जा, वेडी कोठली! आतां येथें पश्चात्ताप होण्याचें काय कारण राहिलें आहे? आणि तो करून तरी घेत आहे कोण? लवकर चल. आतां आपण जाऊं या.' असें बोलून **कांचनमाले**ला बरोबर घेऊन **वासवदत्ता** तेथून निघून गेली. तिच्या मागून जाऊन-तुझ्या पायां पडतों, अमुक करतों, तमुक करतों, असें **राजा**नें पुष्कळ सांगितलें; पण तिनें त्याच्या विनवण्यांकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं.

इकडे **राणी**च्या संबंधानें **राजा** विलाप करीत होता, त्याला **वसंतक** ह्मणाला, 'अहो महाराज! उठा आतां. ती तुमची रागीट बायको गेली. आतां तुह्मी उगीच येथें अरण्यरोदन करीत कां बसलां आहां?'

**राजा** ह्मणाला, 'गड्या, **राणी** गेली तर खरी; पण माझ्यावर अनुग्रह केल्यावांचून कशी गेली बरें?'

**वसंतक** म्हणाला, 'आणखी अनुग्रह तो कसला करावयाचा? आमच्या शरीराला कांहीं इजा झाली नाहीं, हा कांहीं लहानसाहान अनुग्रह नव्हे! मला तर आपणावर मुष्टिमोदक खाण्याची पाळी येईल असें वाटलें होतें! होय, करता काय! असल्या जबरदस्त बायकांच्या खोड्या केल्या, आणि त्यांनीं जर का ठोकलें, तर तुमच्या सारख्या नेभळ्या नवऱ्यांच्या हातून काय होणार!'

यावर **राजा** ह्मणाला, 'तूं काय माझी थट्टा करीत आहेस काय? हा इतका सर्व अनर्थ होण्याला तुझीच कृति कारण. प्रेम आणि बहुमान यांच्या योगानें वाढलेली ब-

हुत दिवसांची प्रीति—आजपर्यंत कधींही न घडलेली अप्रिय गोष्ट घडली, असें पाहून प्रिया **वासवदत्ता** दुःखाच्या वहरांत काय करील कोणास ठाऊक ? कदाचित् प्राणत्याग करण्यास देखील मागें पुढें पाहणार नाहीं! उघडच आहे, अत्यंत प्रीतीचा परिणाम असा असतो कीं तींत कांहीं चूक झाली, तर ती मुळींच सहन होत नाहीं!'

**राजानें** याप्रमाणें अगदीं मनापासून भाषण करून आपल्याला मोठी काळजी लागल्याचें दाखविलें; पण **वसंतका**ला तें फारसें खरें वाटलें नाहीं. कारण, त्याला मागच्या पुढच्या सर्व गोष्टी ठाऊक होत्या. तो ह्मणाला,' गड्या, उगीच भलतें सलतें कशाला बोलतोस? हा तुझा मित्र **वसंतक** हा कांहीं अगदीं नुकताच परदेशांतून आला आहे असें नाहीं. याला सर्व कांहीं माहीत आहे. आपल्या हातून ही गोष्ट अगदीं प्रथमच झाली, असें कांहीं नाहीं. कदाचित् ह्या प्रकारची नसेल; पण दुसऱ्या प्रकारच्या अनेक गोष्टी झाल्या आहेत. एकंदरींत राणीसाहेबांजवळ आपली पत किती आहे, हें ह्मणजे मला अगदीं माहीत नाहीं असें नाहीं. आणि आमच्या बाईसाहेबही तशा अविचारी नाहींत. मला तर दुसरी कांहीं काळजी नाहीं; पण त्या गरीब **सागरिके**ची मोठी काळजी लागली आहे. बाकी सर्वांचें ठीकच आहे. यावेळीं ती तुझी **राणी** तुझ्यावर रागावली, तर आत्तां घटकेंत पायां पडायला येईल. तुमचें दोघांचें ठीकच आहे; पण ती अनाथ **सागरिका** मात्र संकटांत पडली असेल, यांत कांहीं संशय नाहीं. राणी रागावली तरी तुझें काय करणार? तिच्या क्रोधाग्नीला **सागरिका** ही आहुती होणार आहे! तेव्हां मला मुख्यत्वें तिचीच काळजी आहे.'

**वसंतका**चें हें भाषण ऐकून **राजाला** **सागरिके**ची

आठवण झाली. तेव्हां तो दुःखित होऊन म्हणाला, 'हे प्रिये सागरिके! माझ्या निमित्तानें तूं अशा भयंकर संकटांत पडलीसना! असो; तुला केवळ दैवाच्याच हवालीं केलें आहे.' असें बोलून लांब सुस्कारा टाकून तो तिच्याबद्दल दुःख करीत बसला.

एथवर वर्णन केलेला प्रकार इकडे झाला. म्हणजे वसंतक सागरिकेची राजाशीं भेट करून देण्याची मसलत करीत असतां, ती गोष्ट कांचनमालेला समजली व तिनें राणी वासवदत्तेला ती कळविल्यावरून वर सांगितलेला सर्व प्रकार घडून आला; पण इकडे असें झालें, हें सागरिकेला मुळींच कळलें नव्हतें. ती पूर्व संकेताप्रमाणें वासवदत्तेचा वेष घेऊन ठरविलेल्या ठिकाणीं येऊन पोहोंचली. आपण राणीचा वेष घेतला आहे, हें कदाचित् कोणाच्या तरी लक्षांत येऊन केलेली सर्व मसलत फुकट जाईल, व राणी आपल्यावर रागावेल, याचा तिला मोठा धस्का होता. तरी चित्रशाळेच्या दरवाज्यांत येईपर्यंत ती मोठ्या उमेदींत होती. तेथें आली तों संकेताप्रमाणें वसंतक नेमल्या ठिकाणीं भेटावयाचा, पण तो कोठें दिसला नाहीं, याभुळे तिची बरीच निराशा झाली. तथापि ती तशीच पुढें गेली.

इतक्यांत कांचनमालेचा वेष घेऊन येणारी सुसंगता राजाकडे जाऊन रागारागानें परत येत असतां, वाटेंत राणीच्या दृष्टीस पडली. वासवदत्तेला हें सारें कारस्थान माहितच होतें. सुसंगता वेषांतर करून येत आहे असें पाहून, वासवदत्तेनें कांचनमालेकरवीं पकडवून तिला आपल्याबरोबर जनानखान्यांत घेऊन गेली. सागरिकेवरही तसाच प्रसंग आला असता; पण यावेळीं ती हातास मिळाली नाहीं.

तेथल्या हेथें आड राहून मुकाट्यानें काय काम होतें तें पहात होती. राणीनें **सुसंगते**ला जे कांहीं खासडे मारले त्यावरून आपलें कृत्य उघडकीस आलें असें जाणून **सागरिका** अगदीं निराश झाली.

ती उसासा टाकून उद्विग्न होत्साती आपल्याशींच ह्मणाली, बरें झालें ! बाईसाहेबांचा वेष घेऊन ह्या संगितशाळेंतून येत असतां, मला कोणी ओळखलें नाहीं. हीं दैवानें मजवर मोठी मेहरबानीच केली ह्मणावयाची. बरें, एथपर्यंत तर सर्व ठीक झालें; पण आतां पुढे काय करावयाचें !' असें बोलून डोळ्यांतून टपटप अश्रु गाळीत होत्साती चिंता करीत उभी राहिली.

इकडे **वसंतक** राजाला ह्मणाला, 'अहो, मूढासारखे उगीच काय उभे राहिलां ? आतां येथें काय उपाय करावा याचा कांहीं विचार करा.'

**राजा** ह्मणाला, 'मित्रा, मी त्याचाच विचार करीत आहें; पण राणीला प्रसन्न केल्यावांचून दुसरा कांहीं उपाय दिसत नाहीं. तर चल, आतां तिकडेच ( राणीकडे ) जाऊं या.' असें बोलून **वसंतका**सहवर्तमान **राजा** तेथून निघाला.

इकडे **सागरिका** डोळ्यांतून गळणारे अश्रु पुसून विचार करून, आपल्याशींच ह्मणाली, ' उगीच कशाला आशा करीत बसावें ? ह्या अशा दुःखकारक स्थितींत राहण्यापेक्षां मरणें बरें ! पण तें तरी का आपल्या स्वाधीनचें आहे ? मी तर दुसऱ्याची बटीक झालें आहें. तेव्हां कोणच्याच कामांत माझी मालकी नाहीं. बरें, सांधि कोणऱ्याला कोठें तरी राहून आपल्या दुःखाचे दिवस काढीत रहावें ह्मटलें, तर हें मन अगदीं अनावर झालें आहे. दुर्लभ मनुष्यावर ह्यानें हव्यास ध-

ला आहे. आणि त्याची तर प्राप्ति कशी होईल हें समजत नाहीं. तशांतून आजपर्यंत ह्या सर्व गोष्टी माझ्या मनांतल्या मनांत होत्या; पण आतां मला दुसरी एक अडचण उत्पन्न झाली आहे ! आर्य **वसंतकानें** मला या दुःखांतून मुक्त करण्याकरितां जी मसलत केली होती, ती माझ्या फुटक्या नशीबानें उघडकीस येऊन, माझी प्रियसखी **सुसंगता** बाईसाहेबांच्या हातीं सांपडली. तिला आतां काय काय बोलणीं ऐकावीं लागतील व तिची काय अवस्था होईल, हें एका देवावांचून दुसऱ्या कोणाला कळावयाचें नाहीं ! माझीही तशीच अवस्था व्हावयाची; पण मी तो प्रसंग येऊं देणार नाहीं. राणीसाहेबांकडून अपमान व काळजास टोंचणारीं बोलणीं ऐकून, **सुसंगते**प्रमाणें जिवंत राहण्यापेक्षां मरून जावें हें बरें. तर आपण आतां ह्या अशोक वृक्षाखालीं जाऊन मनांत योजल्याप्रमाणें पुढची तयारी करावी, असा विचार करून ती पुढें जाऊं लागली.

इतक्यांत तिच्या पावलांचा आवाज ऐकून **वसंतक** राजाला म्हणाला, 'थांब, अंमळ थांब. अरे, पावलें वाजल्यासारखें कांहीं ऐकूं येत आहे. मला वाटतें, कीं राणीला पश्चात्ताप होऊन कदाचित् ती तुझी क्षमा मागण्याकरितां परत आली असेल.'

हें ऐकून **राजा** अंमळ खुष होऊन म्हणाला, 'कदाचित् तसें असेल. ती माझी प्रिया मोठी उदार मनाची आहे. कदाचित् तूं म्हणतोस त्याप्रमाणें न होईल असें नाहीं तर लक्ष्यपूर्वक पहा, तीच आली आहे कीं काय तें.' **राजानें** असें सांगितल्यावरून **वसंतक** त्याला सोडून जिकडे पावलें वाजत होतीं तिकडे जाऊं लागला.

इकडे **सागरिका** हळूहळू चालत अशोकवृक्षाजवळ पो चली. त्या झाडावर एक सुंदर मोगरीची वेल सोडली हो **सागरिके**ला मरण्याची तयारी करावयाची होती; पण गळ्या फांस लावून घेण्याचें कांहीं साधन तेथें तिला मिळेना. अं विचार करून त्या वेलीकडे पाहून म्हणाली, 'ओहो! मी त तका वेळ उगीच घालविला. ही मोगरीची वेल मला गळफां लावून घेण्याच्या कामीं मोठीच उपयोगी आहे. तर हिचा फां करून तो आपल्या गळ्याला घालावा, म्हणजे सर्व काम होईल असा विचार करून ती त्या वेलीचा फांस करून आपल् गळ्याला घालीत असतां, तिला उद्देशून म्हणाली, 'गडे माधवी लते! तूं तर माझ्यासारखीच अबला आहेस. तूं आपल्या प्रि याला (ह्या अशोकवृक्षाला) आलिंगन करून राहत असल्या मुळें, यावेळीं मला कसें दुःख होत आहे, याची कदाचित तुझ्य मनांत कल्पना येणार नाहीं. म्हणून माझें हें कृत्य केवळ अवि चाराचें आहे, असें वाटून कदाचित् तुला रागही येईल. तर त्या बद्दल मला क्षमा कर. आणि माझ्यासारख्या दुर्दैवी स्त्रियांचे स्थिति मनांत आणून मला एकदांची दुःखमुक्त होण्याच्या कामी साह्य कर!'

याप्रमाणें त्या वेलीची प्रार्थना करून तिनें तो फांस आपल्या गळ्याला बांधला. कांहीं हरकत न येती, तर दह पांच पळांत तिचा आणि या मृत्युलोकाचा पूर्ण वियोग झाल असता! आपली ही शेवटची वेळ आहे असें समजून तिल आईबापांचें स्मरण होऊन अतिशय दुःख झालें. आणि यावेळीं मनांत काहीं शंका न धरितां त्यांला उद्देशून मोठ्यानें म्हणाली, 'अहो बाबा! अग आई! ही पहा मी तुमची आवडती मुलगी सांप्रत अगदीं अनाथ व अशरण झालें असून

आपल्या दुर्दैवानें मरत आहें!' असें बोलून ती फांस ओढणार इतक्यांत **वसंतक** जवळच होता, तो तिचा शब्द ऐकून, धावऱ्यां धावऱ्यां धांवत पुढें आला.

सागरिकेनें **वासवदत्ते**चा वेष घेतला होता, तेव्हां **वसंतक**–ती खरोखरीच **वासवदत्ता** आहे असें समजला, व **राजा**वर रागावल्यामुळें, ती प्राणत्याग करीत आहें असें त्याला वाटलें. तो **राजाला** म्हणाला, 'अरे ! हें काय? ही देवी **वासवदत्ता** प्राणत्याग करण्यास सिद्ध झाली आहे!' असें म्हणून गडबडीनें मोठ्यानें ओरडला. 'अरे मित्रा ! अरे मित्रा ! लवकर धांव ! लवकर धांव ! रक्षण कर! रक्षण कर! ही पहा देवी **वासवदत्ता** गळफांस लावून प्राणत्याग करून घेत आहे ! '

हें ऐकून गडबडीनें उठून **राजा** एकाएकीं जवळ आला. ती कोठें आहे ? म्हणून त्यानें विचारलें, तेव्हां **वसंतकानें**, अशोकाच्या झाडाला फांस लावून घेतलेली **वासवदत्ते**चा वेष घेणारी **सागरिका** त्याला दाखविली. झटकन् धांवत जाऊन **राजानें** तिच्या गळ्याचा फांस सोडवून म्हणाला, 'अग साहस करणारे ! वेडे ! हें भलतेंच काय करतेस ? तूं आपल्या गळ्याला पाश लावून घेतलास खरा, पण त्याच्या योगानें माझे प्राण गळ्याकडे आले आहेत ! याकरितां आपल्या गळ्याला फांस लावून दुसऱ्याचे प्राण गळ्याशीं आणणारा हा तुझा स्वार्थी यत्न सोड, आणि असें साहस करूं नकोस.'

ह्यावेळपर्यंत **राजानें** तिला ओळखलें नव्हतें, तरी तिनें त्याला तेव्हांच ओळखलें. लज्जेमुळें **राजाच्या** तोंडाकडे तिच्यानें एकसारखें पाहवेना. तरी त्या आपल्या आवडत्या प्रियाकडे ओझरतें पाहून चकित होऊन म्हणाली, 'अरे, हे

काय! हे महाराज येथें कसे आले? खरोखर यांला पाहून-मी आपल्या जीवावर अगदीं उदार झालें आहें, तरी पुन्हा जिव गहण्याविषयीं अभिलाष उत्पन्न होतो! पण वांचून तरी का करायचें आहे? आपण पुष्कळ इच्छा केली, तरी ह्यांच प्राप्ति कशी होणार? असो. याला एकवेळ पहावें अं वाटत होतें, त्याप्रमाणें डोळेभर पाहून मी कृतार्थ झालें तेव्हां आतां पूर्व संकेताप्रमाणें गळफांस लावून घेऊन प्राणत्याग करण्यास कांहीं हरकत नाहीं.

असा विचार करून ती राजाला ह्मणाली, 'महाराज सोडा! सोडा मला! मी केवळ पराधीन आहें. मल मरण्याला अशी उत्तम संधी पुनः कधींही मिळणार ना त्र आपणही बाईसाहेबांचे अपराधी व्हावें हें योग्य नाहं तर एकदाची मला सोडा, ह्मणजे मी आपल्या जन्मा शेवट गोड करून घेईन!' असें बोलून ती पुन्हा आपल गळ्याला फांस अडकवून घेऊं लागली.

हें तिचें बोलणें ऐकल्यावरून राजाला तिची ओळ पटली. तो जिच्याकरितां इतकी खटपट करीत होता, ती प्राप्त झाल्यामुळें हर्षानें ह्मणाला, 'अरे! ही तर माझी प्रिय सागरिका. ही केवळ माझ्याकरितांच आपल्या जिवाव उदार झाली आहे.' असें बोलून तिनें पुन्हा गळ्यात घातलेला फांस काढून दूर फेंकून दिला आणि तिल ह्मणाला, 'प्रिये सागरिके! हें असें अतिशय साहस करं नकोस. वेड्या सारखा आणखीं हा वेलीचा फांस घेतल आहेस, तो टाकून दे आणि अगदीं जात असलेल्या अशाही प्राणाला अडवून धरणारा असा हा तुझ्या कोमळ बाहूंच पाश क्षणभर माझ्या गळ्याला घाल!' असें बोलून रा

जानें तिच्या हाताचा आपल्या मानेला विळखा घालून तिला आलिंगन दिलें, आणि **वसंतकाला** ह्मणाला, 'मित्रा, कामाग्नीनें संतप्त झालेल्या माझ्या शरीराला शीतल कर-णारी आणि आभाळांत गाजल्यावांचुन होणारी, अशी ही वृष्टि आहे.'

हें ऐकून **वसंतक** ह्मणाला, 'गड्या, तूं ह्मणतोस तें खरें आहे. पण अकालीं येणाऱ्या वातावली (वावटळी) चें रूप धारण करून राणी **वासवदत्ता** इतक्यांत न येईल तर! नाहीं तर तुमची ही तुष्टि कोठच्या कोठें उडून जाईल कोणास ठाऊक!'

**वसंतक** मोठा धोरणी होता. त्याला **वासवदत्ते**ची चाहूल लागली होती; ह्मणून त्यानें पर्यायमात्रानें ही **राजाला** सूचनाच केली. इकडे **वासवदत्ता कांचनमालेला** बरोबर घेऊन **राजाकडे** येत होती. वाटेंत ती **कांचनमालेला** ह्मणाली, 'अग **कांचनमाले**, बाई! मी मोठा निष्ठुरपणा केला नाहीं बरें? माझीं किती आर्जवें चाललीं होतीं आणि प्रत्यक्ष माझ्या पायांवर डोकें काय ठेवलें होतें. असें असूनही मी त्यांला (राजाला) झिटकारून निघून आलें, हें फार वाईट केलें. तर आतां आपणच तिकडे जाऊन क्षमा मागावी, हें चांगलें नाहीं बरें?'

**कांचनमाला** ह्मणाली, 'वाहवा! बाईसाहेब, अ-पल्यावांचून अशीं अक्षरें दुसऱ्या कोणाच्या तोंडांतून निघावयाचीं आहेत? महाराजच पाहिजे तर दुर्जन अ-सोत; पण बाईसाहब, आपल्यांकडे तो दोष यावयाचा नाहीं, हें पाहून मला फार आनंद वाटतो. बरें, तर, लव-कर लवकर जाऊन महाराजांला प्रसन्न करून घेऊं या.'

असें बोलत बोलत दोघी ही **राजा सागरिके**ची समजूत करीत होता तेथें अगदीं जवळ येऊन पोहोंचल्या.

इकडे **राजा सागरिके**ची समजूत करून ह्मणाला; 'अग वेडे, अद्याप तूं मला अगदीं तिऱ्हाइता सारखा मानून माझ्याशीं मोकळ्या मनानें वागत नाहींस व माझे मनोरथ विफल करतेस हें काय ?'

हें **राजाचें** भाषण ऐकून **कांचनमाला वासवदत्तेला** ह्मणाली, 'बाईसाहेब ! हें अगदीं जवळ **महाराजांचें** बोलणें ऐकूं येत आहे. यावरून असें वाटतें कीं, ते आपलेंच (**राणीचें**) समाधान करण्याकरतां इकडे येत असतील. तर आपण लवकर त्यांच्या जवळ जाऊंया.'

हें ऐकून **वासवदत्ता** ह्मणाली, 'असें असेल तर गडे मागच्या बाजूनें जाऊन मी त्यांचे डोळे गच्च धरून, त्यांना प्रसन्न करून घेईन.!'

या दोघींची इकडे अशी मसलत चालली होती; पण **राजाला** त्याविषयीं कांहींच माहीत नव्हतें. तो **सागरिकेला** प्रसन्न करून घेण्याच्या खटपटींत होता, परंतु ती कांहीं केल्या बोलेना. तेव्हां **वसंतक** तिला ह्मणाला, 'बाई **सागरिके**! आतां कां संकोच धरितेस ? अगदीं मोकळ्या मनानें ह्या माझ्या प्रिय मित्राशीं दोन गोष्टी बोल.'

**वसंतकाचें** हें भाषण ऐकून **वासवदत्तेला** मोठा विषाद वाटला. ती ह्मणाली, '**कांचनमाले**, अग ही **सागरिका** इकडे कोणीकडे आली? तर आतां आपण एकदम पुढें नजातां येथेंच आड उभ्या राहून यांचीं काय काय बोलणीं चालतात तीं ऐकून, मग पुढें जाऊंया.' असें बोलून त्या दोघी तेथेंच झाडाच्या आड उभ्या राहिल्या.

इकडे वरचेवर प्रार्थना करणाऱ्या **राजाला सागरिका** ह्मणाली, ‘ महाराज ! ह्या खोट्या प्रेमानें काय होणार आहे ? प्राणापेक्षांही अधिक प्रिय अशा बाईसाहेबांचे पुनरपि आपण कां अपराधी होतां ? एकवेळ झालें तितकें पुरे. ज्या गोष्टी कधीं घडावयाच्या नाहींत त्यांबद्दल व्यर्थ आयास करून काय उपयोग ? ’

हें ऐकून **राजा** ह्मणाला, ‘ अग, तूं अगदीं खोटें बोलणारी आहेस. **राणी**वर माझी विशेष प्रीति आहे असें ह्मणतेस तें खरें नाहीं. ती रागाच्या आवेशानें सुस्कारे टाकूं लागली ह्मणजे मी सुस्कारे टाकतों; तिचें रुदन कापूं लागलें ह्मणजे मी कापूं लागतों. तिणें मौन धरलें ह्मणजे मी गोड गोड बोलूं लागतों; तिनें कपाळाला आंठ्या घालून दृष्टि वांकडी केली ह्मणजे मी तिच्या पायां पडूं लागतों. याप्रमाणें स्वाहजिक कुलीनपणाला अनुसरून योग्य अशा प्रकारची कायती सेवाच मी तिची करीत असतों; पण स्नेहाच्या बंधनानें वृद्धिंगत झालेली प्रीति ह्मणून जी कांहीं आहे ती तुझ्याच ठिकाणीं.’

**वासवदत्ता** आणखी कांहीं वेळ तेथेंच उभी राहती, तर तिला याशिवाय पुष्कळ गोष्टी ऐकायास मिळाल्या असत्या; पण नुकतेच **राजाच्या** तोंडांतून जे उद्गार निघाले—आणि ते तरी यःकश्चित् दासीजवळ—ते ऐकून तिला इतका राग आला कीं, त्याच्या बहरांत ती एकदम **राजाच्या** पुढें उभी राहून रागानें ह्मणाली, ‘ आर्यपुत्रा ! वाहवा ! चांगलें ! ही कृति अगदीं योग्य आहे !’

**वासवदत्तेला** पाहतांच **राजाचे** हातपाय अगदीं गळल्यासारखे झाले. तरी त्याणें एक युक्ति काढून आपला बचाव

करून घेतला. तो म्हणाला, 'देवी! उगीच माझ्यावर रागावूं नकोस. तुझ्यासारखा वेष पाहून ही तूंच असावीस असें वाटल्यावरून मी येथें येऊन बसलों, व तसें बोललों. आतां न जाणून घडलेल्या गोष्टीबद्दल क्षमा कर.' असें बोलून त्यानें तिच्या पायांवर मस्तक ठेविलें.

तेव्हां **वासवदत्ता** त्याला झिटकारून रागानें म्हणाली, '**महाराज**! उठा! उठा! उगीच कां पायां पडतां? कुलीनपणाला उचित अशा सेवेचें दुःख अद्यापि कां अनुभवतां?'

हें तिचें भाषण ऐकून— आपण काय बोललों तें तिनें ऐकलें असें समजून, **राजा** मनांत म्हणाला, काय! हें देखील माझें बोलणें हिणें ऐकलें! तर आतां हिला प्रसन्न करून घेण्याच्या कामीं आमची अगदीं निराशाच झाली म्हणावयाची. असा विचार करून तो मान खालीं घालून उभा राहिला.

राजाचा उपाय हरला, असें पाहून **वसंतक** म्हणाला, 'बाईसाहेब! तुम्ही आपल्या रागवणार तर रागावा; पण तुमचा वेष घेऊन ही गळफांस लावून घेत असतां— प्रत्यक्ष तुम्हींच रागानें जीव देत असाल, असें समजून प्रियमित्राला मी येथें घेऊन आलों. यावरून आमचा हेतु काय होता त्याचा आपण विचार करा. माझें बोलणें खरें वाटत नसेल, तर हा मोग्र्याच्या वेलीचा फांस येथें आहे कीं नाहीं तो पहा!'

असें बोलून त्यानें तो फांस दाखविला. तेव्हां **वासवदत्ता** रागानें त्याच्याकडे पाहून **कांचनमालेला** म्हणाली, 'अग, ह्याच वेलीच्या पाशानें ह्या दुष्ट भटाला आणि त्या शडग्या पोराला बांधून पुढें घेऊन चल.'

याप्रमाणें **राणीचा** हुकूम होतांच **कांचनमालेनें** वसं-

तकाच्या गळ्याला वेलीचा फांस घातला आणि त्याच्या शे-वटांनीं त्याला मारीत मारीत ह्मणाली, 'कपाळफुटक्या ! आतां अपल्या दांडगेपणाचें फळ भोग ! बाईसाहेबांच्या कडून भाच्यांनीं कान विटले, असें तूं बोलला होतास त्याचें स्मरण कर ? ' असें ह्मणून त्याला व **सागरिके**ला बरोबर घेऊन निघाली.

इकडे **सागरिका** आपल्या मनांत ह्मणाली, गी खरोखरच मोठी दुर्दैवी आहें. पूर्वजन्मीं मीं कांहींच पुण्य केलें नव्हतें ह्मणून आपल्या इच्छेप्रमाणें मरायला देखील मी समर्थ होत नाहीं. !

**कांचनमाला वसंतक** आणि **सागरिका** या दोघां-लाही पुढें करून घेऊन जाऊं लागली, तेव्हां दुःखानें हळूच **वसंतक राजा**ला म्हणाला, 'प्रियमित्रा ! **राणी**च्या प्रतिबंधांत दुःखभोगणाऱ्या अशा माझी आठवण ठेव. दु-सरें काय सांगायाचें ? ' असें सांगून तो **राजा**कडे पहात पहात जाऊं लागला. इतक्यांत **वासवदत्ता** ही **वसंतका**ला व **सागरिके**ला वरचेवर रागें भरून **राजा**कडे पहात पहात **कांचनमाले**सहवर्तमान निघाली.

तेव्हां **राजा** दुःखित होऊन, व श्वास सोडून म्हणाला, 'अरेरे ! यावेळीं माझ्या मनाला विश्रांति देणारें असें कां-हींच नाहींसें झालें! दीर्घरोषामुळें ज्यांत हास्य नाहींसें झालें आहे, असें तें **राणी**चें वक्र मुख पहावें, किंवा रागानें वरचेवर जरब दाखविल्यामुळें भयभीत झालेल्या **सागरिके**कडे पहावें, किंवा एखाद्या पशूप्रमाणें करकरून बांधून नेलेल्या त्या **वसंतका**ची काळजी करावी ! किंवा करावें तरी काय ? चहूंकडून माझ्या मनाला एकसारख्या व्यथा झाल्यामुळें माझें समाधान कोणच्याच

रीतीनें होत नाहीं. एकंदरींत या वेळीं मोठी कष्टकारक स्थिति प्राप्त झाली आहे. बरें, पण आतां येथें तरी बसून काय उपयोग? माझी ती रागीट स्वभावाची **राणी** प्रसन्न झाल्यावांचून मला सुख होणार नाहीं. तर आतां अंतःपुरांत जावें हें बरें.' असें बोलून **राजा**ही जनानखान्याकडे गेला."

याप्रमाणें **वासवदत्तेनें सागरिका** आणि **वसंतक** या दोघांलाही बंधन करून अंतःपुरांत नेऊन ठेविलें. **सुसंगते**ला तर या पूर्वींच प्रतिबंधांत ठेविलें होतें. यावरून **सागरिके**चा **राजाशीं** समागम करून देण्याची जी मसलत झाली होती, ती तिणें हाणून पाडली. तरी आतां पुढें काय करावें? याचा तिला मोठा विचार पडला होता. कारण **सागरिका** ही वयानें लहान असून अनाथ होती. तशांतून तिच्यावर **रा-जाची** अतिशय प्रीति जडली होती. तेव्हां तिच्या हातून कोणता अपराध झाला हें उघड केल्यावांचून तिला उघडपणें प्रतिबंधांत ठेवलें, तर आपला दुर्लौकिक होईल व कदाचित **राजा**लाही फार वाईट वाटेल. आणि तिचा अपराध उघड केला तर त्यांत आपलीच मानहानी होणार. तेव्हां आतां करावें काय? याचा तिला मोठा विचार पडला होता. शेवटीं **सागरिके**ला आपल्या माहेरीं ( उज्जयिनीस ) पाठवून दिलें, असा जिकडे तिकडे पुकारा करून गुप्त ठिकाणीं कोठें तरी कोंडून ठेवावें, असा निश्चय केला. व याप्रमाणें तिणें-**सागरिके**ला उज्जयिनीस पाठवून देतें, असें **राजा**ला कळविलें.

**सागरिके**चें जाणें **राजा**ला कितपत मान्य झालें असेल हें येथें सांगावयास नको; पण या कामीं त्याचा कांहीं उपाय नाहींसा झाला होता. आपण नको म्हटलें तर **राणी**ला फारच राग

येणार, म्हणून तो कांहींच बोलला नाहीं. **राणी**नें त्याच्या परवानगीविषयीं विशेष कांहीं विचार न करतां आपल्या संकेताप्रमाणें तिला उज्जयिनीस पाठविल्याचा बाहणा करून **वसंतक** व **सुसंगता** ज्या ठिकाणीं होतीं तेथून तिला काढून आपली विश्वासू दासी **कांचनमाला** हिच्यावांचून दुसऱ्या कोणालाही न कळवितां एका गुप्त ठिकाणीं **सागरिके**ला प्रतिबंधांत ठेविलें. !

**वसंतक** व **सुसंगता** हीं उभयतांही मुळच्या ठिकाणीं होतीं. **राजा** त्यांना सोडण्याविषयीं **राणी**ची फारच प्रार्थना करीत होता; तेव्हां त्या दोघांलाही सोडून द्यावें असें तिच्या मनांत आलें. कारण कलहाचें मुख्यपात्र कायती **सागरिका**! तिला तर आपण पक्क्या बंदोबस्तांत ठेविलें आहे, तेव्हां आतां **वसंतका**ला व **सुसंगते**ला सोडलें आणि त्यांनीं पुष्कळ मसलती केल्या तरी काय होणार आहे? असा विचार तिच्या मनांत आला. ह्मणून **राजा**च्याही ह्मणण्यास मान देण्याकरितां तिणें त्या दोघांस सोडून दिलें, व आपला राग अगदीं शांत झाला असें दाखविल्यावरून **राजा**लाही फार संतोष झाला.

**सुसंगता** प्रतिबंधांतून सुटली तेव्हां तिला **सागरिके**विषयीं फारच दुःख झालें. ती **सागरिके**विषयीं शोक करीत ह्मणाली, 'हे प्रियसखी **सागरिके**! किती तरी मी तुझी आठवण करूं! तुझा तो अतिशय लाजाळू स्वभाव व आपल्या मैत्रिणीविषयींचें प्रेम, तसाच तुझा उदार स्वभाव आणि ती तुझी सुकुमार मूर्ति माझ्या मनांतून कधींहीं जाणार नाहींत! बरें, मला सोडून तूं कोठें गेलीस? ज्याकरितां मी इतकें बडबडतें आहें, तरी याला तूं उत्तर कां देत नाहींस?

मेल्या दैवा ! तूं खरोखरच अगदीं निर्दय आहेस. ! तूं तिला इतकी सुंदर व सुकुमार अशी कां केलीस? बरें केलेंस तें चांगलें झालें. तें अप्रतिम रूप पाहून लोकांच्या डोळ्यांचें पारणें तरी फिटलें असतें; पण मग तिच्यावर असा वाईट प्रसंग कां आणलास ? पण तुला तरी बोलून काय उपयोग ? ती माझी प्रियसखी आतां माझ्या दृष्टीस पडेल काय ?' इत्यादि प्रकारें ती विलाप करीत होती.

**वसंतकानें** आपल्याकरितां फार प्रयत्न केला, व दुःखहो भोगलें ह्मणून **सागरिका** त्याच्याविषयीं फार आभारी होती. उज्जयिनीस नेण्याच्या निमित्तानें तिला बाहेर काढलें, तेव्हां तिणें आपल्या जवळ एक रत्नाची माळ होती ती–कोणा तरी ब्राह्मणाला दे, असें सांगून **सुसंगते**च्या हातीं दिली. ती माळ **वसंतकालाच** द्यावी असें तिच्या मनांत होतें; पण लज्जेनें तिनें **सुसंगते**ला तसें सांगितलें नाहीं, तरी **सुसंगता** आपला अभिप्राय जाणत आहे हें तिला माहीत होतें. ती माळ या वेळीं हातांत घेऊन **सुसंगता** ब्राह्मणाचा शोध करीत होती. इतक्यांत **वसंतक** तिच्या दृष्टीस पडला ! त्याला पाहून **सुसंगता** ह्मणाली, ' आर्य **वसंतका** ! अंमळ उभा रहा.'

इकडे **वसंतक** आपल्याशींच कांहीं पुटपुटत चालला होता. **राजानें राणीला** प्रसन्न करून त्याला सोडविलें, तेव्हां तिणें त्याला लाडू, मोदक वगैरे यथेच्छ खाऊं घालून उत्तम वस्त्रें देऊन, त्याच्या कानांत एक अमोल्य भिकबाळी ही घातली होती. यामुळें **वसंतक** यावेळीं मोठ्या आनंदांत होता. **सुसंगतेनें** हांक मारिली तेव्हां एकाएकीं तिच्याकडे पाहून–'अग **सुसंगते** ! तूं इकडे कोठें आलीस ? आणि तूं अशी मुळमुळ रडतेस तरी

कां ? काय तुझी प्रियसखी **सागरिका** हिचा वाईट परिणाम झाला' कीं काय ? ' असें ह्मणाला.

तें ऐकून **सुसंगता** सुस्कारा टाकून व आपल्या कपाळाला हात लावून ह्मणाली, ' काय विचारतोस ? तें तसलें अप्रिय वर्तमान सांगण्याचें माझ्याच नशीबीं आलें आहे ! ती बिचारी **सागरिका** तेथें दुःख भोगीत होती; पण बाईसाहेबांला-किंवा तिच्या दैवाला ह्मटलें तरी चालेल—तिचा पुरता सूड घ्यावयाचा होता; ह्मणून उज्जयिनीस पाठविल्याचा पुकारा करून मध्यरात्रीच्या सुमारास बाईसाहेबांनीं तिला कोठें नेऊन ठेवलें हें कांहीं समजत नाहीं. ' असें बोलून ती पुन्हा मोठ्यानें रडूं लागली.

**सागरिकेला** उज्जयिनीस पाठविलें, इतकेंच काय तें **वसंतकाला** माहीत होतें. परंतु तिची दुसरी कांहीं व्यवस्था झाली असेल हें आतां **सुसंगते**च्या सांगण्यावरून त्याच्या लक्षांत आलें. तेव्हां तोही अतिशय दुःखी होऊन तिच्याविषयीं विलाप करून ह्मणाला, ' खरोखर **राणी**साहेबांनीं हें फार वाईट व निर्दयपणाचें कृत्य केलें. असो ! देवा! तिला जिवंत ठेव ह्मणजे झालें. अनाथ बिचारी **राणी**च्या क्रोधाग्नीला आहुति झाली नसली ह्मणजे झालें ! '

**वसंतक** याप्रमाणें विलाप करीत असतां **सुसंगता** रत्नमाला पुढें करून-**सागरिकेनें** 'आपल्या जिवावर निराश झाल्यामुळें तुला देण्याकरितां ही रत्नमाला 'माझ्या-जवळ दिली आहे, असें सांगून ती **वसंतकाला** देऊं लागली. तेव्हां तो ह्मणाला, ' यावेळीं आह्मी अशा दुःखका[illegible] गोष्टी बोलत असतां अशा प्रसंगीं ती माळ घेण्यास माझा

हाल कसा पुढें सरेल ? ' असें बोलून त्याणें ती माळ घेण्याचें नाकारलें.

तरी—तिच्यावर अनुग्रहः करण्याकरितां ही घे, ' म्हणून **सुसंगता** फारच आग्रह करूं लागली. तेव्हां ही माळ घेऊन **सागरिके**च्या विरहानें उत्कंठित झालेल्या **राजा**च्या मनाचें समाधान करावें, असा विचार करून त्याणें ती घेतली. आणि लक्ष्यपूर्वक पाहून त्याला त्या माळेविषयीं मोठें कौतुक वाटल्यावरून तो **सुसंगते**ला म्हणाला, ' बाई **सुसंगते**! असला हा अमोलिक दागिना **सागरिके**लाकोठून मिळाला? '

हें ऐकून **सुसंगता** म्हणाली, ' मी ही माळ प्रथमच पाहिली तेव्हां मला अशीच शंका आली होती. म्हणून मी तिला विचारलें. तेव्हां ती वर आकाशाकडे पाहून लांब सुस्कारा टाकून म्हणाली, ' गडे **सुसंगते** ! ही गोष्ट ऐकून तुला काय करावयाचें आहे ? उगीच मला त्या गोष्टीची आठवण करूं नकोस!' असें बोलून ती मोठ्यानें रडूं लागली.

हें ऐकून **वसंतक** म्हणाला, ' बरोबर ! असें असेल तर ती कोणा मोठ्या **राजा**ची कन्या असली पाहिजे. कारण ही माळ लहान सहान मनुष्याला तर असोच; पण मांडलिक **राजा**ला देखील दुर्लभ. आणि ही तिच्या गळ्यांत आहे तेव्हां ती सार्वभौमाची मुलगी असावी यांत संशय नाहीं. बरें असो. या वेळीं आमचे प्रियमित्र ( **राजा** ) कोठें आहेत, तें तुला माहित आहे काय ? '

**सुसंगता** म्हणाली, ' **महाराज** नुकतेच बाईसाहेबांच्या महालांतून निघून स्फटिकाच्या मंडपाकडे जात असतांना मी पाहिलें. तर आतां तें [illegible]

वांची मर्जी संपादून त्यांच्या तैनातींतली दासी होण्याचा प्रयत्न करून पहातें !'

इकडे राजाचें मग अंमळ स्वस्थ झालें होतें, राणी वासवदत्ता प्रसन्न झाल्यामुळें त्याला मोठा आनंद झाला असून तो वसंतकाजवळ त्याच गोष्टी बोलत होता. तो ह्मणाला, 'गड्या, आज मला मोठा लाभ झाल्यासारखें वाटतें. पहा, तिला प्रसन्न करण्याकरितां मीं आपल्याकडून झाला तितका प्रयत्न करून पाहिला, शेंकडों खोट्या शपथा घेतल्या, गोड गोड भाषणें केलीं, तिच्या मनाप्रमाणें वागलों, आपली खिन्नमुद्रा तिला दाखविली; इतकें सर्व करून पाहिलें, तरी कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर तिच्या सख्यांनीं तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, तरी एकंदरींत तिचा राग म्हणून तो मुळींच गेला नाहीं. शेवटीं बहुतवेळ रडून रडून आपल्या अश्रूंच्या उदकानें तिनें आपले आपणच रागरूपी मळ अगदीं धुवून टाकला. याप्रमाणें एकंदरींत राणी तर एकदांची प्रसन्न झाली. तेव्हां आतां मला केवळ सागरिकेचीच कायती चिंता पडली आहे. कारण कमळाच्या आंतल्या भागाप्रमाणें जिचें शरीर अत्यंत सुकुमार अशी ती प्रिया सागरिका-प्रथमच्या प्रीतीनें बळकट अशी माझ्या गळ्याला तिणें मिठी मारली; त्या प्रसंगीं तत्काल माझ्या अंगावर आलेल्या कामाच्या बाणांच्या छिद्रांच्या द्वारानें-माझ्या हृदयांत प्रविष्ट झाली असावी असें वाटतें. तसेंच माझा अत्यंत विश्वासू प्रिय मित्र वसंतक हा माझें विश्रांतिस्थान होता; पण त्यालाही राणीनें प्रतिबंधांत ठेविलें आहे. तेव्हां आतां सागरिकेच्या संबंधानें मला जें दुःख होत आहे व माझ्या मनाची स्थिति कशी झाली आहे तें कोणाजवळ सा-

गात्रें ! मला वारंवार रडूं येत आहे; पण आतां रडावें तरी कोणाजवळ ?' असें बोलून लांब सुस्कारा टाकून, तो चिंता करीत बसला.

इतक्यांत **सुसंगते**नें दिलेली रत्नाची माळ गळ्यांत घालून **राणी**नें दिलेलीं वस्त्रें व भिकबाळी मिरवीत मिरवीत **राजा**चा शोध करीत अकस्मात् **वसंतक** तेथें आला. तो दुरून **राजा**ला पाहून आपल्याशींच ह्मणाला, हा पहा ! माझा प्रियमीत्र निरंतर लागलेल्या उत्कंठेनें कृश झाला आहे, तरी स्वाभाविक सौंदर्यानें शुक्ल द्वितीयेच्या चंद्राप्रमाणें फारच शोभत आहे. असें बोलत बोलत **राजा**च्या जवळ येऊन ह्मणाला, ' मित्रा ! तुझें कल्याण असो ! दैवानें तुझा उदय झाला आहे. कारण **राणी** साहेबांच्या हातांत सांपडलों असूनही ह्या डोळ्यांनीं पुन्हा तुझें दर्शन झालें, हें मोठेंच भाग्य.'

**वसंतका**ला पाहून **राजा**ला अतिशय आनंद झाला. त्याणें त्याला–आपणांस कडकडून भेट, असें सांगितलें. तेव्हां **वसंतक राजा**ला आलिंगन देऊन ह्मणाला, ' मित्रा ! देवीनें मजवर मोठा अनुग्रह केला हें तुला कळलें काय ? '

**राजा** ह्मणाला, ' तुझ्या ह्या पोषाखावरूनच **राणी**नें तुजवर प्रसाद केला आहे असें दिसतें. बरें, ह्यापासून मला मोठा आनंद झाला; पण **सागरिके**कडचें काय वर्तमान तें आधीं सांग. '

याप्रमाणें **राजा**नें प्रश्न केला तेव्हां **वसंतक** खिन्न होऊन खालीं मान घालून उभा राहिला. तो कांहीं बोलत नाहीं असें पाहून **राजा** ह्मणाला, ' गड्या, तूं कांहीं सांगत नाहींस हें काय ? '

**वसंतक** ह्मणाला, 'अप्रिय गोष्ट माझ्यानें सांगव-त नाहीं.'

हें ऐकून **राजाला** निराळाच संशय आला आणि दुःखानें घाबरा झाल्यासारखा होऊन ह्मणाला, 'अरे! अप्रिय ह्मणतोस तें काय? काय' तिणें खरोखरच प्राणत्याग केला किंवा काय? हर! हर! प्रिये **सागरिके**! एकून तूं मला सोडून गेलीस!' असें बोलून तो एकाएकीं मूर्च्छित झाला.

त्याचें समाधान करून **वसंतकानें** त्याला सावध केलें. तेव्हां नेत्रांवाटे दुःखाश्रु सोडून **राजा** ह्मणाला, 'हे माझे प्राण हो! कुटिल अशा मला तुह्मी खुशाल सोडून जा. अरे! तुह्मो तरी सरळ व्हा. ऐका! माझें बोलणें ऐका! अरे, जर तुह्मी लवकर न जाल, तर मूर्ख हो, फसाल. कारण ती गजगामिनी फार दूर गेल्यावर तुमची आणि तिची भेट होणार नाहीं!'

याप्रमाणें **सागरिका** खरोखरच मेली असें समजून **राजा** रडूं लागला तेव्हां **वसंतक** ह्मणाला, 'गड्या, उगीच भलतीच गोष्ट मनांत आणूं नको. त्या बिचारीला **राणी** साहेबांनीं **उज्जयिनीस** पाठविलें असें मी ऐकलें; ह्मणून अप्रिय असें ह्मटलें. दुसरें तिसरें कांहीं एक नाहीं.'

हें ऐकून **राजाला** अंमळ समाधान वाटलें. तो ह्मणाला, 'असो; कोठें तरी जीवंत असेल तर कधींना कधींतरी तिची भेट होईल. बरें, पण तिला **उज्जयिनीस** कां पाठविलें? खरेंच **राणी**ची मजवर फारच कडी नजर ह्मणावयाची. बरें पण तुला हें वर्तमान कोणी सांगितलें?'

याप्रमाणें विचारल्यावरून **वसंतकानें** **सुसंगतेचें** नांव सांगून तिणें सांगितलेली सर्व हकीकत सांगितली. **सुसंगतेनें** **सागरिकेची** रत्नमाला **वसंतकाला** दिली, तेव्हांच

राजाच्या मनाला विश्रांती होईल ह्मणून त्याणें ती घेतली होती ती यावेळीं त्याणें राजाच्या हातीं दिली. ती घेऊन आपल्या हृदयावर ठेवून, राजा ह्मणाला, 'तिच्या गळ्याचा समागम प्राप्त होऊन भ्रष्ट झालेली ही माळ आणि माझी तनु या दोघींची स्थिति एकसारखीच आहे. तेव्हां ह्या समानशील अशा एकमेकीच्या मैत्रिणी होतील. समानशील मैत्रिणीप्रमाणें ही माळ माझ्या तनूला आश्वासन करील. असें बोलून वसंतकाला ह्मणाला, 'गड्या, तूं ही आपल्या गळ्यांत घाल; ह्मणजे हिच्या योगानें तरी मी आपल्या मनाचें समाधान करून घेईन.'

राजाचा हेतु समजून वसंतकानें ती माळ आपल्या गळ्यांत घातली. तेव्हां वारंवार माळेकडे पाहून डोळ्यांवाटें अश्रु सोडून राजा ह्मणाला, 'गड्या, खरोखरच त्या प्रियेचें दर्शन होणें मोठें दुर्लभ!'

यावर भ्याल्या सारखा होऊन चोहोंकडे पाहून वसंतक ह्मणाला, 'अरे! असें मोठ्यानें बोलूं नको. कदाचित् कोणी राणीकडचा मनुष्य येथें फिरत असेल तर तो ऐकेल.'

वसंतक असें ह्मणत आहे इतक्यांत वसुंधरा नांवाची चोपदारीण तेथें आली. आणि राजाच्या समोर येऊन मुजुरा करून ह्मणाली, 'महाराजाचा जयजयकार असो! हा सेनापति रुमण्वान् यांचा भाचा विजयवर्मा सरकाराकडे कांहीं अर्ज करण्याकरितां दारांत उभा आहे. यावर हुकूम होईल त्याप्रमाणें करीन.'

राजानें त्याला लवकर आंत घेऊन येण्याविषयीं हुकूम केल्यावरून वसुंधरेनें त्याला राजा समोर आणिलें. तेव्हां मुजरा करून विजयवर्मा ह्मणाला, 'महाराज!

सेनापति **रुमण्वान्** यांला सरकारांनीं स्वारीवर पाठविलें होतें, त्यांचा तिकडे जय झाला. सरकारच्या चरणांच्या प्रभावानें **कोसल**देशच्या राजाला जिंकून वश केलें आहे.'

"हें ऐकून **राजाला** फार आनंद झाला. तो **रुमण्वाना**-चा तारीफ करून ह्मणाला, "हें काम फार दिवसांपासून माझ्या मनांत घोळत होतें. एवढें मोठें काम असून सेनापतीनें अ-गदीं लौकर पत्ते केलें, हें फार चांगलें झालें. बरें, **विजय-वर्म**जी ! ही हकीगत विस्तारपूर्वक ऐकण्याची माझी इच्छा आहे. तुम्ही येथून गेल्यापासून काय काय तजविजी केल्या तें सर्व इत्थंभूत वर्तमान सांगावें.'

**विजयवर्मा** म्हणाला, 'ऐकावें **महाराज** ! आम्हीं **महाराजां**चा हुकूम घेऊन येथून निघालों ते हत्ती, घोडे, पायदळ, वगैरे मोठें अफाट सैन्य बरोबर घेऊन **विंध्यपर्वता**च्या खोऱ्यांत फौजेचा तळ देऊन बसलेल्या **कोसलराजा**च्या येण्याचा मार्ग धरून तेथें तळ दिला, आणि आपली फौज जिकडे तिकडे व्यवस्थेनें मांडून ठेविली. इकडे **कोसलराजा** मोठ्या गर्वानें फुगलेला असून आपला पराभव ज्याला असह्य झाला आहे असा स्वतःच्या फौजेच्या तयारीस लागला. त्याणें घोडे, पायदळ, वगैरे कांहीं न घेतां केवळ हत्तींचीच सर्व फौज तयार केली.'

**विजयवर्मा** याप्रमाणें लढाईची खबर सांगत असतां भ्याल्यासारखें करून **वसंतक** मध्येंच म्हणाला, 'अरे बाबा ! अंमळ हळूहळू सांग. ही तुझी लढाईची गोष्ट ऐकून देखील माझें काळीज थरथर कांपतें. तुम्ही कसले कठोर आहां को-णास ठाऊक ? तुम्हांला मनुष्य म्हणण्यापेक्षां राक्षस म्हणणें चांगलें !'

वसंतकाच्या थट्टेचा राग न मानतां विजयवर्मा हंसून पुन्हा राजाला म्हणाला, 'महाराज ! याप्रमाणें लढाई करण्याचा निश्चय करून त्या प्रतापी कोसलराजानें आमच्यावर हल्ला केला. तो विंध्यपर्वताची दरी सोडून पुढें आला, तेव्हां पर्वताच्या शिखरासारखे जिकडे तिकडे पसरलेले त्याचे ते हत्ती पाहून दुसरे विंध्यपर्वतच आले कीं काय असें वाटलें ! त्याणें व त्याच्या बरोबरच्या मोठमोठ्या वीरांनीं आमच्यावर एकसारखी बाणांची वृष्टि केली. स्वतः कोसलराजा रुमण्वानाशीं भिडला. कित्येक वीरांचे मुकुट खालीं पडले, कोणाचीं मस्तकें खालीं तुटून पडलीं, कोणाचे हात तुटले, कोणाची छाती फुटली, कोणी भडभडां रक्त ओकूं लागले, कोणी मोठ्यानें गर्जना करूं लागले, आणि रक्ताच्या तर अनेक नद्या वाहूं लागल्या ! एकमेकांचीं कर्में वर्णन काढून रागानें दांत ओंठ खाऊन शस्त्रास्त्रांचा प्रहार करून गर्जना करणाऱ्या वीरांच्या ओरडण्यानें तो प्रदेश नादावल्यासारखा झाला कोसलराजानें मोठ्या शौर्यानें मोर्च्यावर ठेवलेल्या आमच्या फौजेची दाणादाण करून सोडली. तो आमच्या सैन्यावर हल्ला करीत होता; पण आमच्या सेनापतीनें त्याच्या फौजेकडे विशेष लक्ष्य न ठेवितां खुद्द त्याच्यावरच रोंख धरिला होता. तो एकटाच हत्तीवर बसून पुढें पुढें येत असतां, अकस्मात् त्याचा हत्ती आम्हीं घायाळ केल्यामुळें उन्मत्त झाला. तो जिकडे तिकडे सैरावैरां फिरूं लागला, ही संधी पाहून एकट्या सेनापतीनें पुढें सरून शेंकडों बाणांची एकसारखी वृष्टि करून त्याला खालीं पाडिलें.'

हें ऐकून वसंतक आनंदाच्या बहरांत— राजा, तुझा विजय असो ! आज आम्हीं शत्रूला जिंकलें—असें बोलून नाचूं लागला.

**कोसलराजा**चा पराक्रम ऐकून **वत्सराजा**ला फार आनंद झाला. तो म्हणाला, 'शाबास! **कोसलराजा**! शाबास! तुला मरण आलें तथापि तें मोठें वर्णनीय आहे. कारण शत्रूदेखील याप्रमाणें तुझा पराक्रम वर्णन करतात.'

**राजा विजयवर्म्या**ला म्हणाला, 'बरें, पण पुढें काय झालें तें सांग.'

**विजयवर्मा** म्हणाला, 'महाराज! याप्रमाणें **कोसलराजा** वीरपुरुषाला योग्य अशा युद्धभूमींत खालीं पडल्यावर आमचे सेनापति **रुमण्वान्** यांणीं त्याच्या राज्याची व्यवस्था करण्याकरितां माझा वडील बंधु **जयवर्मा** याची योजना केली, व शस्त्रप्रहारानें जखमी झालेली आपली फौज बरोबर घेऊन ते मागाहून येत आहेत. हें आनंदकारक वर्तमान **महाराजां**च्या चरणापाशीं निवेदन करण्याकरितां मी घाईघाईनें पुढें आलों.'

हें ऐकून **राजा** चोपदारणीला म्हणाला, '**वसुंधरे**, लवकर जा आणि प्रधान **यौगंधरायण** याला असें सांग कीं, माझ्या प्रसादाचें महत्व लोकांला दिसेल असें करावें. विजयी झालेला सेनापति **रुमण्वान्** व इतर सर्व सैनिक यांला त्यांचा योग्य सत्कार करून सर्वांला त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें बक्षिसें द्यावीं व आपल्या हातीं आलेल्या **कोसल**देशच्या राज्याचा योग्य बंदोबस्त ठेवावा. ज्याचा गादीवर विशेष हक्क पोंहचत असेल असा त्या राजाच्या वंशांत कोणी असल्यास त्याला गादीवर बसवून राज्य चालवावें.'

**वसुंधरे**ला याप्रमाणें आज्ञा होतांच ती **राजा**ला मुजरा करून **यौगंधरायणा**कडे गेली.

इकडे राणी **वासवदत्ते**कडे **उज्जयिनी**हून एक मोठा

जादुगीर आला होता. राणीच्या मनांत राजानें एकवेळ तरी तो खेळ पहावा, असें होतें. म्हणून तिनें कांचनमालेला बरोबर देऊन त्याला राजाकडे पाठविलें. त्याला बरोबर घेऊन कांचनमाला राजाकेड आली, आणि मुजरा करून लाजत लाजत म्हणाली, 'महाराज! बाईसाहेबांची एक विनंति आहे. हा शंबरसिद्धि नांवाचा जादुगीर उज्जयिनीहून आला आहे, तर हा काय काय चमत्कार करतो तें सरकारानीं पहावें, असा बाईसाहेबांचा हेतु आहे.'

हें ऐकून राजा म्हणाला, 'जादूचा खेळ पाहण्यास आम्हांस मोठीच मौज वाटते. त्यांतून राणीचीही मर्जी आहे तर फारच उत्तम. जा, कोठें आहे तुझा तो जादुगीर त्याला घेऊन ये.'

याप्रमाणें राजाचा हुकूम होतांच कांचनमाला बाहेर जाऊन मोरांच्या पिसांचा कुंचा हातांत घेतलेल्या जादुगिराला घेऊन आली. जादुगीर राजासमोर येऊन—महाराजांचा जयजयकार असो! असा आशिर्वाद देऊन आपल्या हातांतला कुंचा गरगर फिरवून मोठ्यानें हसून म्हणाला, 'सर्व जादुगीरांचा परमगुरु असा जो भगवान् इंद्र त्याला प्रथम नमस्कार असो! तसाच जादू करण्याच्या कामांत ज्याची कीर्ति चहूंकडे स्थिर झाली आहे अशा शंबरासुराला नमस्कार असो!'

याप्रमाणें मोठ्या आदरानें आणखीं कित्येकांला नमस्कार करून राजाला म्हणाला, 'महाराज! माझ्या विद्येचे आपणांला कोणकोणते चमत्कार पाहावयाचे आहेत? बाकीच्या सर्व गोष्टी घटकाभर असोत; पण आपली इच्छा असेल तर पृथ्वीवर चंद्र दाखवीन, आकाशांत पर्वत दाखवीन, उदकांत अग्नी दाखवीन, भरदोनप्रहरीं सायंकाल करून दाखवीन. महाराज! आपला

हुकूम मात्र होऊं द्या. **विष्णु, शंकर, ब्रह्मदेव, इंद्र,** इत्यादि देव व सिद्धचारण व आकाशांत नृत्य करणाऱ्या अप्सरा यांना पाहिजे तर प्रत्यक्ष दाखवीन ! अथवा फार बोलून काय उपयोग आहे ? महाराज, आपल्या मनांत जें जें कांहीं पहावयाचें असेल तें तें सर्व गुरूनें दिलेल्या मंत्राच्या प्रभावानें मी आपल्याला दाखवीन.'

हें त्याचें भाषण ऐकून **वसंतक राजाला** ह्मणाला, 'मित्रा ! याच्याकडे विशेष लक्ष्य पुरीव. याचा तौल तर खूप दिसतो आहे, आणि त्यावरून हा सांगतो त्याप्रमाणें सर्व कांहीं करील असेंही वाटतें.'

**राजानें** त्या जादुगिराला अंमळ थांबण्यास सांगून **कांचनमालेला** सांगितलें कीं-'जा आणि **राणीला** असें सांग कीं हा गारुडी तुमच्याच माहेरचा आहे. याच्याशिवाय दुसरें परकी कोणी येथें नाहीं. तर तुह्मीही इकडेच यावें ह्मणजे आपण उभयतांही याच्या विद्येचा चमत्कार पाहूं.'

**कांचनमालेला** असा हुकूम होतांच ती जाऊन **वासवदत्तेला** घेऊन आली. तो आपल्या माहेराहून आला आहे ह्मणून **वासवदत्तेला** त्या गारुड्याचा विशेष पक्षपात होता. **वासवदत्ता** आली तेव्हां उभयतांचा आदरसत्कार वगैरे होऊन **राजा** आणि ती एकाच आसनावर बसलीं. नंतर **राजा** त्या जादुगिराला ह्मणाला 'हूं, चालूंद्या. तुमच्या खेळाला आरंभ करा.'

याप्रमाणें **राजाचा** हुकूम होतांच गारुड्यानें खेळास सुरवात केली. त्यानें इकडे तिकडे अनेक प्रकारें छों छूं करून हातांतला कुंचा इकडे तिकडे फिरवून मंत्र जपण्यास प्रारंभ केला. प्रेक्षकांला आकाशाकडेस पाहण्यास

त्यानें सांगितलें होतें. त्याप्रमाणें **राजा, राणी** इत्यादि सर्व मंडळ आकाशाकडे पाहत होती. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, पूर्वीं त्यानें सांगितल्याप्रमाणें ब्रम्हादिदेव, तसेंच सिद्ध चारण, अप्सरा, वगैरे आकाशांत दिसूं लागलीं. सर्व प्रेक्षक अगदीं थक्क झाले. **राजा वासवदत्तेला** म्हणाला, 'हा काय चमत्कार आहे तो पहा. कमलावर बसलेला हा **ब्रम्हदेव** पहा! तसाच अर्धचंद्र धारण करणारा हा भगवान् **शंकर** पहा! शंखचक्रादि आयुधें धारण करणारा हा भगवान् **विष्णु**, तसाच ऐरावतावर बसलेला **इंद्र**, नृत्य करणाऱ्या अप्सरा हीं सर्व आकाशांत दिसताहेत पहा!'

**वासवदत्तेला** त्याचा मोठा चमत्कार वाटला. **वसंतक राजाकडे** पाहून हळूच त्या जादुगिराला म्हणाला, 'अरे रांडलेका जादुगिरा! हे देव आणि ह्या अप्सरा दाखवून काय करतोस? आमच्या ह्या **राजश्रीला** खुष करून बक्षीस लाटायाचें असेल तर एकदा त्या **सागरिकेला** दाखीव म्हणजे तुझें काम होईल.'

इकडे हा चमत्कार चालला आहे, इतक्यांत **वसुंधरा** आंत येऊन **राजाला** मुजरा करून म्हणाली, 'प्रधानजी **यौगंधरायण** महाराजांचे चरणापाशीं अशी विनंति करीत आहेत कीं, **विक्रमबाहूनें** आपला मुख्य प्रधान **वसुभूति** इकडे पाठविला आहे, आणि यावेळीं मुहूर्तही चांगला आहे तर **महाराजांनीं** याचवेळीं त्याची भेट घ्यावी हें चांगलें. मीही कांहीं काम शिल्लक राहिलें आहे तेवढें सारून **महाराजांच्या** दर्शनास आलोंच असें सांग.'

**विक्रमबाहु** हा **सिंहलद्वीपचा** राजा असून **वासवदत्तेचा** मावसा होय. **वसुभूति** हा त्याचा मुख्य प्रधान. **वस-**

राजाकरतां **यौगंधरायणानें** **रत्नावली**विषयीं पुनःपुन्हा मागणी केल्यावरून त्याणें ती गोष्ट मान्य केली, आणि मुख्य प्रधान **वसुभूति** याला बरोबर देऊन ती मुलगी **रत्नावली** **वत्सराजा**कडे पाठविली असतां मध्येंच समुद्रांत जहाज फुटलें, यामुळें सर्व वाताहात होऊन चौघें चहूंकडे गेलीं. **वसुभूति** व **बाभ्रव्य** हे गलबताच्या एका फळीला धरून कसे तरी मोठ्या प्रयासानें तडीस लागले आणि तेथून पायवाटेनें भटकत भटकत **कौशांबी**नगरीला येऊन पोहोंचले. **रत्नावली**चा नाश झाला असें समजून **वसुभूति** **वत्सराजा**कडे येण्यास मुळींच तयार नव्हता. तरी तो आला आहे हें वर्तमान समजल्यावरून **वासवदत्ते**ला आपल्या मावशीची कांहीं खबरबात समजेल, असें वाटल्यावरून ती उत्कंठित होऊन **राजा**ला म्हणाली, 'आर्यपुत्र! ह्या जादुगिराचा खेळ आतां पुरे. माझ्या मावशाकडून त्याचा मुख्य प्रधान **वसुभूति** आला आहे, तर तो तिकडचा क्षेमसमाचार काय सांगतो तो आधीं ऐकावा असें मला वाटतें.'

हें ऐकून—तुझी मर्जी असेल तर तसें कां होईना? असें म्हणून **राजानें** त्या जादुगिराला—आतां यावेळीं तूं अंमळ विश्रांति घे, असें सांगितलें. तेव्हां तो आपला कुंचा हातांत घेऊन इकडेतिकडे फिरवून म्हणाला, 'बरें! सरकारची मर्जी. पण आणखी एक खेळ **महाराजांनीं** अवश्य पाहण्याची कृपा करावी, अशी माझी प्रार्थना आहे.'

**राजानें**—कां होईना, आणखी कधीं तरीं पाहूं.—असें सांगून त्याला निरोप दिला. तेव्हां **वासवदत्तेनें** **कांचनमाले**ला त्या जादुगिरास कांहीं तरी बक्षीस देण्यास सांगितलें म्हणून बक्षीस देण्याकरितां ती त्याला बरोबर घेऊन गेली.

इकडे **राजानें** **वसंतका**ला—तूं सामोरा जाऊन **वसुभू**-

तीला सन्मानपूर्वक घेऊन ये, असें सांगितल्यावरून तो सामोरा जाऊन **बाभ्रव्यासह वसुभूतीला** आंत घेऊन आला. **वसुभूतीनें** लक्ष्यपूर्वक चहूंकडे पाहिलें, तेव्हां **वत्सराजा**चें मोठें ऐश्वर्य पाहून त्याचे डोळे दिपून गेल्यासारखे झाले. तो **बाभ्रव्याला** म्हणाला, 'अरे! काय हा **वत्सराजा**चा प्रभाव! ह्या **राजवाड्यांत** काय काय पहावें तरी? हे शृंगारलेले हत्ती पहावें का हे खासा घोडे पहावे; किंवा या संगीताचा मधुरध्वनि ऐकावा? अथवा कामदार लोकांच्या राजकीय गोष्टी ऐकाव्या, कीं करावें तरी काय? जिकडे जिकडे लक्ष्य द्यावें तिकडे तिकडे मन थक्क होऊन जातें. मला आमच्या **महाराजांचें** (**सिंहलद्वीपच्या राजाचें**) ऐश्वर्य फार मोठें वाटत होतें! पण यापुढें त्याचें अगदीं विस्मरण झालें. अद्याप आह्मी बाहेरच्या चौकांतच आहों. एखादा गांवढळ मनुष्य राजवाड्यांत गेला म्हणजे त्याची जशी स्थिति होते तशी फक्त देवडीवरचेंच एवढें ऐश्वर्य पाहून माझी झाली आहे.'

हें ऐकून **बाभ्रव्य** म्हणाला; 'खरेंच **वसुभूते**, माझीही तशीच अवस्था झाली आहे. बहुत दिवसांनीं आज **महाराजांचें** दर्शन होणार ह्मणून खरोखर मला अतिशय आनंद झाल्यामुळें माझी कांहीं चमत्कारिकच अवस्था झाली आहे. एक परी मला कांहींसें भय वाटत असल्यामुळें अंगांत अधिकाधिक कांपें सुटत आहे; आनंदाश्रूंनीं डोळे भरून गेल्यामुळें दृष्टि मंद झाली आहे; प्रेमानें गळा दाटून आल्या कारणानें तोंडावाटे शब्दही बरोबर निघत नाहीं. आज मला झालेला हा संतोष वृद्धपणाची साम्यता करीत आहे.'

याप्रमाणें आपापसांत बोलत ते दोघे येत असतां **सागरिकेनें** दिलेली रत्नमाला **वसंतका**च्या गळ्यांत होती

तेच्या विषयीं संशय आल्यावरून **वसुभूतीनें** लक्ष्यपूर्वक पाहून ती ओळखली, आणि हळूच **बाभ्रव्याला** ह्मणाला, 'अरे, मला तर असें वाटतें कीं, महाराजानें **रत्नावलीला वत्सराजाकडे** पाठविते वेळीं जी रत्नाची माळ दिली होती, तीच ही असावी. बरें तूंही अंमळ लक्ष्यपूर्वक पहा, खरें कीं नाहीं तें.'

हें ऐकून **बाभ्रव्य** नीट पाहून ह्मणाला, 'प्रधानजी! आपण ह्मणतां तें खरेंसें वाटतें. कारण, ही तिच्याच सारखी आहे खरी. बरें, पण ही कोठून आली वगैरे खुलासा **वसंतका**-जवळ काढूं का?'

हें ऐकून **वसुभूति** ह्मणाला, 'नकोरे बाबा, नको! अशा मोठ्या राजांच्या येथें एका सारखे एक दागिने असणें हें कांहीं अशक्य नाहीं. हा ब्राह्मण मोठा चाणाक्ष आहे. तूं सहज विचारलेंस तरी तेव्हांच तो समजेल आणि कदाचित् ही गोष्ट विकोपास जाईल.'

**वसुभूतीनें** नको ह्मणून सांगितल्यावरून **बाभ्रव्य** उगाच राहिला. इतक्यांत ते दोघेही राजाच्या अगदीं जवळ पोहोंचले, तेव्हां **वसुभूति** पुढें होऊन 'महाराजांचा जयजयकार असो!' असें ह्मणाला. तेव्हां तो वयानें वृद्ध व प्रतिष्ठित असल्यामुळें **राजानें** खडी ताजीम देऊन त्याला नमस्कार केला. तेव्हां **वसुभूतीनें** त्याला आशीर्वाद दिला.

नंतर आपल्याजवळ **राजानें** त्याला आसन दिलें. इतक्यांत **बाभ्रव्य** पुढें येऊन **राजाला** आपलें नांव कळवून नमस्कार करून त्याच्या आज्ञेनें **राजाच्या** मागच्या आसनावर बसत असतां, त्याणें राणीलाही नमस्कार केला. **वासवदत्तेनें** आपल्या आसनावरून उठून **वसुभूतीला** नमस्कार केला.

तेव्हां **वत्सराजा**सारखा तुला पुत्र प्राप्त होवो, असा त्यानें आशीर्वाद दिला. याप्रमाणें मान सन्मान वगैरे होऊन सर्वजण आपापल्या जागेवर बसले.

नंतर **राजा** मोठ्या नम्रतेनें **वसुभूती**ला म्हणाला, 'आर्या **वसुभूते** ! आपल्या महाराजांचें कुशल आहेना?'

हें ऐकून **वसुभूति** आकाशाकडे पाहून, सुस्कारा टाकून म्हणाला, '**महाराज** ! मी कपाळफुटक्यानें आतां काय सांगावें तें मला सुचत नाहीं.' असें बोलून त्यानें मान खालीं घातली.

तें पाहून **वासवदत्ते**ला मोठा विषाद वाटला. ती आपल्या मनांत म्हणाली, अरेरे ! आतां हा **वसुभूति** काय सांगणार आहे कोणास ठाऊक ! **राजा** म्हणाला, '**वसुभूते** ! सांग. असें बोलून मला संशयानें व्याकुळ कां करतां.'

हें ऐकून **बाभ्रव्य** हळूच **वसुभूती**ला म्हणाला, 'उगीच वेळ कशाला लावतां ? केव्हां तरी सांगायचेंच. मग सांगायचें तें आतांच कां सांगाना ?'

यावेळीं **वसुभूती**च्या डोळ्यांतून टपटप अश्रु पडूं लागले. दुःखानें त्याचा गळा भरून आला. तो म्हणाला, '**महाराज** ! माझ्यानें हें सांगवत नाहीं; पण तें माझ्या नशीबींच आलें आहे, तेव्हां मन घट्ट करून सांगतों. आमचे **महाराज सिंहलेश्वर** यांची **रत्नावलि** नांवाची कन्या होती हें आपणांस माहितच असेल, जिच्याविषयीं एका मोठ्या सिद्धानें सांगितलें होतें कीं—जो हिचें पाणिग्रहण करील तो सार्वभौमराजा होईल. सिद्धाच्या सांगण्याचा अनुभव पहावा म्हणून **योगंधरायणा**नें महाराजाकरितां पुष्कळ प्रकारें तिच्याविषयीं मागणी केली होती. तथापि **वासवदत्ते**ला ती एक सवत होईल व त्या-

मुळें तिच्या मनाला फार खेद होईल, म्हणून आमच्या महाराजांनीं **योगंधरायणा**ची मागणी मान्य केली नाहीं.'

**वसुभूती**च्या तोंडचे हे शब्द ऐकून राणी **वासवदत्ता** अंमळ खिन्न झाल्यासारखी वाटली, तें पाहून **राजा** तिला हळूच म्हणाला, 'हा तुझ्या मामाचा प्रधान भलतें भलतें काय बोलतो कोणास ठाऊक? **योगंधरायण** तिकडे गेला कधीं? आणि तिची मागणी केली कधीं? सगळेंच खोटें.'

यावर **वासवदत्ता** रागानें म्हणाली, 'आतां येथें खोटें कोण बोलतो हें कांहींच समजत नाहीं.'

**वसंतक वसुभूती**ला म्हणाला, 'बरें, पुढें काय झालें तें सांगा.'

**वसुभूति** म्हणाला, '**लावाणक** नांवाच्या प्रदेशास आग लागून राणी **वासवदत्ता** जळून गेली, अशी बातमी उठवून **महाराजांनीं बाभ्रव्याला** आमच्या **महाराजां**कडे पाठवून पुनः **रत्नावली**बद्दल मागणी केली. तेव्हां आमच्या **महाराजांनीं** असा विचार केला कीं—**वत्सराजा**शीं आपलें नातें असणें अत्यंत अवश्यक आहे, व तें नातें केवळ **वासवदत्ते**च्याच संबंधानें होतें. दुर्दैवानें तिचाही नाश झाला. तेव्हां **वत्सराजा**शीं असलेलें आमचें नातें नाहींसें होऊं नये, म्हणून ती **रत्नावलि** आपल्याला देण्याचा विचार केला, आणि आम्हांस तिच्या बरोबर देऊन आपल्याकडे पाठविण्याकरितां **सिंहलद्वीपाहून** जहाजांत बसवून तेथून आमची रवानगी केली. त्याप्रमाणें बरेच कोस जहाज सुरक्षितपणें चाललें; पण दुर्दैवानें मध्येंच एकाएकीं मोठें तुफान होऊन आमचें गलबत खडकावर आपटून फुटलें. त्या आकांतांत ती **राजकन्या रत्नावलि** व आमच्या बरोबरची इतर मंडळी कोठें गेली, व काय झालें हें समजत

नाहीं.' इतकी हकीकत सांगून **वसुभूति** मान खालीं घालून रडूं लागला.

त्याणें सांगितलेली हकीकत ऐकून आपल्या बहिणीचा कांहीं पत्ता नाहीं म्हणून **वासवदत्ताही** रडूं लागली. 'देवा! देवा! माझा सर्वस्वी घात झाला. मी मोठी दुर्दैवी आहें. अगे माझे प्रिय बहिणी रत्नावलि, तूं यावेळीं कोठें असशील बरें? देवा! आतां माझी बहीण मला दृष्टी पडेल काय?' इत्यादि प्रकारें **वासवदत्ता** विलाप करूं लागली.

तेव्हां तिचें समाधान करीत होत्साता **राजा** म्हणाला, 'प्रिये! मनाचें सांत्वन कर. आतां रडून काय उपयोग आहे? दैवाची गति फार अगम्य आहे. तुझी बहीण तशा रीतीनें नाहींशी झाली, तथापि दैव अनुकूल असेल तर ती पुनः न भेटेल असें नाहीं. याविषयीं दुसरें तिसरें उदाहरण नको. हे **वसुभूति** आणि **बाभ्रव्य** यांचेंच उदाहरण घे म्हणजे झालें. हे देखील त्याच गलबतांत होते, पण सुदैवानें यांचें तुला दर्शन झालेंना? असेंच तिचें देखील कां होणार नाहीं?'

यावर **वासवदत्ता** म्हणाली, 'होय. तसें होण्याचा संभव नाहीं असें नाहीं; पण ह्यांच्या प्रमाणेंच माझ्या बहिणीची देखील मला भेट होईल इतकें चांगलें दैव माझें कोठून असणार?'

हें ऐकून **राजा** हळूच **बाभ्रव्याला** म्हणाला, 'अरे **बाभ्रव्या**! ह्या **वसुभूतीनें** काय सांगितलें तें मला तर मुळींच कळलें नाहीं. यांतली खरी हकीकत तुला कांहीं माहीत आहे काय?'

**बाभ्रव्य** म्हणाला, "होय. **महाराज** ऐकावें तर—**बाभ्रव्य** आतां पुढें हकीकत सांगणार इतक्यांत दुसऱ्या चौकांत एकाएकी मोठा गलबला झाला. जिकडे तिकडे लोक भयभीत

होऊन ओरडूं लागले. कोणी म्हणाले, 'अरे! कोणी धांवा! धांवा! हा पहा जनानखान्यांत अग्नि लागला आहे. हा आपल्या ज्वालांनीं सुवर्णमय उंच उंच बंगल्यांची शोभा हरण करतो कीं काय? यानें आपल्या प्रखर तेजानें बागेंतलीं झाडें तर शुष्क करून टाकलींच. धुराच्या लोटांनीं जनानखान्यांतला क्रीडा-पर्वत पर्जन्यकाळच्या सजल मेघांनीं युक्त असल्यासारखा दिसतो. ही पहा बायकांची कोण धांदल उडाली आहे ती. त्या जिकडे तिकडे सैरा वैरा धांवत आहेत. पूर्वी **लावाण-कांत** असतांना **राणी**साहेब जळून गेल्या अशी जी खोटी अफवा उठली होती ती खरी करण्याकरतांच कीं काय हा अग्नि जनानखान्यांत पेटला आहे असें वाटतें.'

याप्रमाणें घाबरलेले लोक जिकडे तिकडे गडबडूं लागले. ती गडबड पाहून **राजा** एकाएकीं आसनावरून उठला आणि 'काय? राणी **वासवदत्ता** जळाली! आणि ती कशी? हा अंतःपुरांत अग्नि कोठून आला?'

हें ऐकून **वासवदत्ता** घाबरून 'मला वांचवा! मला वांचवा!' अशी ओरडली.

तेव्हां **राजा** ह्मणाला, 'अरे! काय हा वेडेपणा? ही **राणी** माझ्याजवळ असून माझ्या लक्ष्यांत नाहीं हें काय?' असें बोलून **वासवदत्तेचे** हात धरून घाबऱ्या घाबऱ्या तिला आलिंगन देऊन **राजानें** तिचें समाधान केलें.

**वासवदत्ता** अंमळ शांत होऊन **राजाला** ह्मणाली, 'आर्यपुत्रा! मी स्वतःकरितां घाबरलें नाहीं. एक गरीब प्राणी केवळ माझ्या अन्यायानें या आगींत जळून मरणार आहे, ह्मणून मी घाबरलें. रागाच्या आवेशांत मी त्या **सागरिकेला** निर्दयपणानें जनानखान्यांत अंधार कोठडींत कैद करून ठे-

विलें आहे, ती विनाकारण यांत जळेल; तर या वेळीं मजवर अनुग्रह करा, आणि कसेंही करून **सागरिके**ला वांचवा.'

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'असें काय? **सागरिके**ला तूं उज्जयिनीस पाठविलेंस असें मी ऐकलें होतें. ती एथेंच आहे काय? कांहीं चिंता नाहीं. तूं काळजी करूं नकोस. मी आतां तिला घेऊन येतों.' असें ह्मणून **राजा** आगींत शिरूं लागला.

तें पाहून धावऱ्या धावऱ्या **वसुभूति** ह्मणाला, 'महाराज! विनाकारण पतंगासारखा आपला घात करून घेण्याला प्रवृत्त व्हावें हें योग्य नाहीं.'

**बाभ्रव्या**नेंही **वसुभूती**च्या बोलण्यास अनुमोदन दिलें. पण **राजा** कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां त्याच्या आंगावरचा शेला धरून **वसंतका**नें त्याला उभा केलें, आणि असें साहस न करण्याविषयीं आग्रह केला; तरी शेला हिसकून घेऊन **राजा** म्हणाला, 'अरे मूर्खा! तुला धिःकार असो! ती अनाथ **सागरिका** मरत आहे, असें असून अद्यापि प्राणाकडेच पहायाचें काय?'

असें बोलून **राजा** आगींत शिरून अग्नीची प्रार्थना करून म्हणाला, 'हे अग्ने! तूं साक्षात् ईश्वर आहेस, आतां अंमळ शांत हो. हा इतका धूर आणि ज्वाला उगीच कशाला सोडतोस.. त्या प्रिय **सागरिके**च्या विरहाग्नीनें देखील मी जळालों नाहीं, तर अशा माझ्या कठोर शरीराला प्रलयकालचें तेज प्रगट केलेंस तरी तुझ्यानें काय व्हावयाचें आहे?' असें बोलत बोलत **राजा** आगींत शिरला.

तें पाहून **वासवदत्ता** दुःखित होऊन 'अरे, कसली मी चांडाळीण! माझ्या सांगण्यावरून आर्यपुत्रानें अशा भयंकर अग्नींत प्रवेश केला. तर आतां मला तरी राहून काय

करावयाचें आहे ? मीही त्यांच्या मागून जातें'– असें बोलून ती राजाच्या पाठोपाठ जाण्यास निघाली.

तेव्हां–' मला तरी येथें राहून काय करावयाचें आहे ? मी रस्ता दाखविणारा होतों'– असें बोलून **वसंतक वासवदत्ते**-च्या पुढें झाला.

तें पाहून **वसुभूति**–' हाय ! हाय ! **वत्सराजानें** अग्नींत प्रवेश केलाच तर मला तरी जिवंत राहून काय करावयाचें आहे ? त्या राजकन्येची ( रत्नावलीची ) तशी विपत्ति, पाहून वांचण्यापेक्षां ह्याच अग्नींत आपल्या शरीराची आहुति करून घ्यावी हें चांगलें'– असें म्हणून तोही आगींत शिरला.

हें पाहून रडत रडत **बाभ्रव्य**–' हे महाराजा ! विनाकारण ह्या **भारत**-कुलाला संशयांत कां पाडलेंस ? काय हें साहस ! असो, उगीच विलाप करून तरी काय उपयोग ? आपणही स्वामीभक्तीला अनुसरून 'अग्नींत प्रवेश करावा हेंच योग्य–' असें म्हणून तोही आग्नींत शिरला.

**राजा** आगींत शिरला तों त्या भागांत आग विशेष पेटली नव्हती, यामुळें त्याला कांहीं इजा झाली नाहीं. तो **सागरिका** कोणत्या ठिकाणीं आहे याचा शोध करीत आहे, इतक्यांत त्याचा उजवा डोळा जोरानें लवूं लागला. हें शुभसूचक निमित्त पाहून तो आपल्याशींच म्हणाला, ' ह्या अशा कठिण प्रसंगांत असतां प्रिय **सागरिके**च्या प्राप्तीचा सूचक हा शकुन कां होत आहे ? या वेळीं याचें फळ प्राप्त होण्याचा काय संभव ? '

असें बोलत बोलत तो अंमळ पुढें जातो, तों पायांत बेडी घातलेली **सागरिका** त्याच्या दृष्टीस पडली. ती ज्या ठिकाणीं होती, त्याच्या जवळ अग्नि पोंहोचला होता; पण तिच्या

शरीराला अद्याप स्पर्श झाला नव्हता. तिला पाहून राजाला फार आनंद झाला. तो तिला बाहेर काढण्याचा विचार करीत आहे, इतक्यांत चोहोंकडे अग्नि भडकला आहे असें पाहून दुःखानें उदास व कृश झालेली सागरिका म्हणाली, 'वाह-वा ! दैवानें मजवर मोटा अनुग्रह केला आहे. हा अग्नि आ-यताच चहूंकडे पेटला आहे. आतां लवकरच हें, माझें दुर्दैवी शरीर जाळून हा माझ्या दुःखाचा शेवट करील.'

'चहूंकडे अग्नि पेटला आहे, व लवकरच तो आतां आ-पल्यापर्यंत येणार असें पहात असूनही सागरिकेला त्याचें कांहींच भय वाटलें नाहीं. उलट आपल्या दुःखाचा शेवट होईल असें समजून ती एक प्रकारें आनंदित झाली. वर सां-गितलेले तिचे उद्गार ऐकून राजा धावत्या धावत्या तिच्या जवळ जाऊन म्हणाला, ' अग वेडे ! अद्यापि तूं अगदीं स्वस्थ कशी आहेस ? '

राजाला पाहून सागरिकेला फार आनंद झाला. ज्याची प्राप्ति होत नाहीं, म्हणून ती आपल्या प्राणावर देखील उदार झाली होती, तो तिचा हृदयवल्लभ कांहीं ध्यानीं मनीं नसतां एकाएकीं अशा संकटांत दृष्टीस पडल्यावरून तिला किती आ-नंद झाला असेल, याचें वर्णन मुळींच करतां येत नाहीं. असो, राजाला पाहून ती आपल्या मनांत म्हणाली,' अशा संकट समयीं हा आर्यपुत्र कसा दृष्टीस पडला बरें ? मला हे माझे दुर्दैवी प्राण ह्यावेळपर्यंत नकोसे होते, पण ह्याला पाहून पुनः मला ते अ-सावे अशी आशा उत्पन्न झाली.'

असें बोलून उघडपणें राजाला म्हणाली, ' महाराज ! मला वांचवा ! मला वांचवा.'

राजा म्हणाला,' अग भित्रे ! भिऊं नकोस. एक घटका-

भर हा धुराचा लोट सहन कर. तो असें म्हणत आहे इतक्यांत पाहतो तों तिच्या आंगावरचा पदर पेटला असें त्याला दिसलें. तिचा हात धरून राजा तिला बाहेर घेऊन जाऊं लागला, पण पायांत बेडी असल्यामुळें ती अडखळूं लागली, तेव्हां लक्ष्य-पूर्वक पाहतां तिच्या पायांत बेडी आहे असें पाहून—मी तुला येथून घेऊन जातों. प्रिये, तूं आतां मला मिठी मार.' असें बोलून राजानें तिच्या गळ्याला मिठी मारली, आणि तिच्या अंगाच्या स्पर्शापासून आपणाला मोठें सुख झालें असें मानून तो म्हणाला, 'अरे ! हें काय आश्चर्य ? एका क्षणांत माझा सगळा संताप गेला. प्रिये ! तूं आतां समाधान मान व स्वस्थ रहा. ह्या अग्नीचें कांहीं भय मानूं नको; कारण तो तुझ्या अंगाला लागला तरी त्या-पासून तुला कांहीं इजा होणार नाहीं. कारण केवळ तुझा स्पर्शच असा आहे कीं तो कसलाही संताप असला तरी दूर करतो.'

राजानें या वेळीं प्रियेच्या समागमापासून झालेल्या आनं-दाच्या बहरांत डोळे झांकले होते. बराच वेळ त्या सुखाचा अ-नुभव घेऊन डोळे उघडून पाहतो तों अग्नि वगैरे कांहीं नाहीं असें त्याच्या दृष्टीस पडलें. हें मोठें आश्चर्य पाहून म्हणाला,' अ-रे ! तो अग्नि ह्या अंतःपुराला जाळीत होता तो इतक्यांत कोठें नाहींसा झाला ?'

तो असें बोलत आहे इतक्यांत **वासवदत्ता, वसंतक, वसुभूति** आणि **बाभ्रव्य** हींही तेथें येऊन पोहोंचलीं. **वास-वदत्तेला** पाहून राजाला अंमळ लाज वाटली. तिनें जवळ येऊन राजाच्या अंगावर आपला हात फिरवून त्याला अग्नीचा कोठें कांहींच स्पर्श झाला नाहीं याबद्दल देवाचे मोठे उपकार मानले. इतक्यांत **बाभ्रव्य** पुढें येऊन म्हणाला, 'महाराजांचा जयजयकार असो ! सुदैवानें आपल्या शरीराला कांहीं धक्का

लागला नाहीं व यामुळें आमचे प्राण गेलेले परत आल्यासारखे झाले.'

इतक्यांत **वसुभूति** व **वसंतक** यांणींही राजा अग्नीपासून मुक्त झाला याबद्दल आनंद प्रदर्शित केला.

याप्रमाणें **वासवदत्ता** इत्यादि मंडळी तेथें आली, व सर्वही संतोष प्रदर्शित करूं लागले; तरी राजाचें मन अद्याप ठिकाणावर आलें नव्हतें. हा जो अग्नीचा चमत्कार झाला हें का स्वप्न आहे किंवा इंद्रजाल आहे याविषयीं त्याच्या मनाची खात्री झाली नव्हती. हें पाहून **वसंतक** म्हणाला, मित्रा ! याविषयीं कांहीं संदेह नाही. हें सर्व इन्द्रजालच आहे. ज्यां तो जादुगीर आला होता त्या वटकीच्यानें सांगितलेंच होतें कीं-महाराजांनीं अणखी एक चमत्कारिक खेळ अवश्यक पहावा; तर तो हाच असावा असें वाटतें.'

**वसंतकाचें** हें भाषण ऐकून **राजाला** त्या शंबरसिद्धीनें सांगितलें होतें त्याची आठवण होऊन त्याचा संशय निवृत्त झाला. अर्थात् पूर्वस्थितीवर आल्यामुळें **सागरिकेच्या** गळ्याला आपण मिठी मारली अशा स्थितींत **वासवदत्तेनें** आपणास पाहिलें, याची त्याला मोठी लाज वाटली, आणि आपल्यावरचा दोष घालविण्याकरतां **वासवदत्तेला** म्हणाला, 'देवी, रागावूं नकोस. तूं सांगितलेंस म्हणून आम्हीं या **सागरिकेला** येथें आणलें, व तिला बाहेर नेण्याकरितां उचलून घ्यावें लागलें.'

हें त्याचें भाषण ऐकून **वासवदत्तेला** हसूं आलें. वस्तुतः अशी गोष्ट एरवीं तिच्या नजरेंत आली असती तर तिला राग आल्यावांचून राहिलाच नसता; पण ह्या आगीच्या गडबडींत ती गोष्ट झाल्यामुळें तिला राग तर आला नाहींच

पण आपला अपराध छपविण्याकरितां राजानें प्रयत्न केला याबद्दल हंसू आलें. ती म्हणाली, 'बरं! आर्यपुत्रा! तुमचें काय कौटिल्य आहे तें सारें मीं समजलें.'

याप्रमाणें राजा आणि राणी या उभयतांचा संवाद चालला आहे, तों वसुभूतीनें सागरिकेला ओळखलें. आणि तो हळूच बाभ्रव्याला म्हणाला, 'अरे, ही मुलगी त्या आपल्या रत्नावलीसारखी दिसते नाहीं का?'

बाभ्रव्य म्हणाला, 'प्रधानजी! माझ्याही मनांत हेंच आलें आहे.'

याप्रमाणें दोघांचा एकच विचार झाल्यामुळें वसुभूतीनें राजाला-ही मुलगी कोठून प्राप्त झाली-म्हणून विचारलें.

राजा म्हणाला, 'तें मला कांहीं माहीत नाहीं. राणीला ठाऊक आहे.'

हें ऐकून वसुभूतीनें राणीला तोच प्रश्न केला. तेव्हां वासवदत्ता म्हणाली, 'ही समुद्रांत मिळाली असें सांगून आमचे प्रधान यौगंधरायण यांनीं हिला माझ्या हातीं दिलें, व तिला मी ठेवून घेतलें. समुद्रांत मिळाली म्हणून हिला आम्ही सागरिका या नांवानें हाक मारतों.'

सागरिकेचें हें वर्तमान राजाला देखील ह्या वेळपर्यंत माहीत नव्हतें. वासवदत्तेनें सांगितलेलें वर्तमान ऐकून तो आपल्या मनांत म्हणाला, 'काय! हिला यौगंधरायणानें हिच्याजवळ आणून ठेविलें? पण मला कळविल्यावांचून तो अशी गोष्ट कशी करील?'

वासवदत्तेनें सांगितलेली हकीकत ऐकून वसुभूतीच्या अनुमानाला विशेष बळकटी आली. तो हळूच बाभ्रव्याला म्हणाला, 'अरे! हें बरेंच आपल्या तर्काशीं जुळत आहे असें

वाटतें.' कारण **वसंतका**च्या गळ्यांत माळ पाहिली, ती **रत्ना-वळी**च्या गळ्यांतल्या माळेसारखी दिसते. आणि ही मुलगीही समुद्रांत मिळाली असें म्हणतात, तेव्हां खरोखर ही आमच्या **महाराजां**ची कन्या **रत्नावळी**च आहे यांत संशय नाहीं.'

**बाभ्रव्या**च्याही मनाची खात्री झाली. तेव्हां **वसुभूति** एकदम **सागरिके**जवळ जाऊन तिला म्हणाला, 'आयुष्मति **रत्नावलि**! तुला अशी अवस्था कशी प्राप्त झाली ?'

**सागरिकेनें वसुभूती**ला तेव्हांच ओळखलें. तिच्या डोळ्यांत अश्रु आले. स्वजनाला पाहिलें म्हणजे दुःखाच्या झोंपेचें दार उघडल्यासारखें होतें, हें अगदीं उघडच आहे. आपल्या बापाचा प्रधान हा **वसुभूति**च आहे असें ओळखून **सागरिके**चे डोळ्यांवाटे निघणारे अश्रु पुसून त्याच्याकडे तिनें दीन मुद्रेनें पाहिलें, आणि- अमात्य **वसुभूति** एथें कसे आले? असें म्हणाली. हांवेळपर्यंत **वसुभूति** अंमळ संशयांत होता. पण **सागरिके**नें त्याचें नांव घेऊन हांक मारल्या वरून त्याची पुरती खात्री झाली, आणि आपल्या यजमानाच्या कन्येला अशा प्रकारची वाईट स्थिति प्राप्त झाली याबद्दल त्याला जें दुःख झालें त्या सरसा, कपाळफुटका मी मेलों असतों तर बरें ! असें म्हणत म्हणत तो धाडकन् जमिनीवर पडला.

इकडे **सागरिका** ही आपल्या आईला व बापाला हांका मारून, दुर्दैवी मी अद्याप कशाला वांचलें ? असें बोलून खालीं पडली. इकडे **वासवदत्ता** कंचुकीला म्हणाली, 'अरे, माझी मावस बहीण **रत्नावलि** ती हीच काय ?' त्याणें होय म्हणून सांगतांच, **सागरिके**ला मिठी मारून तिचें समाधान करून **राणी वासवदत्तेनें** तिला आपल्या मांडीवर घेतलें.

राजाला हें नातें समजल्यावरून फार आनंद झाला व मोठें आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, 'ही सिंहलेश्वर राजा **विक्रमबाहु** याच्या सारख्या मोठ्या कुळांतली असून हिची अशी दशा कां झाली? हें कांहीं समजत नाहीं.'

**वसंतक** जवळच होता. तो हावेळपर्यंत चमत्कार पहात तटस्थ बसला होता. तो आपल्याशींच म्हणाला, ह्या **रत्नावली**ला ज्या दिवशीं मी प्रथम पाहिलें तेव्हां पासूनच—ही कोणीतरी सामान्य मनुष्याच्या कुळांतली नसावी, असें मला वाटत होतें. आणि अखेरीस तेंच खरें झालें.

इतक्यांत **वसुभूति** सावध होऊन **रत्नावली**ला म्हणाला, 'छोट्या बाईसाहेब! दुःख करूं नका. ह्या पहा तुमच्या वडील बहीण बाई तुमच्या करतां दुःखित झाल्या आहेत; तर आतां यांना प्रेमानें भेटा.'

हें ऐकून **रत्नावली** शांत होऊन राजाकडे वांकड्या दृष्टीनें पाहून मनांत म्हणाली, मी अपराधी आहें. बाईसाहेबांला माझ्या निमित्तानें फार त्रास झाला. आतां मी त्यांना तोंड कसें दाखवूं? माझ्यानें त्यांच्याकडे पाहवत देखील नाहीं, असें म्हणून ती मान खालीं घालून बसली.

तें पाहून **वासवदत्ता** डोळ्यांत आसवें आणून तिला मिठी मारण्याकरितां बाहु पसरून म्हणाली, 'ये, फार निष्ठुर मनाचे प्रियभगिनी, आतां इकडे ये, आणि बहिणीचा स्नेह दाखीव.' असें बोलून तिनें तिला आपल्या गळ्याशीं घट्ट धरिलें.

**रत्नावली** पुढें येऊं लागली, तेव्हां पायांत बेडी असल्यामुळें ती अडखळली, हें पाहून **वासवदत्ता** हळूच **राजाला** म्हणाली, 'आर्यपुत्रा, ही हिच्या पायांतली बेडी पाहून मला आ-

पल्या क्रूरपणाची लाज वाटते; तर हळूच हिच्या पायांतलें हें बंधन एकदाचें काढून टाका कसें.'

राणीची ही प्रार्थना **राजाला** फारच आवडली. कारण **सागरिके**वर त्याचें किती प्रेम होतें तें उघडच आहे. तिच्या पायांत बेडी आहे हें त्याच्यानें मुळींच पाहवत नव्हतें; पण राणीपुढें त्याचा कांहीं इलाज चालत नव्हता. आतां प्रत्यक्ष तिनेंच सांगितल्यावरून **राजानें** मोठ्या संतोषानें हळूच **सागरिके**च्या पायांतली बेडी काढली. नंतर तिला हातांत धरून **वासवदत्ता राजाला** म्हणाली, 'आर्यपुत्रा! इतके दिवसपर्यंत माझ्या हातून ज्या ज्या वाईट गोष्टी झाल्या, त्या सर्वांला आमचे प्रधान **योगंधरायण** हेच मुख्य कारण झाले. त्यांनीं मला हावेळपर्यंत अगदीं दुर्जन बनविलें. कारण, या माझ्या बहिणीचें सर्व वर्तमान त्यांला माहीत असूनही त्याचा मला अगदीं मागमूस देखील लागूं दिला नाहीं!'

हावेळपर्यंत राजवाड्यांत काय काय गोष्टी झाल्या, त्याची **योगंधरायणाला** अगदीं त्रित्तीम बातमी होती; पण वेळ आल्याशिवाय आपण तिकडे जाऊं नये, म्हणून तो वाट पहात बसला होता. 'हा प्रसंग चांगला आहे,' असें समजून, आतां तो राजवाड्यांत आला आणि **राजा**, राणी, **बाभ्रव्य**, इत्यादिकांला दुरून पाहून आपल्याशींच म्हणाला, काय सांगावें! माझ्या सांगण्यावरून राणी **वासवदत्तेनें राजाचा** वियोग पतकरला, इतकेंच नाहीं; तर **प्रद्योत** राजाच्या घरीं अज्ञातवासांतही राहिली. बरें एवढ्यानें तरी आटपलें काय? नाहीं. तिच्या उरावर **प्रद्योता**ची मुलगी **पद्मावती** ही एक मी सवत आणून उभी केली. याप्रमाणें माझ्या कृतीनें राणीला फार फार दुःख भोगावें लागलें; पण आतां या **रत्नावली**च्या संबंधानें

तसें होणार नाहीं. कारण, हिचें पाणिग्रहण केल्यानें राजाला जगाचें स्वामित्व मिळणार आहे, व त्यामुळें राणीला फार आनंद होईल यांत संशय नाहीं. तसी मला राणीला तोंड दाखविण्यास फार लाज वाटते. पण काय करावें ? स्वामीभक्तीचें व्रत–अत्यंत फार मान्य व पूज्य असलेल्यांच्या ठिकाणीं देखील, केव्हां केव्हां अगदीं निर्दयपणानें वागल्या शिवाय साधत नाहीं. कारण, यजमानाचें हित करावयाचें तर त्याबद्दल बरें अथवा वाईट पाहिजे तें केलें पाहिजे. तें असो; हे **महाराज,** बसलें आहेत, तर आतां त्यांला भेटावें म्हणजे झालें. असा विचार करून तो **राजा**च्या जवळ गेला, आणि त्याचे पाय धरून म्हणाला, '**महाराज!** आपल्याला न कळवितां मी ही गोष्ट केली, ह्याची क्षमा असावी.'

**योगंधरायणा**नें जें केलें तें **राजा**ला मान्यच होतें. कारण, त्यापासून **सागरिके**ची प्राप्ति होणार हा एक मोठा लाभ त्याला घडणार होता. तथापि तो नकळल्यावर घालून **योगंधरायणा**ला म्हणाला, 'काय म्हणतां ? मला न कळवितां आपण अशी कोणती गोष्ट केली कीं–जिच्याबद्दल मी क्षमा केली पाहिजे?'

हें ऐकून **योगंधरायण** म्हणाला, '**महाराज !** आपण आसनावर बसावें. नंतर काय केलें तें मी सांगतों.'

सर्व मंडळी आपआपल्या आसनावर बसली. नंतर **योगंधरायण** पुढें होऊन म्हणाला, '**महाराज !** ऐकावें आतां. मीं काय केलें तें सांगतों. ही **सिंहलद्वीप**च्या **राजा**ची मुलगी **रत्नावली** हिच्या संबंधानें. एका मोठ्या सिद्धपुरुषानें असें सांगितलें कीं,–जो कोणी हिचें पाणिग्रहण करील, तो सार्वभौम राजा होईल. हें वर्तमान हेराकडून माझ्या कानांवर

आलें. तेव्हां यद्यपि आपण सार्वभौम पदवीचे मुळचेच अधिकारी आहां, तरी सिद्धाच्या वचनाचा अनुभव पाहण्याकरितां आम्हीं हिचा बाप राजा **विक्रमबाहु** याच्याकडे आपल्याकरितां तिच्याबद्दल मागणी घातली. तथापि राणी **वासवदत्ते**ला वाईट वाटेल म्हणून त्यानें ती मान्य केली नाहीं. तेव्हां--

इतकें बोलून **यौगंधरायण** उगीच राहिला. तेव्हां राजा म्हणाला, 'तेव्हा तें काय तें सांगा तर पाहूं.'

**यौगंधरायणा**ला पुढचे शब्द तोंडावाटे काढण्याला फार लाज वाटली. तो मान खालीं घालून तोंडाला पदर लावून हळूच म्हणाला, 'तेव्हां **लावाणक** प्रदेशांत लागलेल्या आगीनें राणी दग्ध झाली, असें वर्त्तमान उठविलें होतें; आणि त्या निमित्तानें धाकट्या राणीसाहेब **पद्मावतीबाई** यांचें आपण पाणिग्रहण केलें. त्याच संधीस **बाभ्रव्या**ला पाठवून **सिंहलेश्वरा**ला हें वर्तमान कळविलें, आणि पुनः **रत्नावली**ची मागणी केली.'

यापुढें काय झालें तें सर्व आपण ऐकलें आहे, असें **राजा**नें सांगितल्यावरून **यौगंधरायणा**नें पुढें सांगितलें नाहीं. **राजा** म्हणाला, 'हें सारें समजलें; पण तूं तिला **राणी**च्या हातीं आणून दिलेंस, यांत तुझा काय हेतु होता तें सांग.'

**राजा**च्या ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास **यौगंधरायणा**ला फार संकोच वाटूं लागला. तेव्हां त्याचा अभिप्राय जाणून **वसंतक** म्हणाला, 'अहो, यांनीं मला कांहीं सांगितलें नाहीं, तरी त्यांचा हेतु काय असावा, हें माझ्या लक्ष्यांत आलें. यांनी असा विचार केला असेल कीं, हिला अंतःपुरांत ठेविलें, तर ही सहज तुमच्या दृष्टीस पडेल; म्हणून प्रधानजीनीं तसें केलें असावें.'

यावर राजा यौगंधरायणाकडे पाहून म्हणाला, काय! वसंतकानें सांगितलें असाच का तुझा अभिप्राय होता?' होय महाराज,' असें यौगंधरायण म्हणाला.

तेव्हां राजा म्हणाला, 'त्या गारुड्यानें जो चमत्कार केला, तोही तुझाच प्रयोग असावा असें वाटतें.'

यौगंधरायण म्हणाला, 'हिला ( रत्नावलीला ) राणीसाहेबांनीं अंतःपुरांत प्रतिबंधांत ठेविलें, तेव्हां ती आपल्या दृष्टीस कशी पडणार? व हा वसुभूति तरी हिला ओळखणार कसा?' इतकें बोलून अंमळ हंसून म्हणाला 'असो; जें झालें तें ठीकच झालें. रत्नावली ही आपली वहीण आहे, असें राणीसाहेबांला आतां समजलें.' पुढें काय करावयाचें तें त्यांना माहीत असेलच.'

यौगंधरायणाचें हें भाषण ऐकून वासवदत्ता गालांतल्यागालांत हंसून म्हणाली, 'प्रधानजी, उघडच कां बोलाना कीं ही रत्नावली आर्यपुत्राला द्यावी म्हणून.?'

हें ऐकून वसंतक म्हणाला,' बाईसाहेब, आपण बराबर समजलां. प्रधानजीचा हेतु असाच असावा.'

यावर वासवदत्ता रत्नावलीला म्हणाली, 'रत्नावलि, इकडे ये. बहिणीच्याप्रेमाला अनुरूप असें माझ्या हातून तुझें कांहीं तरी होऊंदे. असें बोलून रत्नावलीचा उजवा हात राजाच्या उजव्या हातांत देऊन म्हणाली, 'महाराज, ह्या रत्नावलीचा आपण स्वीकार करावा.'

'देवीच्या प्रसादाला कोण बहुमान देणार नाहीं?' असें म्हणून राजानें तिचा स्वीकार केला.

तेव्हां वासवदत्ता म्हणाली, 'आर्यपुत्रा! माझ्यानें तसें बोलवत नाहीं; पण यावेळीं येथें हिचे आप्तजन कोणी जवळ

नाहीं' म्हणून मला सांगितलें पाहिजे. तर आपण हिचें असें रक्षण करावें, कीं जेणेंकरून हिला आपल्या आप्तांचें स्मरण होणार नाहीं.'

यावर **राजानें**— तुझ्या हुकुमाप्रमाणें वागेन, असें सांगितलें.

हें ऐकून **वसंतक** आनंदानें नाचत नाचत म्हणाला, 'आज मोठी आनंदाची गोष्ट झाली. **महाराज**, आपला जयजयकार असो! आतां सर्व पृथ्वी आपल्या हातांत आली असें समजा.'

नंतर **वसुभूतीनें वासवदत्तेला** नमस्कार करावयास सांगितलें, व त्याप्रमाणें तिनें मोठ्या नम्रपणानें राणीला नमस्कार केला. राणी **वासवदत्तेनें** स्वतः आपल्या हातांनीं आपल्याला सवत करून घेतली, हा प्रकार पाहून सर्वांला मोठें आश्चर्य वाटलें.

**बाभ्रव्य** सद्गदीत होऊन **वासवदत्तेला** म्हणाला, 'बाई-साहेब, आपल्याला देवी म्हणतात, हें अगदीं योग्य आहे. ज्यांच्या अन्तःकरणांत एवढें मोठें औदार्य व पतीविषयीं प्रेम वसतें, त्यांलाच ही पदवी प्राप्त होण्याला योग्य आहे.'

यावर **वासवदत्ता** म्हणाली, 'मला एकटीलाच हा एवढा मान कशाला हवा? ही माझी लाडकी बहीण (**रत्नावली**) देखील त्या मानाला योग्य आहे.'

**बाभ्रव्य** म्हणाला, 'असो; मी इतके दिवस जे श्रम केले त्याचें आज सार्थक झालें. आज माझा जीव बिनघोर झाला.'

याप्रमाणें जिकडे तिकडे सर्वांला आनंद झाला असें पाहून **यौगंधरायण राजाला** म्हणाला, '**महाराज**! आपलें आणखी काय प्रिय करावें तें सांगा.'

**राजा** म्हणाला, 'यापरतें आणखी प्रिय तें काय करा-वयाचें आहे? राजा **विक्रमबाहु**—जो आमच्याशीं विशेष

स्नेह ठेवतो, त्याला आपल्या बरोबरीचा केला. सर्व भूमंडळावर उत्तम रूपवती अशी ही **सागरिका**—जिच्या प्राप्तीनें समुद्रवलयांकित पृथ्वी मिळणार, तीही प्राप्त झाली. देवी **वासवदत्ता** हिला आपल्या बहिणीची भेट झाल्यामुळें फार आनंद झाला. **कोसल**देश जिंकून आपल्या अधीन केला. सकल प्रधानांमध्यें परम श्रेष्ठ असा तूं माझा प्रधान असतां—ज्याची मी उणखीं इच्छा करावी अशी कोणती वस्तु मला प्राप्त झाली नाहीं? तथापि कांहीं मागावें अशी तुझी मर्जी आहे तेव्हां हें असो. इंद्र यथा कालीं वृष्टि करून पृथ्वीवर धान्याची समृद्धि करो! विद्वान् ब्राह्मण यज्ञयागादि कर्में करून देवांला संतुष्ट करोत! नेहमीं सुखाची वृद्धि करणारा सज्जनांचा समागम आकल्पपर्यंत मला घडो! आणि वज्रलेपा सारखीं दुर्जय अशीं दुष्टांचीं भाषणें शांत होवोत!

# पोतदारांचीं

## अतिस्वस्त शालोपयोगी व इतर पुस्तकें

### ह्यांविषयीं महत्वाची सूचना.

पोतदारांचीं सर्व प्रकारचीं शालोपयोगी व इतर पुस्तकें विक्रीस तयार आहेत. **टपालखर्चसुद्धां रोख पैसा** पाठविला असतां पुस्तकें तात्काळच रवाना करूं किंवा 'व्हॅल्युपेएबल पार्सल' नें मागविलीं असतां तशीं पाठवूं. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' नें मागविलीं असतां वंगीवर जो किमतीचा आंकडा लिहिला असेल तो पाहून तितके पैसे टपालांत भरले म्हणजे झालें. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' बद्दल मनी आर्डरचा जो खर्च, तोच सरकार घेतें. वाटेल त्या रीतीनें पुस्तकें मागवावीं. पुस्तकें उधार पाठविलीं जाणार नाहींत. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' मागविलें असतां तें परत घेतलें जाणार नाहीं. अगोदरच विचार करून 'व्हॅल्युपेएबल पार्सल' मागवावें. तें परत आलें असतां त्याचा कायदेशीर रीतीनें बंदोबस्त करतां येतो. याकरितां अगोदरच खबरदारी घेतली तर बरें. 'बुक पोस्टा'नें वंगी **पाठविली** असतां ती रजिस्टर करीत जाऊं. रजिस्टर करण्याबद्दल **दोन आणे चार्ज जास्त** पडेल. रजिस्टर न करितां तशीच पाठवा असें लिहून आल्यास ती गहाळ झाली असतां त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

**विशेषसूचना**-- पोतदारांचीं शालोपयोगी पुस्तकें फारच स्वस्त, सुबक, लहान मुलांस फारच उपयुक्त, लोकप्रिय, व सुलभ अशीं असल्याबद्दल सर्वत्र प्रसिद्धि आहे. पुस्तकांचा कागद, व छापणी हीं विशेष मोहरेदार असतात. सारांश, जेणेंकरून विषयाची दुर्बोधता घालवून सुबोधता आणवेल व पुस्तकें शाळांतील मुलांस अत्युपयोगी होतील अशी तजवीज केली आहे. पुस्तकांच्या किमतीच्या स्वल्पतेनें तर सर्व पुस्तकांस हटविलें आहे. एकदम पुष्कळ पुस्तकें घेणाऱ्या व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन मिळेल. कमिशनचे दर व पुस्तकांच्या वगैरे माहितीकरितां अर्धा आण्याचें तिकिट पाठविलें असतां आमचा छापील क्याटलॉग--रवाना करूं.

# पोतदारांची शालोपयोगी पुस्तकमाला.

| पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|
| १ अंकगणित (पोतदारांचें, आवृत्ति चौदावी) टेपांवरील. | ६ | ० |
| २ मोडीवाचनसार भाग पहिला (दुसऱ्या इयत्तेकरितां) | ३ | ० |
| ३ मोडीवाचनसार भाग दुसरा (तिसऱ्या इयत्ते करितां) | ३ | ० |
| ४ मोडीवाचनसार भाग तिसरा (चौथ्या " " ) | ५ | ० |
| ५ मोडीवाचनसार भाग चौथा (पांचव्या व सहाव्या.) | ७ | ० |
| ६ मुंबई इलाख्याचें संक्षिप्त वर्णन ... | ० | ९ |
| ७ हिंदुस्थानाचें संक्षिप्त वर्णन | १ | ० |
| ८ एशिया व युरोप खंडाचें संक्षिप्त वर्णन. | १ | ० |
| ९ आफ्रिका व अमेरिका खंडाचें संक्षिप्त वर्णन. | १ | ६ |
| १० महाराष्ट्रदेशाच्या इतिहासाचें संक्षिप्त वर्णन .. | १ | ६ |
| ११ हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास ( इतिहाससार ) | २ | ६ |
| १२ चित्रबोध भाग पहिला पृष्ठें ५२ चित्रें १८६ | १ | ० |
| १३ चित्रबोध भाग दुसरा पहिल्या इयत्तेकरितां ... | १ | ० |
| १४ बालज्ञानमुद्रा ( नवीन मुळाक्षर. ) | १ | ६ |
| १५ गद्यपद्यार्थबोध भाग १ ला व २ रा ( एकत्र. ) अथवा मराठी पहिल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण. ... | [illegible] | [illegible] |
| १६ गद्यपद्यार्थ बोध भाग ३ रा अथवा मराठी ३ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण. .. | ३ | ० |
| १७ गद्यपद्यार्थबोध भाग ४ था अथवा मराठी ४ थ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण. .. | ४ | ० |
| १८ गद्यपद्यार्थबोध भाग ५ वा अथवा मराठी ५ व्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण. | ८ | ० |
| १९ हॉ० इं० पहिल्या पुस्तकांतील फक्त शब्दार्थसंग्रह. | १ | ० |
| २० हॉ० इं० प० पुस्तकांतील शब्दार्थ व भाषांतर [illegible] पासह. ... | २ | ६ |
| २१ हॉ० इं० दु० पुस्तकांतील शब्दार्थ फ्रेजिससह. ... | २ | ६ |
| २२ हॉ० इं० सेकंड बुक सेकंड पार्टांतील शब्दार्थ फ्रेजिससह. .. | ८ | ० |
| २३ हॉ० इं० तिं० पु० [illegible] फ्रेजिससह. .. | १० | ० |
| 24 A Glossary of Sandford and Merton. | 8 | 0 |
| २५ रॉयलग्रामर पु[illegible] सार्थ स्पष्टीकरण.. | [illegible] | ० |
| २६ रॉयलरीडर नंबर [illegible] शब्दार्थ [illegible] | २ | ३ |

| पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|
| २७ रॉयलरीडर नंबर २ चे शब्दार्थ फ्रेजिससह. ... | ३ | ६ |
| २८ रॉयलरीडर नंबर ३ चे शब्दार्थ फ्रेजिससह. ... | ४ | ६ |
| २९ रॉयलरीडर नंबर ४ चे शब्दार्थ फ्रेजिससह. | ६ | ० |
| ३० सिक्वल टु रॉयलरीडर नं० १ चे शब्दार्थ. ... ... | २ | ६ |
| ३१ सिक्वल टु रॉयलरीडर नं० २ चे शब्दार्थ. ... ... | ३ | ६ |
| ३२ सिक्वल टु रॉयलरीडर नं० ३ चे श० फ्रेजिससह. ... | ४ | ६ |
| ३३ सिक्वल टु रॉयलरीडर नं० ४ चे श० फ्रेजिससह. ... | ५ | ० |
| ३४ मुंबईइलाख्यांतील सरकारी मोडी १ ल्या पुस्तकांतील शब्दार्थ, व कवितान्वयार्थ. ... ... | १ | ० |
| ३५ ,, सरकारी मोडी २ ऱ्या पुस्तकांतील शब्दार्थ. ... | १ | ० |
| ३६ ,, सरकारी मोडी ३ ऱ्या पुस्तकांतील शब्दार्थ. ... | १ | ६ |
| 37 A Hint-Book for Young Students. | 0 | 9 |

| पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|
| ३८ सर्व देशी व विलायती चालीच्या कोष्टकांचें पुस्तक. | ० | ९ |
| ३९ मार्कबुक, सर्व मराठी व इंग्रजी शाळांत चालणारें. | ० | ६ |
| ४० लेखनदीपिका अथवा मराठी शुद्ध लिहिण्याचे सोपे नियम. ... ... | १ | ० |
| ४१ व्याकरणबोध. | २ | ० |
| ४२ मराठी शब्दरूपावलि व धातुरूपावलि. ... | १ | ६ |
| ४३ सुबोध व्याकरण ... | ४ | ० |
| ४४ वाक्यमीमांसा ( प्रो० आगरकरकृत. ) ... ... | [illegible] | ० |
| ४५ मुळाक्षर शेंकडा १॥ दीड रुपया प्रत्येकास किंमत शेंकड्यावर घेणारास निराळें कमिशन नाहीं. | ० | ६ |
| ४६ कित्ते मोडी नं० १ पासून नं० ६ पर्यंत दर कित्त्यास व शेंकडा १८८. शेंकड्यावर घेणारास वेगळें कमिशन नाहीं. | ० | ६ |
| ४७ कित्ते बालबोध किंमत वरप्रमाणें. | | |

## मनोरंजक व उपदेशपर पुस्तकें.

| पुस्तकांचीं नांवें | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग १. ... | ० | १४ | ० |
| २ जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग २. ... | १ | २ | ० |
| ३ सुशिक्षितस्त्री. ... | ० | १० | ० |
| ४ सुंदरी आणि वसंतसेन [illegible] मूळ हिंदीभा[illegible] गोष्टीवरून [illegible]. ... ... | ० | ४ | ६ |
| ५ सुंदरी [illegible] वसंतसेन भाग २ ( [illegible] ) | ० | ६ | ० |

| पुस्तकांचीं नांवें | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ६ यशवंत विजया नाटिका. | ० | ४ | ० |
| ७ सुंदराबाई ( एक चटकदार गोष्टी. ) ... | ० | १ | ० |
| ८ चातुर्य रत्नावलि भाग १. | ० | ० | ६ |
| ९ चातुर्य रत्नावलि भाग २. | ० | ० | ६ |
| १० चातुर्य रत्नावलि भाग ३ | ० | ० | ६ |
| ११ चातुर्य रत्नावलि भाग ४. | ० | ० | ६ |
| १२ विचारमाला उपदेशपरवाक्यें. | | | ६ |
| १३ बृहत्कथासागर भाग पहिला. ... ... | २ | ४ | [illegible] |

# पोतदारांचीं धर्मविषयक पुस्तकें. १

## खालीं लिहिलेलीं पुस्तकें चांगलीं शुद्ध करून सुंदर टैपानें सफाईदार जाड कागदावर आम्हीं छापविलीं आहेत.

| पुस्तकांचीं नांवें | आ. पै. |
|---|---|
| १ शिवलीलामृत, पदच्छेद करून शुद्ध केलेली व कठिण शब्दांवर टीपा देऊन मोठ्या टैपानें उत्तम ग्लेज व जाड कागदावर छापलेली पोथी … … | १२ ० |
| २ आरतीसंग्रह ( आरती संख्या ३१० ) पदच्छेद करून शुद्ध केलेली आवृत्ति ३ री… .. .. | १२ ० |
| ३ भूपाळ्या संग्रह ( भूपाळ्या संख्या ८६ ) … | ३ ० |
| ४ बालहितोपदेशिका सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. लहान मुलांस फारच उपयोगी .. .. | ३ ६ |
| ५ शब्दरूपावलि, अव्यय व समासविचार एकत्र. … | ३ ० |
| ६ शनिमाहात्म्य सांचा मोठा व जाड टाइप.. … | २ ६ |
| ७ एकादशी माहात्म्य सुधारलेलें ,, .. … | २ ० |
| ८ सत्यनारायण कथा प्राकृत ओंवीबद्ध शुद्ध केलेली. .. | २ ० |
| ९ व्यंकटेशस्तोत्र ,, | १ ० |
| १० करुणामृतस्तोत्र. ,, .. | १ ० |
| ११ रामदासकृतमनाचे श्लोक. | १ ० |
| १२ शनिमाहात्म्य लहान टाइप उत्तम छापलेलें बुक. | १ ० |
| १३ आशौचनिर्णय संस्कृत.. | [illegible] |
| १४ पालोची कारिका. | १ ० |
| १५ विष्णुसहस्त्रनाम. … | १ ० |
| १६ भवि संख्या. ६० … | १ ० |
| १७ सावित्रीआख्यान ओंव्या. | १ ० |
| १८ गयासुर आख्यान ,, … | १ ० |
| १९ श्रीदत्तजन्म. ,, … | १ ० |
| २० संगीतपद्यावलि ( नवीन ) | १ ० |
| २१ संस्कृत सत्यनारायण पूजा व कथा (सुधारलेली.)… | १ ० |
| २२ पांडुरंगस्तोत्र ओंव्या. … | १ ० |
| २३ चक्रविभु. ,, … … | १ ० |
| २४ प्रश्नावलि ( गर्गाचार्यकृत.) | १ ० |
| २५ पाळणे ( संख्या ३० ) … | १ ० |
| २६ मनोरंजक स्त्रीगीत … | १ ० |
| २७ प्रातःस्मरण मोठें. … | १ ० |
| २८ सुदामचरित्र सु[illegible] | १ ० |
| २९ तुळसीआख्यान.(ओंव्या) | १ ० |
| ३० रुद्राध्याय. ( प्राकृत अर्थासह (शुद्ध केलेला.)… | १ ० |
| ३१ अंगदशिष्टाई प्रकार १ ला. | १ ० |
| ३२ अंगदशिष्टाई प्रकार २ रा. | १ ० |
| ३३ दादाजीपंतांचें चरित्र. .. | १ ० |
| ३४ सोळा सोमवार कथा ओंव्या. .. … … | १ ० |
| ३५ मारुतिजन्म. … | १ ० |
| ३६ गर्भावळी ( गर्भकार ओंव्या. ) … … | १ ० |
| ३७ समासचक्र. | [illegible] ० |
| ३८ समासचंद्रिका. … | १ ० |
| ३९ शब्दरूपा[illegible] … | २ ० |

| | | आ. | पे. |
|---|---|---|---|
| ४० | बावनश्लोकी गुरुचरित्र ओंव्या. | ० | ९ |
| ४१ | शिवकवच | ० | ९ |
| ४२ | शिवमहिम्नस्तोत्र. | ० | ९ |
| ४३ | हनुमंताचे श्लोक. | ० | ९ |
| ४४ | ज्ञानेश्वरकृत हरिपाठ. | ० | ९ |
| ४५ | एकनाथकृत हरिपाठ. | ० | ९ |
| ४६ | चोवीसनामाचे अभंग. | ० | ९ |
| ४७ | नित्यपाठाचे अभंग. | ० | ९ |
| ४८ | शिवपाठाचे अभंग. | ० | ९ |
| ४९ | तुकारामकृत हरिपाठ. | ० | २ |
| ५० | गुरुपाठाचे अभंग. | ० | ९ |
| ५१ | कबिराचीं पदें. | ० | ९ |
| ५२ | पोतदारकृत नवीन संगीत आरत्या. | ० | ६ |
| ५३ | जीवितस्तोत्र. | ० | ६ |
| ५४ | रामरक्षा. | ० | ६ |
| ५५ | ध्रुवाख्यान. | ० | ६ |
| ५६ | द्रौपदीवस्त्रहरणाचे अभंग. | ० | ६ |
| ५७ | एकाक्षरी श्लोक. | ० | ६ |
| ५८ | तुकारामकृत स्वर्गारोहणाचे अभंग. | ० | ६ |
| ५९ | संस्कृत तुळसी माहात्म्य. | ० | ६ |
| ६० | शिवापराधक्षमापनस्तोत्र. | ० | ६ |
| ६१ | ज्योतिर्लिंग स्तोत्र. | ० | ६ |
| ६२ | गुरुदत्त पंचक. | ० | ६ |
| ६३ | गणपतीचे श्लोक. | ० | ६ |
| ६४ | [illegible]स्तुति. | ० | ६ |
| ६५ | लक्ष्मीस्तोत्र संस्कृत. | ० | ६ |
| ६६ | मारुतिस्तोत्र व भीमाष्टक. | ० | ६ |
| ६७ | गणपतिस्तोत्र ओंव्या. | ० | ६ |
| ६८ | [illegible]चरित्राचे अभंग. | ० | ६ |

| | | आ. | पे. |
|---|---|---|---|
| ६९ | स्थालीपाकाचे अभंग. | ० | ६ |
| ७० | दुर्गास्तोत्र ओंव्या. | ० | ३ |
| ७१ | चर्पटपंजरी. | ० | [illegible] |
| ७२ | शिवरक्षा. | ० | ३ |
| ७३ | देव्यपराधक्षमापनस्तोत्र. | ० | ३ |
| ७४ | शिवमानसपूजा. | ० | ३ |
| ७५ | शिवताण्डवस्तोत्र. | ० | ३ |
| ७६ | नवग्रहस्तोत्र. | ० | ३ |
| ७७ | ज्वरस्तोत्र. | ० | ३ |
| ७८ | संकष्टनाशनस्तोत्र. | ० | ३ |
| ७९ | दत्तात्रेयस्तोत्र. | ० | ३ |
| ८० | गोविंदाष्टक. | ० | ३ |
| ८१ | गंगाष्टक. | ० | ३ |
| ८२ | नर्मदाष्टक. | ० | ३ |
| ८३ | अन्नपूर्णाष्टक. | ० | ३ |
| ८४ | सूर्यस्तुति. | ० | ३ |
| ८५ | रामस्तुति. | ० | ३ |
| ८६ | नारायणस्तोत्र. | ० | ३ |
| ८७ | शनिस्तोत्र | ० | ३ |
| ८८ | कालभैरवाष्टक. | ० | ३ |
| ८९ | मणिकर्णिकाष्टक | ० | ३ |
| ९० | बिंदुमाधवाष्टक. | ० | ३ |
| ९१ | गजेंद्रमोक्ष प्राकृत. | ० | ३ |
| ९२ | लक्ष्मीस्तोत्र प्राकृत. | ० | ३ |
| | स्त्रीपुरुषांनीं एकमेकांचीं नांवें घेण्याची पद्धत आणि मनोरंजक उखाणे व म्हणी. | | |
| ९३ | भाग १. | ० | ३ |
| ९४ | भाग २. | ० | ३ |
| ९५ | भाग ३. | ० | ३ |
| ९६ | भाग ४. | ० | |


जा. वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई.